◆ मार्च २००७
◆ वर्ष सातवे
◆ अंक तिसरा

# मेहता मराठी ग्रंथजगत

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन सहाय्य :
अनिरुद्ध पाटील

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

— *अनुक्रमणिका* —

| | |
|---|---|
| **संपादकीय** - | ४ |
| **साहित्यवार्ता** | १० |
| **'ए कॉल टू ऑनर' प्रकाशनवृत्त** | २६ |
| **पुस्तक परिचय** | |
| **अस्तित्त्व** : अनु. ए. आर. यार्दी | ४८ |
| **पुण्यभूमी भारत :** अनु. लीना सोहोनी | ५६ |
| **डॉलर बहू :** अनु. उमा कुलकर्णी | ६६ |
| **आनंद भेट :** डॉ. सुनीती देशपांडे | ७६ |
| **खट्याळ खलाशी :** निर्मला मोने | ८६ |
| **साधंसुधं :** प्रमोदिनी वडके-कवळे | ९२ |
| **पुरस्कार** | ९७ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | १०३ |
| **श्रद्धांजली** | ११२ |

मांडणी-अक्षरजुळणी :
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-२४४७५४६२
Email - mehpubl@vsnl.com
Website - mehtapublishinghouse.com

**वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

## संपादकीय

### नागपूर संमेलनातील ग्रंथप्रदर्शनात शुकशुकाट

नागपूर येथे भरलेल्या ऐंशीव्या अ.भा.मराठी साहित्य संमेलनाच्या एकूण आयोजनातील आणि व्यवस्थेतील त्रुटींमुळे एकूणच संमेलनांच्या कार्यपद्धतीबाबत पुनर्विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे.

गावचा उत्सव म्हणून लाखो लोकांची पावले सोलापूर, नाशिक, औरंगाबाद, सातारा, परभणी, परळी, नगर वगैरे ठिकाणी साहित्य संमेलनात अनायासे वळत, तेथे नागपूरसारख्या उपराजधानीमध्ये संमेलनाच्या मुख्य मंडपात पाचसहा हजारांचीही उपस्थिती नसावी आणि ग्रंथप्रदर्शनात तीन दिवसांत हजार-पंधराशे लोकही फिरकू नयेत– असे दृश्य बघताना कोणाही ग्रंथप्रेमी व्यक्तीला यातना झाल्याशिवाय राहत नव्हत्या. एखाद्या जिल्हा पातळीवरच्या साहित्य संमेलनाची कळा अ.भा. म्हणवणाऱ्या साहित्य संमेलनाला यावी ही दुर्दैवाची आणि नामुष्कीची बाब आहे.

तशात हे संमेलन विदर्भ साहित्य संघ या महामंडळाच्या घटकसंस्थेने आयोजित केलेले; त्यामुळे ते आदर्श संमेलन व्हावे ही अपेक्षा होती. परंतु त्या अपेक्षेला पार वाटाण्याच्या अक्षता दाखवल्या गेल्या.

पंचाहत्तर लाखांचे अंदाजपत्रक असणाऱ्या या संमेलनाला दहा लाख रुपयांचेही बजेट मोठे वाटावे– असा एकूण रागरंग दिसला.

संपूर्ण नागपूर शहरात संमेलनाची एकही कमान, फलक वा बॅनर नाही; कसलीही वातावरणनिर्मिती नाही. नागपूर शहरातील आणि विदर्भातील मान्यवर लेखककवींनाही आमंत्रण वा काही मानाचे स्थान नाही– हे बघून आश्चर्य वाटत होते. स्मरणिका, अध्यक्षीय भाषणाची छापील प्रत वगैरे काढण्यात आल्याचे समारंभातील घोषणेवरून कळावे एवढेच! प्रत्यक्ष त्यांची मागणी केल्यावर अजून उपलब्ध नाहीत असे काउंटरवर सांगण्यात आले. अगदी संमेलनाच्या समारोपाचे सूप वाजवल्यावरही! याला काय म्हणावे?

बाहेरगावच्या प्रतिनिधींची सोय आमदार निवासात साडेसातशे रुपये घेऊन केली गेली. दोन-अडीचशे स्टॉलधारकांकडून प्रत्येकी तीन हजार रुपये भाडे घेतले गेले. उपस्थितीसाठी पन्नास रुपये शुल्क स्थानिक रसिकांकडून घेतले गेले... म्हणजे मंडप, निमंत्रितांचे मानधन व प्रवासखर्च, स्टॉलउभारणी, ग्रंथदिंडी इत्यादीच मुख्य खर्चाचे विषय... तेव्हा महाराष्ट्र सरकारच्या पंचवीस लाखांच्या



अनुदानातच हे सर्व संमेलन सहजपणे होऊ शकेल; अन्य निधीची गरजच काय? असा प्रश्नही अशासारखी संमेलने आयोजित करण्याचा अनुभव असलेल्या जाणकारांना पडणे अपरिहार्य आहे. जिल्हा पातळीवरचे संमेलन करायला पंचाहत्तर लाख खर्च येईलच कसा? असा प्रश्न पडतो.

या संमेलनात कार्यक्रम नेहमीप्रमाणेच तीन ठिकाणी होते. त्यात दीडएकशे लोकांना सहभागी करून घेतले होते. काटकसरीच्या नावाखाली तीन वेळचे बसभाडे व मानधन एवढे ज्यांना स्वीकारार्ह होते त्यांनाच बोलावले गेले. माजी अध्यक्षांनी आपापल्या तब्येतीनुसार अधिक काही सोयीची अपेक्षा केली तेव्हा त्यांना टाळले गेले. त्यामुळे या संमेलनाला डॉ. सुभाष भेंडे हेच काय ते परगावचे माजी अध्यक्ष उपस्थित राहिले. मारुती चितमपल्ली आणि प्राचार्य राम शेवाळकर हे नागपूरचेच! इतक्या कमी संख्येने माजी अध्यक्ष उपस्थित राहण्याची ही पहिलीच वेळ– नागपूरकर आयोजकांच्या आतिथ्यशीलतेची पताका उंच फडकवण्यासाठी ती पर्याप्त ठरेल. विदर्भ साहित्य संघाच्या त्रिमूर्तीने सर्व सूत्रे आपल्या हाती केंद्रित करून ठेवली. कोणाही जाणकारांना विश्वासात घेतले नाही; कोणाशी सल्लामसलत केली नाही, त्यामुळे खुद्द नागपूरमधील मान्यवर लेखककवींना या संमेलनापासून दूर ठेवले गेले, हे सर्वांनाच खटकल्याशिवाय राहिले नाही. स्थानिक जाणत्या प्रकाशकांनाही त्यांनी स्टॉलबाबत कधी विचारले नाही, त्यामुळे तेही निरुत्साही व नाराज होते.

संमेलनासाठी निवडलेले स्थळ हे चुकीचे होते; गावापासून दूर होते. आमदारनिवासात प्रतिनिधींसाठी दोनशे रुम्स मिळाल्याने त्या समोरच्या वसंतराव देशपांडे सभागृहात काही कार्यक्रम आणि त्याला लागून असलेल्या दक्षिणमध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्रात स्टॉल्सची उभारणी अशी योजना केली गेली. संमेलनाच्या मुख्य मंडपासाठी हिस्लॉप कॉलेज परिसर घेण्यात आला. तो आमदारनिवासापासून एक किलोमीटर दूर... त्यामुळे प्रतिनिधींची दमछाक होणे अपरिहार्य होते. व्हीआयपींसाठी शेवाळकर डेव्हलपर्सतर्फे दहा रिक्षा ठेवण्यात आल्या होत्या; परंतु या त्रिस्थळी यात्रेमुळे हव्या त्या कार्यक्रमाला जाणे अवघडच ठरले. त्यातच भर म्हणजे एकही कार्यक्रम वेळेनुसार सुरू झाला नाही. वेळेवर संपला नाही. त्यामुळे पुढचे कार्यक्रमही लांबत गेले. कार्यक्रम वेळेवर सुरू करणे-संपवणे यासाठी कसलीच योजना केली गेली नव्हती. तरीही कार्यक्रम सगळे पार पडले– इतकेच!

सर्वात जास्त गैरसोय झाली ती खूप मोठा खर्च करून आलेल्या पुस्तकविक्रेत्या स्टॉलधारकांची! दक्षिणमध्यक्षेत्र केंद्राची जागा आमदारनिवाससमोर आहे आणि हॅंडिक्राफ्टची तेथे छोटी प्रदर्शने होतात हे खरे; परंतु पुस्तकांच्या प्रदर्शनासाठी त्याचा वापर आजवर कधी केला गेला नव्हता. नागपूरमध्ये पुस्तकप्रदर्शन दरवर्षी

होते ते कस्तुरीचंद पार्कमधील प्रशस्त मैदानात. तेथे पुस्तकांची विक्रीही चांगली होते. तेथे सुमारे दोनशे स्टॉल्स असतात. रसिक ग्राहकांची गर्दीही भरपूर असते. त्याचे आयोजन अत्यंत चोखंदळपणे केले जाते. दक्षिणमध्य क्षेत्र केंद्रांची जागा त्यामानाने लहान आहे. तेथे फारतर पन्नास स्टॉल बसू शकतात; परंतु तेवढ्या जागेत दोनशे दहा स्टॉल बसवण्याचा हट्ट धरल्याने स्टॉल्सची मांडणी फारच गिचमिड आणि अव्यवस्थित झाली. साधारणपणे 'यू' टाइप वा अर्धवर्तुळाकार रचना असेल तर सर्व स्टॉल्स एकदम दिसू शकतात आणि हव्या त्या स्टॉलकडे सरळ जाता येते. दक्षिणमध्यक्षेत्र केंद्रात प्रवेश केल्यावर डाव्या हाताला प्रथम दाटीवाटीने लावलेल्या सोळा स्टॉलचा एक बोळ, त्याला लागून तेवढाच दुसरा बोळ... उजवीकडे एकाआड एक असे भुलभुलैया टाइप उभेआडवे स्टॉल्स, पुढे झाडाच्या पारावर गोलाकार स्टॉल (चार स्टॉलचे भाडे आकारून), त्यापुढे समोरासमोर काही स्टॉल्स (त्यात ड्रा न काढता एक 'खास' प्रकाशनाला स्थान), ह्याला लागून अर्धवर्तुळाकार खुला रंगमंच. (तेथे नवोदितांची वर्णी लावण्यासाठी 'मनसोक्त' कविसंमेलन, बालमेळावा, नवोदितांचे कथाकथन वगैरे नाइलाजाने करावे लागलेले 'नावडते' 'सुमार' कार्यक्रम) आणि त्यालगतच्या डावीकडच्या जागेत पुन्हा आडवे-उभे स्टॉल्स– असा सगळा राडा केलेला होता. हा सगळा राडा बघून स्टॉलधारक प्रथमदर्शनीच हैराण झाले. अशी चमत्कारिक स्टॉलरचना याआधी कुठे बघायला मिळाली नव्हती. कुठेतरी कोपऱ्यात किंवा एकामागे एक दडलेल्या स्टॉलवर गिऱ्हाईक येणेच शक्य नाही हे सांगायला कोणा ज्योतिषाची गरज नव्हती. ''आमचे पैसे परत द्या– आम्ही स्टॉल न लावताच परत जातो'' असे काही स्टॉलधारकांनी कोषाध्यक्ष नरेश सब्जीवाले यांना सांगितले... गुरुवारी दिवसभर वादावादी चालू होती. पण काहीही ऐकून घेण्याच्या मन:स्थितीत आत्ममग्न आयोजक नव्हते... दुसऱ्या दिवशी ग्रंथदिंडी समोरच्या रस्त्यावरून पुढे मुख्य मांडवापर्यंत गेली. परंतु स्टॉलकडे कुणीही फिरकले नाही. ग्रंथदिंडीचे विसर्जन स्टॉलच्या जागी होऊन तेथेच ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन त्याचवेळी व्हावे हा प्रत्येक संमेलनातला सर्वसंमत शिरस्ता. त्याला येथे का कुणास ठाऊक, फाटा देण्यात आला. ग्रंथदिंडीचे विसर्जन बारा वाजता मुख्य मंडपाच्या ठिकाणी झाले. आणि दुपारी ३ वाजता स्टॉल्सचे उद्घाटन मारुती चितमपल्ली यांच्या हस्ते झाले. त्यावेळी पन्नाससाठ लोकही हजर नव्हते... तशात चितमपल्लींना पायी चालायला कष्ट पडतात. त्यामुळे ते एकदोन स्टॉलवर गेले तेवढेच!... 'अक्षरधारा'ने प्राचार्य राम शेवाळकर आणि ना. सुशीलकुमार शिंदे यांना खास आमंत्रित करून त्यांच्या हस्ते आपल्या ग्रंथदालनाचे उद्घाटन करून घेतले. चितमपल्लींच्या मुख्य उद्घाटनापेक्षा हे उद्घाटन अधिक देखणेपणाने पार पडले... परंतु चार वाजता मुख्य मंडपात संमेलनाचे उद्घाटन असल्याने हे सारे पाहुणे तिकडे रवाना झाले आणि ग्रंथस्टॉल्स ओस पडले.



रात्री संमेलनाचे कार्याध्यक्ष मनोहर म्हैसाळकर, श्रीपाद भालचंद्र जोशी आणि नरेश सब्जीवाले यांच्यासमवेत स्टॉलधारकांची बैठक झाली. स्टॉलबाबतचा अत्यंत नगण्य प्रतिसाद आणि गैरव्यवस्था यावर झोड उठवण्यात आली. ''काटकसरीने हे संमेलन करायचे आम्ही ठरवलेले आहे. त्यामुळे एकही कमान, बॅनर वा बोर्ड कुठे लावलेला नाही'' असे म्हैसाळकरांनी अभिमानाने सांगितले. स्टॉलच्या प्रवेशद्वारावरही बोर्ड नाही– तेवढा फारतर लावू असे उदारमनाने कबूल केले. वृत्तपत्रात जाहिराती देता येणार नाहीत.. वृत्तपत्रांमुळे प्रसिद्धी चांगली झाली आहे तेव्हा उद्या लोक येतील अशी भविष्यवाणीही त्यांनी केली. म्हैसाळकरांच्या आडमुठेपणाचा आणि मख्खपणाचा हा अनुभव प्रकाशक-विक्रेत्यांना थक्क करणारा होता. चीड आणणारा होता. आम्हाला पैसे परत द्या– आम्ही उद्या स्टॉल उघडत नाही– बहिष्कार टाकून परत जातो असे काहींनी म्हटले. उशिरा आलेल्या श्रीपाद भालचंद्र जोशींनी मी चार कुलगुरू येथे आणले आहेत– ते पुस्तकांची खरेदी करतील, तुम्ही कुलगुरूंची त्यासाठी मनधरणी करायला माझ्याबरोबर चला असे मोठ्या तावातावाने सांगितले तेव्हा स्टॉलधारकही खवळले. गावात बॅनर्स-बोर्ड वगैरे लावून पुरेशी वातावरणनिर्मिती केली नाही; ग्रंथप्रेमी माणसांनी येथे गर्दी करायला हवी; ती होत नाही; आणि केवळ चार कुलगुरूंना बोलावले म्हणून स्वत:ची पाठ थोपटून घेण्याचा प्रकार उद्विग्न करणारा होता.


दुसऱ्या दिवशीही ग्राहकांची उपस्थिती तुरळकच होती. त्यामुळे स्टॉलधारक कंटाळून गेले.

तिसऱ्या दिवशी रविवारी सकाळी दहा वाजता ऊन फार येणाऱ्या स्टॉलला पडदे लावण्याबद्दल मंडप कॉंट्रॅक्टर मोहमद जहीर यांच्या एका कामगाराला सांगितले तर तो म्हणाला, ''संध्याकाळी पडदे लावू.'' ऊन दिवसा असते; संध्याकाळी पडदे लावून काय उपयोग असे विचारल्यावर त्या कामगाराने सरळ त्या प्रकाशकावर हातच उगारला. नागपूरच्या विद्याविकास प्रकाशनचे शैलेश देशपांडे यांचा डोळाच जायचा, पण कपाळावर जखम झाली आणि रक्ताची धार लागली. तेथे उपस्थित असलेल्या मेडिकल स्टॉलवरच्या डॉक्टरांनी तात्पुरती पट्टी बांधून त्यांना हॉस्पिटलमध्ये पाठवले... या प्रकाराने स्टॉलधारक खवळले. त्यांनी खुल्या रंगमंचावर जाऊन या प्रकाराची उपस्थित रसिकांना कल्पना दिली... नंतर काही वेळाने संमेलनाध्यक्ष अरुण साधू तेथे आले. त्यांनी संमेलनाच्या आयोजकांची बाजू घेऊन प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला. साधू नेहमी संयम-सौजन्य दाखवतात; पण त्यावेळी त्यांचे ग्रह ठीक नसावेत. ते एकदम बोलून गेले... ''उगाच जातीय दंगल भडकावू नका.'' कॉंट्रॅक्टर मुसलमान... तक्रार करणारे देशपांडे... त्यामुळे सगळेच हबकले. कॉंट्रॅक्टरच्या माणसाने नागपूरच्याच एका प्रकाशकावर हल्ला केला– आणि साधू म्हणतात, ''जातीय दंगल भडकावू

नका.''... त्यांनी नंतर या विधानाबद्दल प्रकाशकांजवळ माफी मागितली खरी, पण नंतर 'लोकमत'ला दिलेल्या मुलाखतीत परत तसेच म्हटले...

प्रकाशकाला मारहाण झाल्यामुळे या संमेलनाला गालबोट लागले.

स्टॉल्सच्या उभारणीबाबत दाखवलेल्या निष्काळजीपणामुळे हे सर्व घडले. आयोजकांनी त्याबाबत व्यवस्थित दक्षता घेण्याची गरज होती. प्रकाशक-विक्रेत्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. नागपूरसारख्या दूरच्या ठिकाणी स्टॉलभाड्याबरोबर वाहतूक खर्च, कर्मचाऱ्यांचा प्रवासखर्च, भोजननिवास व्यवस्था खर्च करून जायचे तर भरपूर विक्रीची अपेक्षा असणारच! या स्टॉल्सना जर तीन दिवसांत मिळून दीडदोन हजार ग्राहकांनीही भेट दिली नसेल तर त्याला आयोजकांनी वातावरणनिर्मितीबाबत दाखवलेली अनास्था हीच कारणीभूत आहे असे म्हणावे लागेल. संमेलनात ग्रंथप्रदर्शनाची मांडणी व व्यवस्था प्रकाशक संघटनेच्या सल्ल्याने करावी हाच यावरचा मार्ग आहे.




**मेहता मराठी ग्रंथजगत**
**दि रजिस्ट्रेशन ॲक्ट ऑफ न्यूजपेपर्स (सेंट्रल रूल्स : १९५६)**
**नियम क्र. ८ अन्वये निवेदन फॉर्म ४**

१) प्रकाशन स्थळ : मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१ सदाशिव पेठ, पुणे ३०.
२) प्रकाशन काल : मासिक
३) मुद्रक, प्रकाशक व संपादक : सुनील अनिल मेहता, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ३०
४) प्रकाशनाची मालकी : सुनील मेहता, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ३०.
५) राष्ट्रीयत्व : भारतीय

मी, सुनील अनिल मेहता, असे घोषित करतो की, वर दिलेला तपशील माझ्या समजुतीप्रमाणे व माहितीप्रमाणे बरोबर आहे.

दि. १.३.२००७

सुनील मेहता
प्रकाशक





## कवी शंकर वाडेवाले यांचा नवा काव्यसंग्रह




संस्कृतीला समृद्ध करणाऱ्या आणि सर्जनाचा वसा घेतलेल्या आदिमशक्तीचा विविध अंगांनी घेतलेला परामर्श..... भेदक.....दाहक....

**- डॉ. द. ता. भोसले**

## मायीचं गाणं

**मूल्य ६०रु.**

**पृष्ठे ८०**

**कवी शंकर वाडेवाले यांच्या 'माती बोले गुज' या पहिल्या काव्यसंग्रहावरील मान्यवरांचे अभिप्राय ---**

* तुमच्या कविता मला आनंद देतात आणि अस्वस्थही करतात. तुमच्या कवितेचे कूळ बहिणाबाईंचे. तितकेच सच्चे आणि साध्या बोलीत खूप खूप सांगून जाणारे; क्षणार्धात खाकसाच्या दाण्यातून ज्यात आभाळ माईना, इतकं विराट होऊन जाणाऱ्या मनासारखं. **- पु. ल. देशपांडे**

* या पिढीतील तुम्ही स्वत: बिनीचे कवी आहात. तुमच्या कविता मला फार आवडतात. तुम्ही मातीवर मनापासून प्रेम करणारे भूमिपुत्र कवी आहात. तुमचे भवितव्य उज्ज्वल आहे. **- डॉ. आनंद यादव.**

* कृषक जीवनातील अनेक पदरी दु:ख आपण अत्यंत मोजक्या शब्दांत प्रत्ययकारी पद्धतीने नोंदवता. 'आजचा जोमदार कवी' अशी माझी तुझ्याबद्दलची भूमिका आहे. **- डॉ. वासुदेव मुलाटे.**

* ग्रामीण जीवनातील हर्ष-खेदाचा आणि आशा निराशेचा पट; अत्यंत सोप्या स्त्रीगत सुलभ शैलीत तुमची कविता उभी करते. **- शंकर सारडा.**

**संपर्क - कवी शंकर वाडेवाले**, 'शिवछाया' सिडको, नांदेड - ४३१ ६०५.
फोन - **९८५०९८६१९४,२२७२२१**
**- दत्ता डांगे, इसाप प्रकाशन,** सहयोग नगर, नांदेड.
फोन - **०२४६२ - २६०१९०, ९८९००९९५४१**

# साहित्यवार्ता

## * 'लेट्स किल गांधी' या पुस्तकाच्या मराठी अनुवादाचे हक्क 'मेहता पब्लिशिंग हाऊस'कडे

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे पणतू 'तुषार गांधी' यांनी लिहिलेल्या 'लेट्स किल गांधी' या सध्या सर्वत्र चर्चेत असलेल्या पुस्तकाचे मराठी अनुवादाचे हक्क 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ला मिळाले आहेत. गेल्या १७ फेब्रुवारी रोजी श्री. तुषार गांधी यांनी या निमित्ताने मेहता पब्लिशिंग हाऊसच्या कार्यालयास सदिच्छा भेट दिली.

या पुस्तकाच्या मूळ इंग्रजी आवृत्तीचे प्रकाशन १७ फेब्रुवारी रोजी पुण्यातच निवृत्त सनदी अधिकारी 'माधव गोडबोले' यांच्या हस्ते झाले. दिल्लीतील 'रुपा अँड कंपनी' या प्रकाशनसंस्थेने मूळ इंग्रजी आवृत्ती प्रकाशित केली आहे.



**मेहता पब्लिशिंग हाऊसच्या कार्यालयात (मध्यभागी) श्री. तुषार गांधी, (डावीकडे) श्री. अनिल मेहता, (उजवीकडे) श्री. सुनील मेहता**



१०४८ पानांच्या या पुस्तकात गांधीहत्येच्या कारस्थानाची सविस्तर माहिती, गांधीजींची शेवटची चार वर्षांतील परिस्थिती, प्रत्यक्ष गांधीहत्या व त्यावरील खटला आणि त्यावरील न्यायमूर्ती कपूर आयोगाचा अहवाल यावर विस्तृत भाष्य आहे.

या पुस्तकाविषयी मनोगत व्यक्त करताना तुषार गांधी म्हणाले, ''स्वतंत्र पाकिस्तानच्या मागणीसाठी ५५ कोटी रुपयांचा विषय नसतानाही १९३४ पासून बापूजींच्या हत्येचे पाच प्रयत्न झाले. नथुराम गोडसे, आपटे, करकरे यांना ओळखणारे पुण्याचे पोलिस 'बिर्ला हाऊस' येथे पहाऱ्यावर ठेवणे शक्य असतानाही तसे घडले नाही. तत्कालीन राजकीय परिस्थिती तसेच मुंबई व दिल्ली पोलिसांनी केलेली अक्षम्य हेळसांड यामुळेच गांधीजींची हत्या, शक्य असूनही टाळली गेली नाही.

देशाच्या फाळणीबद्दल बोलणी करताना पंडित नेहरू आणि वल्लभभाई पटेल यांनी गांधीजींना जाणीवपूर्वक बाजूला ठेवले. धर्म आणि जात यामुळे देशाचे जे विभाजन झाले ते आता तरी टळले पाहिजे. अन्यथा बापूंकडून आपण काहीच शिकलो नाही असेच म्हणावे लागेल'' अशा शब्दांत तुषार गांधी यांनी आपली खंत व्यक्त केली.

## * गांधीजींच्या दुर्मिळ छायाचित्रांची बोली ६८ लाख!

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची हत्या होण्याआधी जगप्रसिद्ध छायाचित्रकार हेन्री कार्टिअर-ब्रेसन यांनी काढलेली सुमारे ४५ दुर्मिळ छायाचित्रे एका भारतीय कंपनीने लिलावात ६८ लाखांना खरेदी केली आहेत. गांधीजींची छायाचित्रे एवढ्या मोठ्या प्रमाणात भारतीय कंपनीने खरेदी करण्याची ही पहिलीच वेळ असल्याने त्याला महत्त्व प्राप्त झाले आहे.

गांधीजी यांच्याशी निगडित प्रत्येक आठवण भारताने जपली आहे. गांधीजींचे वास्तव्य असलेल्या अनेक वास्तूंमध्ये या आठवणी जतन करून ठेवण्यात आल्या आहेत. अशातच हा दुर्मिळ साठा भारताच्या हाती गवसला आहे. ओसियान्स-कनायझर्स ऑफ आर्ट प्रा. लि. या भारतातील कला आणि संस्कृतीचा वारसा जपणाऱ्या संस्थेने लंडनमधील एका डीलरकडून लिलावात हा साठा मिळविला आहे. यामध्ये ब्रेसन यांनी काढलेल्या ४५ मूळ छायाचित्रांचा समावेश आहे. ३० जानेवारी १९४८ मध्ये गांधीजींची हत्या होण्यापूर्वी ब्रेसन दुपारभर तेथे हजर होते. त्यावेळी त्यांनी गांधीजींची अनेक छायाचित्रे काढली. ते तिथून निघून गेले. त्यानंतर १५ मिनिटांनी गांधीजींची हत्या झाली. त्या काळात तसेच गांधीजींच्या अंत्ययात्रेची त्यांनी काढलेली छायाचित्रे आदींचा या छायाचित्रांमध्ये समावेश आहे. ही सर्व छायाचित्रे जगप्रसिद्ध 'लाइफ' मासिकात छापून आली होती.

## * ज्ञानेश्वर हे मध्ययुगातील पहिले बंडखोर संत

कर्मकांडात जखडलेल्या समाजाला नवे रूप देण्याचे कार्य संत ज्ञानेश्वरांनी केले त्यामुळे मध्ययुगातील ते पहिले बंडखोर संत ठरतात, असे मत ज्येष्ठ साहित्यिक 'डॉ.आनंद यादव' यांनी मांडले. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने शिवजयंती निमित्त निगडी येथे प्रबोधन व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यावेळी त्यांचे 'लोकसखा ज्ञानेश्वर' या विषयावर व्याख्यान झाले. व्याख्यानमालेचे उद्घाटन महापौर मंगला कदम यांच्या हस्ते करण्यात आले.

डॉ. यादव म्हणाले की, ज्ञानदेवांचे कार्य लोकसख्याचे होते. मध्ययुगातील एक चतुर्थांश ब्राह्मण समाज संस्कृतमध्ये शिक्षण घेत होता, तर तीन चतुर्थांश समाजाला शिक्षण न मिळाल्याने ते कर्मकांडाच्या आहारी गेले. या समाजाला कर्मकांडातून मुक्त करण्याचे काम ज्ञानेश्वरांनी केले.

भगवद्गीतेचे तत्त्वज्ञान सर्वसामान्यांना कळण्यासाठी ज्ञानेश्वरांनी गीतेचे रूपांतर प्राकृत भाषेत केले. हिंदूधर्माविषयी बोलताना ते म्हणाले की, पूर्वी हिंदू धर्म एकच होता परंतु कर्मकांडामुळे त्याचे विभाजन झाले. त्यानंतर समाजात सोयीनुसार नवीन धर्म निर्माण होत गेले. परंतु विष्णू व शंकराचा महासमन्वय म्हणजे पंढरपूरचा विठ्ठल आहे, असे सांगत त्यांनी ज्ञानेश्वरांनी श्रद्धेच्या जोरावर ज्ञानेश्वरी लिहून परमेश्वर एकच असतो, हे समाजाला पटवून दिले.

## * अमेरिकेत गेलेली साठीची पिढी संभ्रमावस्थेत

नोकरी व्यवसायासाठी साठ आणि सत्तरच्या दशकात अमेरिकेत गेलेली पिढी आजही काहीशा संभ्रमावस्थेत असलेली दिसते. पण त्यांच्या पुढच्या पिढीवर बसलेला अमेरिकन बॉर्न कन्फ्यूज्ड देसी (एबीसीडी) हा शिक्का मात्र चुकीचा आहे. उलट त्या पिढीमध्ये पाश्चिमात्य आणि पौर्वात्य संस्कृतीचा उत्तम मेळ साधलेला दिसतो, असे मत प्रसिद्ध पत्रकार आणि लेखिका अपर्णा वेलणकर यांनी व्यक्त केले.

शोभा डे यांचे 'स्पाऊज' तसेच अरुंधती रॉय यांचे 'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज' मराठीत आणणाऱ्या अपर्णा वेलणकरांना बृहन्महाराष्ट्र मंडळाची (बीएमएम) शिष्यवृत्ती मिळाली होती. १९६० आणि ७० च्या दशकात अमेरिकेत गेलेल्या मराठी माणसाच्या नेमक्या प्रेरणा काय आहेत, याचा शोध घेणारे संशोधनात्मक पुस्तक बीएमएम आणि मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे जुलैमध्ये सिॲटल येथे भरणाऱ्या बीएमएम संमेलनात प्रकाशित होणार आहे.

आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीमुळे तेथे शिक्षणाबरोबरच नोकरी व्यवसाय करणारे मराठी एनआरआय डॉलर कमावतानाच अतिशय प्रतिकूल परिस्थितीलाही सामोरे गेले.



सव्वाशे वर्षांपूर्वी अमेरिकेत शिक्षणासाठी गेलेल्या पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी होत्या. पण स्वातंत्र्यानंतर मध्यमवर्गाचा झालेला भ्रमनिरास, रॉकेल आणि गव्हासाठीही लावाव्या लागणाऱ्या रांगांना कंटाळून मराठी पांढरपेशा वर्गाने अमेरिकेत जाण्याचा निर्णय घेतला. तिथे पैसे मिळवून परत येण्याची त्यांची इच्छा तशीच राहिली. विवाहानंतर कुटुंब वाढू लागल्यावर त्यांचे जगण्याचे प्रश्न अधिक गुंतागुंतीचे बनत गेले. त्यातूनच त्यांच्या वाट्याला अटळ संभ्रमावस्था आली, असे निरीक्षण अमेरिकेत राहणाऱ्या मराठीजनांच्या मुलाखतींमधून अपर्णा वेलणकरांनी नोंदवले आहे.

## * वासुदेव गायतोंडेंच्या चित्राची पावणेसहा कोटींना विक्री

विख्यात चित्रकार वासुदेव गायतोंडे यांच्या अमूर्त चित्राला ओसियान्सच्या लिलावामध्ये तब्बल पाच कोटी ७६ लाख रुपयांची बोली मिळाली. त्या पाठोपाठ प्रसिद्ध चित्रकार अमृता शेरगिल यांचे 'गर्ल्स इन कॉन्व्हर्सेशन' चित्र ३ कोटी ४८ लाखांना विकले गेले. या लिलावामध्ये तब्बल ३९ कोटी आठ लाख रुपयांची चित्र विक्री पार पडली.

वासुदेव गायतोंडे हे खरे तर अमूर्त चित्रकलेच्या क्षेत्रातील मोठे नाव. मात्र आजवर त्यांच्या चित्रांची दखल चित्रांच्या बाजारपेठेमध्ये फारशी घेतली गेली नव्हती. त्यांच्या चित्राला सर्वप्रथम एक कोटींची किंमत मिळाली तीदेखील ओसियान्सच्याच लिलावामध्ये. त्यानंतर गायतोंडे यांच्या चित्रांना कोटींचे लेबल लागत गेले. आता पुन्हा एकदा चित्र लिलावामध्ये वासुदेव गायतोंडे यांच्याच चित्राने सर्वाधिक बोली मिळवली आहे. याशिवाय या लिलावामध्ये ए. आर. चुगताई, मनजित बावा, शांती दवे, सतीश गुजराल, जी. आर. संतोष, प्रदोष दासगुप्ता, भारती खेर यांच्या चित्रांनाही आजवरची सर्वाधिक किंमत मिळाली आहे.

## * युरोपियन महाराष्ट्र मंडळाचे संमेलन पुढील वर्षी पॅरिसमध्ये

युरोपियन महाराष्ट्र मंडळाचे संमेलन पुढील वर्षी पॅरिसमध्ये होणार असून, या संमेलनाचे आयोजन मूळचे नगरकर असलेले डॉ. शशी धर्माधिकारी करीत आहेत. युरोपियन महाराष्ट्र मंडळाचे संमेलन दर दोन वर्षांनी भरते. सन १९९४ पासून या संमेलनांना सुरुवात झाली. गेल्या वर्षी हॉलंडला हे संमेलन झाले. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांना या संमेलनासाठी खास निमंत्रित करण्यात आले होते. हेमलकसा येथे आदिवासींसाठी 'लोकबिरादरी' प्रकल्प चालविणाऱ्या डॉ. प्रकाश आमटे यांचा गौरव या वेळी करण्यात आला.

डॉ. धर्माधिकारी हे पॅरिसमधील महाराष्ट्र मंडळाचे महासचिव आहेत. मूळचे पुण्याचे असलेले चंद्रकुमार राजगुरू हे मंडळाचे अध्यक्ष असून, कार्यकारी मंडळात

राजेंद्र शेंडे, गिरीश धर्मपुरीकर यांचा समावेश आहे. पॅरिसमध्ये व्यवसाय-नोकरीनिमित्त स्थायिक झालेल्या महाराष्ट्रातील कुटुंबांना एकत्र आणून आपली संस्कृती जपण्याचा प्रयत्न हे मंडळ करते. महाराष्ट्र आणि फ्रान्सला सांस्कृतिक, शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रात जवळ आणून हे संबंध बळकट करण्याचाही त्यांचा प्रयत्न आहे.

### * 'लोकमान्य ते महात्मा'

'लोकमान्य ते महात्मा' हा दोन खंडांतील ग्रंथ १९०७ ते ४७ या चाळीस वर्षांतील भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा काव्यात्म आकृतिबंध आहे. तो केवळ बुद्धिवंतांनीच नव्हे; तर विद्यार्थी आणि 'गांधीगिरी' करणाऱ्या सर्वांनीच वाचला पाहिजे, अशा शब्दांत ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांनी प्रशंसा केली.

टिळक ते गांधीयुग या कालखंडातील संघर्षाची प्रतिमा असणारे हे लेखन आहे, असे सांगून जाधव म्हणाले की, यामुळे महाकादंबरीच्या शैलीत इतिहासलेखनाची नवी दिशा शोधण्याचे काम आता समीक्षकांना करावे लागणार आहे. केवळ बुद्धिजीवी विचारवंतांपुरते हे लिखाण मर्यादित नसल्यामुळे ते सर्वांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्न करावे, अशी सूचनाही त्यांनी केली.

### * अनिता देसाई, मीरा सयाल ब्रिटनमध्ये शालेय पुस्तकात

भारतीय वंशाच्या कादंबरीकार अनिता देसाई आणि अनिवासी भारतीय लेखिका व अभिनेत्री मीरा सयाल यांना विल्यम शेक्सपियर, जेन ऑस्टिन आणि थॉमस हार्डी यांच्यासह ब्रिटनच्या शालेय अभ्यासक्रमात स्थान मिळणार आहे.

इंग्लंडमधील ११ ते १४ वर्षांच्या मुलांसाठी असलेल्या अभ्यासक्रमात काही नवीन लेखकांच्या धड्यांचा समावेश करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी झाल्यास, २००८ च्या शालेय वर्षापासून हे धडे अभ्यासक्रमात समाविष्ट होतील. मुलांमध्ये लहानपणापासूनच सामाजिक आणि सांस्कृतिक लवचिकता निर्माण व्हावी हा उद्देश त्यामागे आहे.

मसुरीमध्ये जन्मलेल्या ७० वर्षीय अनिता देसाई यांच्या 'फायर ऑन द माउंटन्स', 'क्लीअर लाइट डे', 'इन कस्टडी', 'फास्टिंग फीस्टिंग' या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. ४५ वर्षीय मीरा सयाल यांची 'अनिता अँड मी' आणि 'लाइफ इज नॉट ऑल' ही पुस्तके प्रसिद्ध आहेत.

### * मराठी विश्वकोशाचे सर्व खंड संकेतस्थळावर

माहिती तंत्रज्ञानाच्या ज्ञानगंगेद्वारे तरुणांपर्यंत पोहोचण्यासाठी आतापर्यंतचे सर्वच विश्वकोश एका विशिष्ट संकेतस्थळावर उपलब्ध करण्याचा निर्णय महाराष्ट्र साहित्य विश्वकोश महामंडळाने घेतला आहे.

'विश्वज्ञानाचे तत्त्वज्ञान ते शेक्सपिअर विल्यम'पर्यंतच्या विश्वकोशाच्या सतराव्या खंडाचे प्रकाशन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते दि. १२ फेब्रुवारी



रोजी मंत्रालयात झाले. माहितीबरोबरच ज्ञानही अवगत करण्यासाठी सध्याची तरुणपिढी विज्ञान-तंत्रज्ञान प्रिय झाली आहे. त्यामुळे या तरुणांपर्यंत पोहोचण्यासाठी आजवरचे वेगवेगळे सतराही खंड www.vishwakosh.org.in या संकेतस्थळावर लवकरच उपलब्ध होणार आहेत. त्याचबरोबर या सर्व खंडांच्या सीडीही बनविण्यात आल्या असून त्याचेही प्रकाशन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले.

विश्वकोश हा बंदिस्त असू नये, अशी महामंडळाची भूमिका आहे. या भूमिकेतूनच विश्वकोशाचे आजवर लेखन झाले असून त्यात भरपूर चित्रांसह आकर्षकता या गोष्टींवर भर दिला आहे.

सतरावा खंड ८९३ पानांचा आहे. तो ४४ चित्रपत्रांनी आणि रंगीत-कृष्णधवल दुर्मिळ छायाचित्रांनी सजला आहे.

### * यशाचा फॉर्म्युला

'मी आणि माझा बाप' यांच्यामध्ये एक अदृश्य मूकनायक आहे. तो खरा बाप आहे, तो म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. त्यांच्यामुळेच वेगळ्या विचाराची प्रेरणा मिळाली, असे प्रतिपादन डॉ. नरेंद्र जाधव यांनी केले. साहेबरावजी बुट्टे-पाटील स्मृती व्याख्यानमालेचे पाचवे पुष्प त्यांनी गुंफले. 'आमचा बाप आणि आम्ही' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता.

ते पुढे म्हणाले, ''सर्वसामान्य माणसांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे प्रेरणा निर्माण झाली. त्याची मानसिकता बदलली. त्यामुळे माझा बाप घडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शिकवण म्हणजे दलित बहुजन समाजाची आत्मप्रतिज्ञा आहे आणि त्याचे प्रतीक माझा बाप आहे. शाळेच्या जगात काही न शिकलेला माझा बाप जगाच्या शाळेतल्या सगळ्या डिग्र्या कोळून प्यायला होता. इतर कुठलेही नाही, तर फक्त इच्छाशक्तीचे पाठबळ बापाकडे होते. बापाने वेगळा विचार करून आम्हाला शिकवले. म्हणून आमची प्रगती झाली. या वेगळ्या विचाराची प्रेरणा त्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे मिळाली. म्हणून माझ्यात आणि माझ्या बापामधील मूकनायक डॉ. आंबेडकर आहेत.''

### * 'आत्मकेंद्रित अभिजनवादाने विघटनाचा धोका'

तळागाळातील गोरगरीब जनता आणि राष्ट्रीय हिताकडे डोळेझाक करणाऱ्या आत्मकेंद्रित नेतृत्वामुळे देशात सामाजिक-सांस्कृतिक विघटनाचा धोका आहे. आणि केवळ या अभिजनवादी प्रवृत्ती म्हणजेच समाज असल्याचे भासविणाऱ्या भाषक वृत्तपत्रांकडून 'लोकशाहीचा चौथा स्तंभ' या लौकिकाची प्रतारणा होण्याची शक्यता आहे, असे मत 'लोकसत्ता'चे संपादक कुमार केतकर यांनी व्यक्त केले.

पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभागाच्या वतीने 'प्रादेशिक भाषांमधील वृत्तपत्रे- नवा कालखंड, नवी आव्हाने' या विषयावरील राष्ट्रीय परिषद आयोजित

करण्यात आली होती. तिच्या उद्‌घाटनाच्या सत्रात केतकर यांचे बीजभाषण झाले. 'सकाळ'चे व्यवस्थापकीय संचालक संपादक प्रतावराव पवार यांनी परिषदेचे उद्‌घाटन केले. ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक प्रा. अरुण साधू अध्यक्षस्थानी होते. विभागप्रमुख डॉ. किरण ठाकूर यांनी प्रास्ताविक केले. उज्ज्वला बर्वे यांनी सूत्रसंचालन केले.

केवळ आत्मकेंद्रित राजकीय-आर्थिक व सामाजिक नेतृत्व आणि मध्यमवर्गीयांचेच प्रतिनिधित्व करण्यात धन्यता मानण्याकडे भाषक वृत्तपत्रांचा कल वाढतो आहे. वास्तविक, तळागाळातील जनतेचे खरे प्रतिनिधी म्हणून वृत्तपत्रांना 'लोकशाहीचा चौथा स्तंभ' म्हणून संबोधिले जाते. परंतु, अभिजनवादी संस्कृती म्हणजे समाज असे चित्र निर्माण करून नागरी आणि राष्ट्रीय हितांकडे वृत्तपत्रे पाठ फिरवीत आहेत की काय, असा प्रश्न विचारण्यास वाव आहे.

### * फाळकेंपूर्वी मूकपट काढणारे दादासाहेब तोरणे

भारतीय चित्रपटसृष्टीचे आद्य जनकत्व दादासाहेब फाळके यांना दिले जाते, पण त्यांच्यापूर्वीही मूकपट काढून भारतीय सिनेमाचे खरे 'दादा' रामचंद्र गोपाळ उर्फ दादासाहेब तोरणे मात्र आजही अज्ञातच आहेत! 'फाळके' यांचा 'राजा हरिश्चंद्र' लागण्यापूर्वी एक वर्ष आधी तोरणे यांचा 'पुंडलिक' हा सिनेमा मुंबईत झळकला. भारतीय सिनेमाला ९५ वर्षे पूर्ण होत असताना पुणेकर तोरणेंचे पहिलेच ज्ञात चरित्र अभ्यासक शशिकांत किणीकर यांनी लिहिले आहे. पारस प्रकाशनाच्या 'भारतीय चित्रपटसृष्टीचे आद्य जनक दादासाहेब तोरणे' या पुस्तकाचे प्रकाशन ४ फेब्रुवारी रोजी ज्येष्ठ अभिनेते चित्तरंजन कोल्हटकर यांच्या हस्ते आणि ज्येष्ठ दिग्दर्शक प्रभाकर पेंढारकर यांच्या उपस्थितीत झाले. तोरणे यांच्या 'भक्त प्रल्हाद' या सिनेमात प्रल्हादाची भूमिका करणाऱ्या मास्टर मोहन (कर्वे) यांचाही सत्कार या वेळी झाला.

भारतीय सिनेमाचे नवे पर्व निर्माण करणारा सिनेमा म्हणून 'पुंडलिक'चे त्याकाळात 'द टाइम्स ऑफ इंडिया'नेही कौतुक केले होते. 'प्रभात फिल्म कंपनी'पूर्वी स्वत:ची सरस्वती सिनेटोन ही सिनेमा निर्मिती करणारी कंपनी काढणारे, तसेच 'आलम आरा' या पहिल्या बोलपटाच्या निर्मितीस प्रेरणास्थान म्हणून तेव्हा तोरणे यांच्याकडे पाहिले जात होते.

### * पुण्यात भव्य 'लिटररी मॉल'

मराठी भाषा, मराठी वाचन यांची बुडत चाललेली नौका तारण्याचा प्रयत्न अनेक प्रकारे सुरू असताना 'रसिक साहित्य' आणि 'रसिक आंतरभारती' आता खास मराठी पुस्तकांचे तीन मजली भव्य 'लिटररी मॉल्स' येत्या एक वर्षात उभारणार असून या मॉल्सचे केंद्र पुण्यात असणार आहे.

ह्या अद्ययावत लिटररी मॉलमध्ये प्रादेशिक भाषेतील प्रकाशकांना स्थान देण्यात



येणार असून, मराठीतून इतर भाषांमध्ये अनुवाद झालेल्या पुस्तकांचाही या ठिकाणी मोठा संग्रह असेल. १४ प्रादेशिक भाषांमधील नावाजलेल्या लेखकांची पुस्तकेही येथे बघायला मिळणार आहेत.

'रसिक साहित्य' आणि 'रसिक आंतरभारती' यांच्यातर्फे आठ हजार चौरस फुटांच्या जागेत पुणे आणि मुंबई येथे हे मॉल बांधले जात असून त्याचे तिन्ही मजले खास पुस्तकांसाठीच असतील. केवळ पुस्तकांची खरेदीच नव्हे, तर तेथे बसून वाचन करणाऱ्यांसाठी संदर्भग्रंथालयाची सोयही असेल. पुस्तकांबरोबर सीडी, डीव्हीडी उपलब्ध असतील.

### * मराठी साहित्यिकांच्या सेवेत आता 'लिटररी एजन्सी'

मराठी साहित्य वाचकांपर्यंत परिणामकारकरित्या पोहोचवण्यासाठी पुण्याची कॉन्सेप्ट मिडिया सर्व्हिसेस प्रा. लि. 'लिटररी एजन्सी' सुरू करत आहे. कंपनीने तशी घोषणा नागपूरला सुरू असलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे औचित्य साधून केली आहे.

'कॉन्सेप्ट मीडिया' ही कंपनी इलेक्ट्रॉनिक आणि प्रकाशन व्यवसायात कार्यरत असून लवकरच 'ऑनलाइन बुकशॉप' सुरू करणार आहे. साहित्यिकांचे कोणत्याही प्रकारचे लिखाण तज्ज्ञांकडून तपासून घेणे, आवश्यकता असल्यास त्यात योग्य ते बदल करण्यास लेखकाला सांगणे, लिखाणाला प्रकाशक मिळवून देणे तसेच साहित्यकृतीचा मोबदला लेखकाच्या हाती पडेल, अशी सेवा 'लिटररी एजन्सी' देणार आहे. संपर्क : ०२०-२४४३२४३५

### * संगणकीय जाळे जोडणार देशातील ७००० संस्था

सध्याच्या ज्ञानयुगात शैक्षणिक आणि संशोधनात्मक माहितीची वेगाने देवाण-घेवाण करणे शक्य व्हावे यासाठी देशातील १५० शहरांतील सुमारे सात हजार शैक्षणिक व संशोधन संस्था संगणकीय जाळ्याने एकमेकांना जोडल्या जाणार आहेत. राष्ट्रीय ज्ञान आयोगाने यासंबंधीचा आराखडा तयार केला असून, पुढील वर्षी हे ज्ञानाचे जाळे (नॉलेज नेटवर्क) प्रत्यक्ष अस्तित्वात येईल.

राष्ट्रीय ज्ञान आयोगाचे सदस्य-सल्लागार आणि पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अशोक कोळस्कर यांनी ही माहिती दिली. देशात उपलब्ध असलेल्या 'बँडविड्‌थ'चा उपयोग करून पहिल्या टप्प्यात संस्थांच्या आवारापर्यंत हे जाळे नेले जाईल. त्यानंतर संस्थांनी त्यांच्याकडे उपलब्ध पायाभूत सुविधांचा वापर करून संपूर्ण आवारात हे जाळे पसरेल याची जबाबदारी घ्यायची आहे. ज्या संस्थांत हे जाळे पसरेल त्यातील विद्यार्थी व संशोधकांना या जाळ्याचा उपयोग करून एकमेकांशी संवाद साधणे, माहितीची देवाण-घेवाण करणे शक्य होईल. 'डिजिटल लायब्ररी ऑफ इंडिया'ने विविध भाषांतील सुमारे अडीच लाख पुस्तकांचे

'डिजिटलायझेशन' केले आहे. ही पुस्तकेही 'डाउनलोड' करता येतील. ''संस्थांच्या उंबरठ्यांपर्यंत 'बँडविड्‌थ' मोफत उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. आवारातील पायाभूत सुविधा मात्र संस्थांनी निर्माण करायच्या आहेत. त्यासाठी संस्था वापरकर्त्याला काही शुल्क आकारू शकतील, संशोधनाचा दर्जा उंचवावा यासाठी हे प्रयत्न सुरू आहेत,'' असे डॉ. कोळस्कर यांनी सांगितले.

*** 'आंदोलन'चे प्रकाशन**

'दलित साहित्याची चाकोरी मोडण्याचा धाडसी प्रयत्न धर्मराज निमसरकार यांनी आपल्या कथालेखनातून केला आहे,'' असे मत ज्येष्ठ लेखक ह. मो. मराठे यांनी व्यक्त केले.

श्री. निमसरकार लिखित 'आंदोलन' या कथासंग्रहाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. अध्यक्षपदी 'अस्मितादर्श'कार डॉ. गंगाधर पानतावणे होते.

श्री. मराठे म्हणाले, ''गेल्या पंचवीस-तीस वर्षांत दलित जीवनाचे चित्रण म्हणजेच दलित साहित्य अशी चाकोरी झाली आहे; तिचा भेद करण्याचे काम निमसरकार यांनी केले आहे. औद्योगिक जीवन, कामगारांचे जगणे यांचा तीव्रपणाने घेतलेला अनुभव प्रत्ययकारीपणाने मांडणाऱ्या या कथा आहेत.'' दलितांचे माणूसपण वस्तुनिष्ठपणे व्यक्त करणारे लेखन अशा शब्दांत डॉ. पानतावणे यांनी या लेखनाचे कौतुक केले. दलित आणि कामगारांचे अनुभव, दु:ख, अन्याय, संघर्ष यांचा सल या लेखनातून अस्सलपणे मांडला आहे, असेही ते म्हणाले. डॉ. जाधव यांनी 'नाकारले गेलेल्यांची ठसठस मांडणाऱ्या कथा' असे या लेखनाचे वर्णन केले. कथांतील व्यक्तिरेखांकडेही उमदेपणाने पाहणारे हे लेखन आहे, असे त्यांनी सांगितले.

*** भारतातील भाषा-लिपींचे वैविध्य अभिमानास्पद- गुलजार**

''इतिहासापलीकडचे भाषासौंदर्य जगासमोर आणण्यात भारतीय भाषांची कामगिरी सर्वांत मोठी आहे. आपल्याकडे असणारे भाषा-लिपींचे वैविध्य अभिमानास्पद आहे. एक भाषाप्रेमी म्हणून मला हे वैशिष्ट्य महत्त्वाचे वाटते,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ दिग्दर्शक, गीतकार गुलजार यांनी केले.

श्री. गुलजार म्हणाले, ''मी सर्वप्रथम लेखक आहे आणि नंतर चित्रपट दिग्दर्शक, गीतकार, पटकथा आणि संवादकार आहे. कथा; त्यातही लघुकथा हे माझे पहिले प्रेम आहे. मोजक्या शब्दांत नेमका आशय या आकृतिबंधात मांडता येतो, असे मला वाटते. मी अनेकदा हा साहित्यप्रकार वापरला आहे. माझ्या काही चित्रपटांच्या कथांची बीजेही माझ्याच लघुकथांमधून आली आहेत.'' अलीकडे सर्व भारतीय भाषांतून स्त्रिया मोठ्या प्रमाणावर लेखन करू लागल्या आहेत, हीदेखील आनंदाची बाब आहे, असे त्यांनी सांगितले.



''अलीकडे तंत्रज्ञानाच्या वेगामुळे साहित्य आणि चित्रपटांची भाषाही बदलली आहे. ती अधिक 'दृश्यात्मक' बनली आहे. मात्र ती विनाशाकडे चालली आहे, असे मला वाटत नाही. बदल हा स्थायीभाव असल्याने त्याला प्रतिसाद द्यायलाच हवा. शिवाय चित्रपटांचा इतिहास फक्त शंभर-दीडशे वर्षांची समृद्ध परंपरा आहे, हा फरक आपण लक्षात घेतला पाहिजे. बदल स्वीकारत आजचे लेखक, कलाकार, दिग्दर्शक आणि प्रेक्षकही नवे अर्थ शोधण्याचा प्रयत्न करत आहेतच. माझ्या मते कुसुमाग्रज आणि विजय तेंडुलकर हे अस्सल लेखक. मी त्यांना 'फ्रंटलाईन वॉरिअर्स' म्हणतो. त्यांनी संघर्ष करत जे अन्वयार्थ त्यांच्या लेखनातून प्रकट केले त्याची महती जाणली पाहिजे'' असे ते म्हणाले.

*** बहुभाषिकत्व सर्जनशीलतेला पूरक**

बहुभाषिकत्व ही सर्जनशीलतेला पूरक गोष्ट आहे, हे समाजाला समजावण्याची जबाबदारी साहित्यिकांची आहे, असे मत ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांनी व्यक्त केले.

प्रा. जयंतकुमार त्रिभुवन यांच्या 'साहेब छाया' या कवितासंग्रहाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. सुधीर मोघे, डॉ. रवींद्र घवी, अर्चना त्रिभुवन, अशोक त्रिभुवन, 'कॉंटिनेंटल प्रकाशन'चे अनिरुद्ध कुलकर्णी हे व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रा. जाधव पुढे म्हणाले, ''गेयता आणि वैविध्य हे त्रिभुवन यांच्या कवितेचे वैशिष्ट्य आहे. कवितेच्या माध्यमातून त्यांनी स्वत:वर प्रेम केले आणि 'स्व'चे विधानही केले आहे. त्यांची प्रवृत्ती आत्मलोपाची असल्याने त्यांच्या कवितेत बाह्यत: वा अंतर्गत संघर्ष आढळत नाही. सारे संघर्ष मिटवणारे व्यवस्थापन त्यांच्याजवळ असल्याने हे शक्य झाले असावे. त्यांची श्रद्धा अर्जित नाही. श्रद्धा त्यांनी सहज स्वीकारली होती. हे बहुभाषिक होते. भाषांमधील नाती त्यांनी जाणली होती.

*** सोळावे प्रबोधन संमेलन**

साहित्य हे सर्व विभागाचे अंग असल्याने साहित्यिक व राजकीय वाद खरे पाहता यापूर्वीच संपायला हवा होता, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. सदानंद मोरे यांनी केले.

उंडाळे (ता. कराड) येथे ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी दादासाहेब उंडाळकर यांच्या ३३ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित १६ व्या समाज प्रबोधन मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. व. बा. बोधे होते.

प्रा. मोरे म्हणाले, ''साहित्यातून समाजाचे चलनवलन होते. साहित्य हे प्रत्येक क्षेत्रात आहे. त्यामुळे समाजाचे ते अंग आहे. राजकारण आणि साहित्य हे जरी वेगळे असले तरी साहित्यातून राजकारणाची दिशा ठरते. त्यामुळे साहित्यिक

आणि राजकीय वाद हा तात्पुरता असावा. साहित्यिकांना राज्यकर्त्यांनी योग्य ती पदे व जागा द्यावी यासाठी साहित्यिकांनी वाद करावा. साहित्यिक व राजकारणी वाद हा खरे पाहता एकदा झाला होता तो आता मिटायला हवा होता,'' असे मत त्यांनी मांडले.

### * सुलोचना चव्हाण यांच्या आत्मवृत्ताचे प्रकाशन

लालबागमध्ये ठेका धरणारी लावणी सारस्वतांच्या वारसदारांसमोर आज आपली अदाकारी पेश करीत असल्याचा आनंद अवर्णनीय आहे, असे उद्‌गार केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी सुलोचना चव्हाण यांच्या आत्मवृत्ताचे प्रकाशन करताना काढले. 'माझं गाणं... माझं जीवन' या त्यांच्या आत्मवृत्ताचे प्रकाशन करताना शिंदे यांनी सुलोचनाबाईंचा गौरव केला. शृंगारामध्ये भक्ती नसेल, तर तो शृंगार श्रेष्ठ नाही, असे सांगून लावणी गाताना हार्मोनिअम आणि तबल्याच्या साथीबरोबर असलेला टाळ म्हणजेच भक्ती असे मत मांडले. डोक्यावर पदर घेऊन खाली मान घेऊन गाणाऱ्या सुलोचनाबाईंना पाहिल्यावर 'एकच प्याला'मधील सिंधूची आठवण होते. कविवर्य राम जोशी यांनी लावणी लिहिली म्हणून त्यांना वाळीत टाकले होते, पण आज लावणी सुसंस्कृत घराण्यात जाऊन बसल्याचा आनंद वाटतो, असेही ते म्हणाले.

### * शाहीर विठ्ठल उमाप यांना गौरववृत्ती प्रदान

राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळाची २००६-२००७ ची गौरववृत्ती कलेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेले शाहीर विठ्ठल उमाप व समीक्षक डॉ. म. सु. पाटील यांना प्रदान करण्यात आली. २५ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल-श्रीफळ-पुष्पगुच्छ असे तिचे स्वरूप आहे.

नवलेखक अनुदान योजनेच्या अंतर्गत देण्यात येणारे यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार व सरफोजीराजे भोसले पुरस्कार ना. अशोक चव्हाण यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. प्रमोद माने (कोरडवाहू- काव्यसंग्रह), नीलिमा नाडकर्णी (तरंग- कथासंग्रह), विजय झुंजारराव (ग्रहण- नाटक), हर्षदा वेदपाठक (सिनेमा : एक अभ्यास- ललित गद्य) व प्रमोद भोगटे (उत्कृष्ट प्रकाशनाचा पुरस्कार) यांचा समावेश आहे.

### * अखंड शब्दार्थकोश

शब्द आणि त्याची व्युत्पत्ती जाणून घेणे हा ज्यांचा जिव्हाळ्याचा विषय आहे त्यांच्यासाठी 'अखंड मराठी शब्दार्थकोश' तयार होत आहे. विशेष म्हणजे 'डिजिटल' स्वरूपातही तो उपलब्ध होईल.

पॉप्युलर प्रकाशनाचे सदानंद भटकळ, रामदास भटकळ व 'सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ फॉरिन लँग्वेजेस'चे माजी कुलगुरू, ज्येष्ठ भाषातज्ज्ञ डॉ. प्रमोद तलगेरी



यांनी यासाठी पुढाकार घेतला आहे. राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष मधू मंगेश कर्णिक यांच्याशी याबाबत प्राथमिक चर्चा झाली आहे.

डॉ. तलगेरी म्हणाले, ''मराठी शब्दांचे मराठीत अर्थ सांगणारे चांगले शब्दकोश सध्या उपलब्ध नाहीत. पूर्वी काही शब्दकोश तयार झाले; परंतु ते वैयक्तिक पातळीवरील आहेत. त्यानंतर सातत्याने संस्थात्मक काम झालेले नाही. मराठी भाषेत सध्या अनेक व्यावहारिक शब्दही येत आहेत. अशा वेळी एखादा सर्वंकष 'शब्दार्थ कोश' तयार केल्यास प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांपासून लेखक, विज्ञानशाखेतील तज्ज्ञ यांना उपयुक्त ठरेल.

### * 'अंगात 'वात्रटपणा' असेल तरच विनोद करता येतो'

अंगात वात्रटपणा असेल तरच विनोद करता येतो, असे मत निवेदक सुधीर गाडगीळ यांनी निगडी येथे व्यक्त केले. मुलाखत घेताना कसे बोलावे आणि कसे बोलू नये, हे पुण्यातच शिकलो, असेही ते म्हणाले.

राजकारणी ते कलावंत, रस्त्यावरील माणूस ते उद्योगपती अशा अनेक क्षेत्रातील मान्यवरांच्या मुलाखती घेऊन त्यांच्या विविध पैलूंचे दर्शन गाडगीळ यांनी घडवले. पु. ल. देशपांडे यांच्याकडून शब्दांची मांडणी, आचार्य अत्रे यांच्याकडून 'वाटेला' जाणाऱ्या माणसाला त्याची जागा कशी दाखवतात हे शिकलो. इंदिरा गांधी यांची स्मरणशक्ती, शरद पवार यांची संस्मरणीय मुलाखत, बाळासाहेब ठाकरे आणि पं. भीमसेन जोशी यांचा दिलखुलासपणा, लता मंगेशकर यांचा मिश्कीलपणा, माधुरी दीक्षितचा निखळपणा, अमिताभ बच्चन व आचार्य रजनीश यांच्या आवाजाचा नाद विलक्षण असल्याचे त्यांनी सांगितले. आशा भोसले या सर्वाधिक आवडत्या कलावंत असल्याचे सांगतानाच गाडगीळ यांनी राष्ट्रपती अब्दुल कलाम यांचा सहवास अविस्मरणीय ठरल्याचे नमूद केले.

### * जर्मन युवतीने लिहिलेले मराठी नाटक!

''नाटकदेखील कवितेसारखे 'सुचावे' लागते. ते बेतता किंवा आखता येत नाही. आपल्या जाणिवा तीव्र असतील, तर भोवतालचे वातावरण हाच रंगमंच होतो, त्यातील घटना, नाती प्रसंग बनतात, त्यांचे संवाद तेच म्हणू लागतात...'' असे मत जर्मन अभ्यासक पेट्रा शेमाखा यांनी मराठीत लिहिलेल्या नाटकाच्या संदर्भात व्यक्त केले.

'मराठी' भाषेतील नाटकांच्या प्रेमापोटी पेट्रा यांनी भारतात राहून, मराठी भाषा आत्मसात केली. एवढेच नव्हे, तर मराठी भाषेत नाटकही लिहिले आणि त्याचे दिग्दर्शनही त्या सध्या करत आहेत. या नाटकाचा प्रयोग २३ फेब्रुवारीला 'जागर'तर्फे केला गेला. 'याचे नाव फक्त तुम्हाला माहीत आहे' (ओन्ली यू नो द नेम ऑफ धिस) असे या नाटकाचे शीर्षक आहे.

"सध्या मी मराठी रंगभूमी- परंपरा आणि आधुनिक युग' असा संशोधनाचा विषय निवडला आहे. त्यासाठी २००५ पासून डॉ. सुचेता परांजपे यांच्याकडे मराठी शिकत आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच माझे लेखन शक्य झाले आहे. मराठीमध्ये लिहिताना फारशी अडचण आली नाही. क्वचित आली तेव्हा शब्दकोश मदतीला आले. नाटकाचा विषय कथाविशिष्ट नाही. आपल्या भोवतालचे, भेटणाऱ्या व्यक्तींचे, त्यांच्यातील नात्यांचे हे शब्दरूप आहे,'' असे मत त्यांनी व्यक्त केले.

## * कामगार प्रबोधन साहित्य संमेलन

''भारतीय कामगार चळवळीचे जनक रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे यांच्या कार्याची माहिती नव्या पिढीला देण्याची गरज असून त्यामुळे कामगार चळवळीपुढे आदर्श निर्माण होईल,'' असे प्रतिपादन कविवर्य नारायण सुर्वे यांनी महाराष्ट्र कामगार साहित्य परिषद व पिंपरी-चिंचवड श्रमिक पत्रकार संघ आयोजित कामगार प्रबोधन संमेलनाच्या उद्‌घाटनप्रसंगी केले. उद्योजक विजय धाडवे यांच्या अध्यक्षतेखाली चिंचवड येथील एस. के. एफ. सभागृहात हे संमेलन झाले.

श्री. सुर्वे आपल्या जीवनप्रवासाचे वर्णन करताना म्हणाले, ''सध्या साहित्य ही ठराविक वर्गाची मक्तेदारी न राहिल्याने सर्वच समाजातील साहित्यिकांच्या सध्या नावलौकिक वाढत आहे. ही सामाजिक एकोप्याच्या दृष्टीने चांगली बाब आहे. कामगार कवींची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे कामगार साहित्यही संपन्न होत आहे.''

यावेळी 'कामगार चळवळीचा उगम, स्थित्यंतरे, सद्य:स्थिती व भवितव्य' या विषयावरील परिसंवाद झाला. कामगार चळवळीच्या स्थापनेपासून टाटा मोटर्सच्या लढ्यापर्यंतची माहिती श्री. पुरुषोत्तम सदाफुले यांनी दिली.

## * 'हार्वर्ड'च्या कुलगुरुपदी प्रथमच महिलेची नियुक्ती

'हार्वर्ड' विद्यापीठाच्या ३७१ वर्षांच्या इतिहासात ड्यू गिल्पिन फाउस्ट (वय ५९) या महिलेची कुलगुरुपदी प्रथमच नियुक्ती झाली. फाउस्ट या इतिहासाच्या प्राध्यापिका असून, 'अमेरिकेतील नागरी युद्ध' हा त्यांच्या संशोधनाचा विषय आहे.

''हार्वर्ड विद्यापीठाने १६३६ पासून या घटनेची प्रतीक्षा केली आहे,'' या शब्दात इतिहासाच्या प्राध्यापिका पॅट्रिशिया ग्रॅहम यांनी त्यांच्या निवडीचे वर्णन केले. फाउस्ट यांनी पाच पुस्तके लिहिली असून, यापूर्वी पेनसिल्वानिया विद्यापीठात त्या इतिहास आणि महिलाविषयक अभ्यासाच्या प्राध्यापिका होत्या.

## * रॉय किणीकरांचे साहित्य

कलंदर कवी, लेखक, नाटककार आणि संपादक दिवंगत रॉय किणीकरांच्या जन्मशताब्दी वर्षात त्यांचे साहित्य १२ पुस्तकांच्या रूपात प्रकाशित होणार आहे. डायमंड पब्लिकेशनतर्फे प्रकाशित होणाऱ्या या पुस्तकांत चार नाटके, दोन एकांकिका, एक कादंबरी, बालसाहित्य, कवितासंग्रह आणि सहा अनुवादांचा समावेश आहे.

अनिल किणीकरांना वडिलांच्या सापडलेल्या ग्रंथसंपदेत 'येगं येगं विठाबाई', 'खजिन्याची विहीर', 'किती रंगला खेळ' ही नाटके, 'आंधळे रंग, पांगळ्या रेषा' हा कथासंग्रह, साऊंड ट्रॅक' आणि 'देव्हारा' हा एकांकिका संग्रह, 'कोनार्क' या कादंबरीचा समावेश आहे.

किणीकरांवर लवकरच लघुपट, तसेच स्वतंत्र वेबसाईट तयार करण्याची योजना आहे.

## * भाषा आणि जीवन- रौप्यमहोत्सव

''वाढत्या नागरीकरणामुळे मराठी भाषा मागे पडत आहे. मराठी भाषेचे स्वत्व टिकविण्यासाठी बोली भाषेतील शब्दांचा पाठ्यपुस्तकात वापर केला पाहिजे,'' असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष मधु मंगेश कर्णिक यांनी केले.

मराठी अभ्यास परिषदेच्या 'भाषा आणि जीवन' या त्रैमासिकाच्या रौप्यमहोत्सवी अंकाचे प्रकाशन श्री. कर्णिक यांच्या हस्ते झाले. डॉ. मॅक्सिन बर्नसन, डॉ. मृणालिनी शहा, डॉ. कल्याण काळे, डॉ. सरोज भाटे व डॉ. नीलिमा गुंडी व्यासपीठावर उपस्थित होते.

''मराठी भाषा शाश्वत आहे. त्याचा अभ्यासही न संपणारा आहे. मराठी लेखकांच्या माध्यमातून भाषेत नवीन शब्द रूढ केले पाहिजेत,'' असे सांगून श्री. कर्णिक म्हणाले, ''परभाषेच्या आक्रमणाची भीती न बाळगता अभ्यासकांनी मराठी भाषा विकसित केली पाहिजे. भाषेच्या प्रसार, प्रचारापेक्षा विकासाकडे लक्ष दिले पाहिजे. भाषेतील जुने शब्द टिकवून नवीन शब्द वापरात आणण्याची आवश्यकता आहे.''

''भाषेविषयी समाजजागृती करण्याचे काम सरकार करू शकते. धोरणांची अंमलबजावणी करणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांची संवेदनक्षमता याबाबत जागृत केली पाहिजे,'' असे श्री. कर्णिक यांनी सांगितले.

## * शाळा तेथे ग्रंथपाल हा ठराव अभिनंदनीय

नागपूर येथे पार पडलेल्या अ. भा. साहित्य संमेलनात शाळा तेथे पूर्णवेळ ग्रंथपाल हा ठराव संमत करण्यात आला. हा ठराव शैक्षणिक क्षेत्राला व वाचनसंस्कृतीला दिलासा देणारा आहे.

आजतागायत सर्वांचा शालेय ग्रंथालयाकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा उदासीनतेचा होता. चिपळूणकर समितीच्या शिफारशीनुसार १९९४ मध्ये विद्यार्थीसंख्येच्या

निकषावर ग्रंथपालपद नव्याने निर्माण करण्यात आले. ५०१ विद्यार्थ्यांपर्यंत अर्धवेळ तर १००१ विद्यार्थीसंख्येपर्यंत पूर्णवेळ ग्रंथपाल अशा प्रकारचे हे निकष आहेत. परंतु मध्यंतरीच्या काळात बरेच अर्धवेळ ग्रंथपाल हे पात्र असतानासुद्धा त्यांना पूर्णवेळ सामावून घेतले नाही. त्यामुळे बराच काळ अर्धवेतनावर त्यांना निर्वाह करावा लागला.

आजही राज्यात विद्यार्थीसंख्येच्या जाचक अटीमुळे बरेच ग्रंथपाल अर्धवेळ म्हणून दयनीय परिस्थितीत काम करीत आहेत, तर ९००० शाळांमध्ये ग्रंथपालच नाहीत. केवळ विद्यार्थीसंख्येच्या निकषामुळे राज्यातील विद्यार्थी ग्रंथवाचनापासून वंचित राहत असतील तर ही बाब राज्याच्या प्रतिष्ठेला भूषणावह नाही.

अलीकडे नवीन शैक्षणिक धोरण, नव्याने अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आलेले पर्यावरण, संगणक, मूल्यशिक्षण, सामान्यज्ञान, माहिती मार्गदर्शन यासाठी ग्रंथालय गरजेचे झाले आहे. अभ्यासक्रमात होणारे बदल, ज्ञानशाखेत झालेली सखोल वाढ यामुळे विद्यार्थ्यांची पूरक वाचनाची गरज वाढली आहे. तंत्रज्ञानाच्या युगात अध्यापकांनासुद्धा विविध संदर्भग्रंथ उपलब्ध झाले तर त्यांच्यातील अध्ययन सुलभ व प्रभावी होईल.

या सर्व बाबींची दखल अ. भा. मराठी साहित्य महामंडळाने गांभीर्याने घेऊन शाळा तेथे पूर्णवेळ ग्रंथपाल असा ठराव पारित केला.

हा ठराव पारित केल्याबद्दल अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे वाशिम येथील जिल्हा ग्रंथपाल संघाने आभार मानले आहेत.

❒


## वि. स. वाळिंबे यांची पुस्तके

**कादंबरी**
कथा ही दिवावादळाची (अनु.) १००

**राजकीय** *(अनुवादित)*
वुइ, दि पीपल **(नानी पालखीवाला)** १५०
वुइ, दि नेशन **(नानी पालखीवाला)** २५०

**युद्धविषयक**
वॉर्सा ते हिरोशिमा ४००
**(सोव्हिएत लँडचा नेहरू पुरस्कार १९८४, म.राज्य ह.ना.आपटे पुरस्कार १९८४)**

**चरित्रे / व्यक्तिचरित्रे**
नेताजी (सुभाषचंद्र बोस) ३५०

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
पोस्टेज खर्च वेगळा





## आनंद यादव यांची पुस्तके

**आत्मचरित्र**
झोंबी २५०
**(प्रियदर्शनी पुरस्कार १९८८, म.राज्य पुरस्कार १९८९,रत्नाप्पा कुंभार पुरस्कार१९८९,एफ. आय. पी पुरस्कार १९८९,साहित्य अकादमी पुरस्कार १९९०, मारवाडी संमेलन पुरस्कार १९९०, प्रवरानगर विखे पाटील पुरस्कार १९९१,संजीवनी साहित्य पुरस्कार १९९४,)**
नांगरणी २२०
**(रोहमारे ग्रामीण पुरस्कार १९९०)**
घरभिंती ३००
काचवेल २२०

**कादंबरी**
लोकसखा ज्ञानेश्वर ३५०
माऊली १२०
**(कालीमाता साहित्य पुरस्कार १९८६, परिमल लेखन पुरस्कार १९८६)**
नटरंग १४०
**(महाराष्ट्र राज्य पुरस्कार १९८२)**
कलेचे कातडे २००

**कथासंग्रह**
माळावरची मैना ११०
घरजावई १००
शेवटची लढाई ९०
**(राज्य पुरस्कार २००१-०२)**
उखडलेली झाडं १५०
भूमिकन्या ९०
झाडवाटा ९०
उगवती मने १००
**(राज्य पुरस्कार २००२-०३)**

**बाल-कुमार साहित्य**
सैनिक हो, तुमच्यासाठी... ३०

**वैचारिक / ललितगद्य**
स्पर्शकमळे १००
पाणभवरे १२५
ग्राम संस्कृती १२५
**(रा. ना. सबनीस वाङमय पुरस्कार २००२)**
साहित्यिकाचा गाव ९०

**संदर्भ ग्रंथ**
ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव ५५
**(राज्य पुरस्कार १९८३)**
साहित्याची निर्मिति प्रक्रिया १३०
मराठी लघुनिबंधाचा इतिहास ७०
आत्मचरित्र मीमांसा ९०
१९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह १५०

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
पोस्टेज खर्च वेगळा

विशेष वार्ता

# ‘ए कॉल टू ऑनर’च्या अनुवादाचे प्रकाशन

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे ज्येष्ठ राजकीय विचारवंत, माजी परराष्ट्र आणि अर्थमंत्री श्री. जसवंतसिंग यांच्या ‘ ए कॉल टू ऑनर’ या आत्मचरित्राच्या मराठी अनुवादाचे प्रकाशन पुण्याच्या टिळक स्मारक मंदिरात १६ फेब्रुवारी रोजी पार पडले.

माजी केंद्रीय मंत्री आणि ज्येष्ठ पत्रकार श्री. अरुण शौरी यांच्या हस्ते हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले. अनेक ज्येष्ठ लष्करी अधिकाऱ्यांनी आणि प्रतिष्ठित मान्यवर, वाचकांनी-श्रोत्यांनी या कार्यक्रमाला भरभरून हजेरी लावली.

प्रकाशनसमारंभात श्री. जसवंतसिंग आणि श्री. अरुण शौरी यांची खुमासदार



**‘ए कॉल टू ऑनर’चे प्रकाशन करताना**
**श्री. अरुण शौरी व श्री. जसवंतसिंग**



भाषणे सर्व रसिकश्रोत्यांना सुखद अनुभव देऊन गेले.

“माझ्याच पुस्तकाबद्दल मी काय बोलू?... लेखकाला स्वत:च्या पुस्तकावर भाष्य करता येणं तसं अवघड काम... हे काम त्यानं वाचकांवर, समीक्षकांवर सोपवावं. आयुष्याचा प्रवाह वेगवेगळे अनुभव घेत कधी वेगानं तर कधी संथ गतीनं जातो. या सर्व अनुभवांचं एकत्रित सार म्हणजे आत्मचरित्र” असे उद्‌गार काढून श्री. जसवंतसिंग म्हणाले,

“स्वतंत्र भारताच्या इतिहासात राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा कार्यकाळ हा सर्वाधिक आव्हानात्मक, खडतर होता. अणुस्फोटाचा धाडसी निर्णय आणि त्यानंतर अमेरिकेने लादलेले निर्बंध, कारगिल युद्ध, विमानाचे अपहरण, संसदेवरील आत्मघातकी हल्ला अशा अनेक दूरगामी परिणाम करू शकणाऱ्या घटना-प्रसंगांनी तत्कालीन सरकारची कठोर परीक्षा पाहिली. या पुस्तकाची मांडणी हा सहा वर्षांचा संघर्षमय कालखंड केंद्रीभूत धरून करण्यात आली आहे.


‘लेखनातून पुस्तकनिर्मिती ही प्रसववेदनाच... पुरुष असूनही प्रसववेदनेचा अनुभव मला या पुस्तकाद्वारे मिळाला.’ अशा शब्दांत श्री. जसवंतसिंग यांनी पुस्तक निर्मितीविषयी आपले मत प्रकट केले.




**मनोगत व्यक्त करताना श्री. जसवंतसिंग**

पुण्याच्या राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीत (N.D.A.) लष्करी प्रशिक्षण घेतल्यामुळे तत्कालीन पुण्याच्या आठवणींना उजाळा देत जसवंतसिंग म्हणाले, ''लष्करात जाण्याची ओढ होती म्हणून पुण्याला १९५५ साली N.D.A.त प्रशिक्षण घेण्यासाठी आलो. तेव्हा N.D.A.ची नुकतीच उभारणी सुरू होती. आधीच तारुण्यातील जोश आणि उत्साह आणि त्यात लष्करी प्रशिक्षण... त्यामुळे सर्व जगच आपल्या मुठीत आहे असा स्वाभाविक उन्माद व्यक्तिमत्त्वात असायचा. सायकलवरून मुळा-मुठेच्या काठाने पुण्यात फिरायला यायचो. पगडी, उपरणे घातलेले पुरुष... नऊवारी साडी घातलेल्या स्त्रिया दिसायच्या. घराघरांतून पवित्र अभंगवाणीचे सूर कानावर पडायचे... पूर्वीच्या पुण्याला पेशवाईचा, संस्कृतीचा एक सुगंध होता, तो आता लुप्त होत असल्याचे जाणवते. आज सर्वत्र कोलाहल, गोंगाट जाणवतो. जाहिरातींचे बेसुमार फलक रस्त्यारस्त्यावर दृष्टीस पडतात.'' असा उल्लेख करतानाच जसवंतसिंगांनी, ''मात्र पुण्यातच मला विचार करण्याची, कोणतीही गोष्ट मुळापासून समजून घेण्याची आणि स्वयंअनुशासनाची सवय लागली'' असे नमूद केले.

ज्येष्ठ पत्रकार व माजी केंद्रीय मंत्री श्री. अरुण शौरी यांनी जसवंतसिंगांच्या नेतृत्वगुणांचा, तसेच विविध मंत्रीपदांची जबाबदारी सांभाळताना घेतलेल्या



**विचार व्यक्त करताना श्री. अरुण शौरी**



सक्षम व संतुलित निर्णयप्रक्रियांचा परिचय करून दिला. ते म्हणाले, ''श्री. जसवंतसिंग यांचा पहिला परिचय एक लेखक म्हणून झाला. 'डिस्ट्रिक्ट डायरी' अशा शीर्षकाखाली ते वृत्तपत्रातून स्तंभ लिहीत. राजधानी दिल्लीत घडणाऱ्या राजकीय घडामोडींचा ग्रामीण भागावर नेमका काय परिणाम होतो, याचे उत्कृष्ट चित्रण ते या स्तंभातून करीत. हा स्तंभ मी नियमित वाचत असे. एका संवेदनशील, सजग लेखकाचे दर्शन यातून घडले. पुढे कालौघात केंद्रीय मंत्रीमंडळात त्यांच्यासमवेत काम करण्याची संधी मला मिळाली. त्यावेळी त्यांच्या नेतृत्वगुणांची प्रचिती आली. देशाच्या व्यवस्थेवर कोणताही दूरगामी परिणाम करणारा निर्णय घेताना संबंधित विषयाचा सखोल विचार करून आणि गरज भासल्यास विषयाच्या मूळ ढाच्यात बदल करून योग्य निर्णय घेण्याची त्यांची पद्धत आदर्श अशीच आहे. परराष्ट्रमंत्रीपदी असताना त्यांची कामगिरी उत्कृष्ट म्हणावी अशीच राहिली. जगातल्या बहुतेक राष्ट्रांशी, राष्ट्रप्रमुखांशी राजकीय सौहार्दपूर्ण संबंध ठेवून भारताकडे पाहण्याचा त्यांचा पूर्वग्रहदूषित दृष्टीकोन बदलण्यात जसवंतसिंग यांचा मोलाचा वाटा आहे. भारतीय परराष्ट्र धोरणाबाबत त्यांनी घेतलेले सक्षम निर्णय त्यांच्या आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या सखोल अभ्यासाची, व्यासंगाची जाणीव करून देतात. संरक्षणमंत्री असताना लष्कराच्या रचनेत पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे धोरण त्यांनी आखले. पूर्वाश्रमीचा लष्कराच्या अधिकारपदाचा अनुभव असल्यामुळे या क्षेत्राचेही समूळ आकलन त्यांना होते. लष्कराला विशिष्ट चौकटीत राहू न देता अधिकाधिक लोकाभिमुख करण्याचा जसवंतसिंगांचा प्रयत्न स्तुत्य होता. तत्कालीन सरकारने टेलिकॉम आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रासाठी एक कृतिदल नेमण्याचे ठरविले. त्याच्या अध्यक्षपदी सर्वानुमते जसवंतसिंगांची निवड करण्यात आली. या कृतिदलाने तयार केलेले अहवाल अंमलात आल्यावर देशाच्या प्रगतीत वेगळाच ठसा उमटलेला आपण पाहत आहोत.

केंद्रात नेतृत्वबदल झाल्यानंतर आम्ही ठरविलेल्या बहुतेक योजनांना सध्या स्थगिती देण्यात आली आहे. आजच्या कॅबिनेटमंत्र्यांच्या दर्जा पाहिला तर चिंता वाटण्यासारखी परिस्थिती आहे. अयोग्य लोक निर्णयप्रक्रियेत गेले तर त्याचा तोटा संपूर्ण देशाला बसतो. यासाठी संपूर्ण निवडणूकप्रक्रियाच बदलण्याची आवश्यकता भासते आहे. या परिस्थितीत जसवंतसिंगांसारख्या बहुआयामी व जाणत्या नेतृत्वाची आज गरज आहे. कारण अशा सक्षम व्यक्तीच राजकारणाला योग्य दिशा देऊ शकतात'' अशा शब्दांत अरुण

शौरी यांनी जसवंतसिंग यांचा गौरव केला.

आपल्या खुमासदार भाषणात अरुण शौरी यांनी 'मेहता पब्लिशिंग हाऊस'विषयीचा आपला जिव्हाळा प्रकट केला. अनिल मेहतांशी असलेल्या आपल्या मित्रत्वाचा उल्लेख करून ते म्हणाले,

''अनिलने या कार्यक्रमास हजर राहण्याचा आदेश दिल्यावर मला टाळणे अशक्य होते. आम्हा लेखकांची पुस्तके मराठी वाचकांपर्यंत पोचवण्याचे महत्त्वपूर्ण काम 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ने हाती घेतलं आहे. मान्यवर लेखकाचं पुस्तक प्रकाशित होण्याआधीच भरघोस 'रॉयल्टी' देणारी ही एकमेव प्रकाशनसंस्था आहे.'' यानंतर जसवंतसिंगांना उद्देशून काहीशा मिस्किल स्वरात ते म्हणाले, ''आता जसवंतसिंगांनीही काळजी करू नये. त्यांचे एखादे स्वतंत्र पुस्तक मेहतांतर्फे आले तर त्याचीही 'रॉयल्टी' योग्य वेळी मिळण्याची व्यवस्था केली जाईल.''

'ए कॉल टू ऑनर' या पुस्तकाचे मराठी अनुवादक अशोक पाध्ये यांनी पुस्तकाचा अनुवाद करताना आलेले अनुभव सांगितले. ते म्हणाले, ''जॉर्ज ऑरवेलच्या '१९८४' या कादंबरीचा अनुवाद करताना मला जे अनुभव आले तेच अनुभव पुन्हा ' ए कॉल टू ऑनर' या पुस्तकाचा अनुवाद करताना आले. जसवंतसिंगांची इंग्रजी भाषा अत्यंत उच्च दर्जाची आहे. ऑक्सफर्ड,हार्वर्ड सारख्या नामवंत विद्यापीठात ते मानद प्राध्यापक या नात्याने आमंत्रित केले जातात. जगातल्या बहुतेक राष्ट्रप्रमुखांशी ते प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संपर्कात असतात. आंतरराष्ट्रीय राजकारणात वापरल्या जाणाऱ्या काही पारिभाषिक शब्दांची पेरणी या पुस्तकात करण्यात आली आहे. मराठीत अनुवाद करताना असे काही शब्द मला आडवे आले. मग प्रत्यक्ष जसवंतसिंगांशीच दूरध्वनीद्वारे चर्चा करून या शब्दांचे अर्थ समजावून घेतले. याबाबतीत जसवंतसिंगांचे सहकार्य अत्यंत मोलाचे ठरले.''

या आटोपशीर समारंभात श्री. जसवंतसिंग यांच्या हिंदीतील 'शूर सूरमा' पुस्तकाचेही प्रकाशन करण्यात आले.

या प्रसंगी व्यासपीठावर प्रकाशक अनिल व सुनील मेहता, मेजर जनरल सूरज भाटिया उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिल मेहता यांनी केले. सुनील मेहता यांनी उपस्थितांचे आभार मानले, तर सूत्रसंचालन सुनीता दांडेकर यांनी केले.



विशेष वार्ता

## श्री. जसवंतसिंग आणि श्री. अरुण शौरी यांची 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ला स्नेहभेट.

'ए कॉल टू ऑनर' या आत्मचरित्राच्या मराठी अनुवादाचे प्रकाशन होण्याआधी माजी परराष्ट्रमंत्री श्री. जसवंतसिंग आणि ज्येष्ठ पत्रकार श्री. अरुण शौरी यांनी मेहता पब्लिशिंग हाऊसला स्नेहभेट दिली.

पूर्वघोषित कार्यक्रमानुसार श्री. जसवंतसिंग हे वाचकांना 'ए कॉल टू ऑनर'च्या प्रतींवर स्वाक्षरी देऊन संवाद साधणार होते. श्री. अरुण शौरीही त्यांच्यासमवेत असल्याने या स्वाक्षरी कार्यक्रमास वाचकांची तसेच प्रसिद्धीमाध्यमांच्या प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.

मेहता पब्लिशिंग हाऊतर्फे आयोजित करण्यात येणारा नामवंत लेखकांचा स्वाक्षरी कार्यक्रम वाचकवर्गात परिचित आहे. श्रीमती सुधा मूर्ती, तसलिमा नासरिन, किरण बेदी आदी लेखकांनी यापूर्वी मेहता पब्लिशिंग हाऊसला




**उपस्थित वाचकांना स्वाक्षरी देताना श्री. जसवंतसिंग शेजारी श्री. अरुण शौरी**

भेट देऊन वाचकांशी प्रत्यक्ष संवाद साधला होता. यावेळी श्री. जसवंतसिंगांसारख्या ज्येष्ठ राजकीय विचारवंत, मुत्सद्द्याशी भेटता येणार असल्याने वाचकवर्गात उत्सुकता होती.


प्रत्येक व्यक्तीस हिंदीत संवाद साधून जसवंतसिंगांनी 'ए कॉल टू ऑनर'च्या प्रतींवर स्वाक्षरी दिली. कॉलेज युवकांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व स्तरातील वाचक या कार्यक्रमास उपस्थित होते.

ज्येष्ठ नामवंत पत्रकार श्री. अरुण शौरींशीही उपस्थित वाचकांनी तसेच प्रसिद्धीमाध्यमांच्या प्रतिनिधींनी संवाद साधला.

या प्रसंगी प्रकाशक अनिल मेहता, सुनील मेहता व पुस्तकाचे अनुवादक श्री. अशोक पाध्ये उपस्थित होते.








# ए कॉल टू ऑनर

**उगवत्या भारताच्या जयजयकारासाठी साद**

**जसवंत सिंग | अनु. अशोक पाध्ये**

**४००रु. | पोस्टेज ३०रु.**

भारतीय परराष्ट्र धोरणाला आपल्या तौलनिक कार्यशैलीने यशस्वी आकार देणारे श्री. जसवंतसिंग यांचे हे गाजणारे अनुभवकथन.

अणुचाचण्यांमुळे भारताविरुद्ध गेलेली जागतिक परिस्थिती, आयसी ८१४ या इंडियन एअरलाईन्सच्या विमानाचे अपहरण आणि त्यानंतर तत्कालिन सरकारचे धोरण, कारगिलयुद्ध, अणुबॉंब आणि पाकिस्तानी अस्मिता, संसदेवरील अतिरेक्यांचा हल्ला, अशा अनेक घटनाप्रसंगातील तत्कालिन सरकारची भूमिका स्पष्ट करणारे खळबळजनक पुस्तक.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

# नागपूरचे साहित्य संमेलन

**ऐं**शीवे अ.भा. मराठी साहित्य संमेलन– तेही नागपूरला सुमारे पंचाहत्तर वर्षांनंतर भरलेले– त्यामुळे वैदर्भीय आतिथ्याचा गदारोळ उडणार अशी सर्व साहित्यिकांची भावना असणार. परंतु सुमारे दीडशे लेखक-कवींनाच अधिकृत निमंत्रण दिले गेले; बाकीचे लेखककवी (बिचारे) आज निमंत्रण येईल– उद्या येईल अशी वाट बघत बसले– आणि नागपूर तसे महाराष्ट्रात– उपराजधानीचे शहर– असूनही मुंबई-पुण्याच्या पेपरात संमेलनाच्या कार्यक्रमाबद्दल व इतर तयारीबद्दल बातम्या अजिबातच न दिसल्याने काहीसे गाफीलच! तशात महापालिकांच्या निवडणुका १ फेब्रुवारीला होण्याचे जाहीर झाले. त्यामुळे हे संमेलन २ ते ४ फेब्रुवारीला कसे होणार? ते लांबणीवर पडणार असा काहींचा होरा! पण तो होरा चुकला. त्यामुळे बहुसंख्य लेखककवी या संमेलनापासून दूर राहिले. आता संमेलन झाल्यावर वैदर्भीय आतिथ्याचा योग हुकला म्हणून त्यांना थोडीफार हळहळ वाटणारच! कारण या साहित्यसंमेलनात इतर कार्यक्रमांबरोबर रुचकर साहित्याची मेजवानीही मोठी चमचमीत होती. शुक्रवारी २ फेब्रुवारीला पंचरतन दाल, बुंदी रायता, आलू पालक, राजमा करी, जिलेबी, मठ्ठा, पत्ता गोबी असा बेत होता. दुसऱ्या दिवशी पाटोडी रस्सा, कच्चे भरीत, झुणका-पुरणपोळी, दही बेसन, फोडणीचे वरण, चणादाळ यांचा झणझणीत दणका होता. शेवटच्या दिवशी पनीर बटर मसाला, मेथी मटर, दाल मखनी, व्हेज पुलाव यांचा सौम्य रुचकर बेत होता. साडेसातशे रुपयांच्या शुल्कात आमदार निवासात वास्तव्य आणि एवढे सगळे 'साहित्य' म्हणजे चंगळच!

कार्यक्रमांच्या दृष्टीनेही हे संमेलन भरगच्च होते. तीन दिवस सकाळी दहा-साडेदहापासून रात्री नऊदहा– कधी तर मध्यरात्रीपर्यंतही– नॉनस्टॉप कार्यक्रम होते. कुठलाही कार्यक्रम वेळेवर सुरू करायचा नाही; वेळेवर संपवायचा नाही असे निरंकुश धोरण असल्यामुळे संमेलनाच्या निमंत्रणपत्रिका नावापुरत्या काढल्या असल्या तरी फारशा कोणाला पाठवण्यात आल्या नाहीत. ज्यांनी आवर्जून पत्रिकांची मागणी केली त्यांना 'पन्नास रुपये द्या आणि पत्रिका घ्या' अशी प्रेमळ सूचना केली गेली. पोस्टाचा मोठाच खर्च त्यामुळे वाचला. खर्च वाचवायचा, काटकसरीने थोड्या खर्चात हे संमेलन करून एक आदर्श घालून द्यायचा असा धोरणात्मक निर्णय विदर्भ साहित्य संघाच्या साडेतीन शहाण्यांनी (मनोहर म्हैसाळकर, श्रीपाद भालचंद्र जोशी, नरेश सबजीवाले हे तिघे पूर्ण शहाणे आणि त्यांच्या पाठोपाठ फरफटत जाणारे प्रकाश ऐदलाबादकर हे अर्धे शहाणे– असे एका ज्येष्ठ नागपूरकर पत्रकारांनी आम्हाला विशद करून आमच्या ज्ञानात अमोघ भर घातली) घेऊन,



ते पूर्णतया पाळून दाखवले. त्यामुळे हे संमेलन अमुक तारखेला अमुक ठिकाणी होणार हे लोकांना कळावे म्हणून नागपूर शहरात एकही बॅनर, फलक, कमान, पोस्टर लावण्याची गरज नाही असे त्यांनी ठरवले. निमंत्रणपत्रे पाठवू नयेत; फलक लावू नयेत त्याचप्रमाणे स्मरणिका, अध्यक्षीय, स्वागताध्यक्षीय भाषण वगैरे छापू नये असेही आरंभी ठरवले गेले. परंतु पत्रकार झोड उठवतील म्हणून भाषणांच्या मोजक्या प्रती काढून त्या फक्त संमेलनात पहिल्या दीडदोन रांगात बसलेल्या पत्रकारांना वाटून 'संपल्या' असे जाहीर करायचे असा मार्ग काढण्यात आला. त्यामुळे त्याही खर्चात मोठी बचत झाली. लोकांची उपस्थिती कमी राहणार, मग मांडवही छोटा पाचसात हजार लोक बसतील एवढा घालून त्यातही मोठी बचत साधण्यात आली. सोलापूर, नाशिक, औरंगाबाद, परळी, परभणी, सातारा येथे तीस-चाळीस हजार लोक बसतील असे मांडव होते... तेथील संयोजक या साडेतीन शहाण्यांएवढे व्यवहारी नव्हते म्हणे!... या मुख्य मंडपापासून १००० मीटरवर वसंतराव देशपांडे नाट्यगृह– तेथे काही कार्यक्रम आणि दक्षिणमध्यक्षेत्र सांस्कृतिक केंद्राच्या बगीच्यातील खुल्या रंगमंचावर बालमेळावा, गझलकार मेळावा, कथाकथन, नवोदितांचे 'मनसोक्त' काव्यवाचन वगैरे उपचार म्हणून घ्यायचे कार्यक्रम– म्हणजे खर्चात आणखीच बचत! असे मोठ्या दिमाखदार काटकसरीचे श्रेय वेळोवेळी संयोजक अभिमानाने घेत होते. असो!

या काटकसरीचा कविलेखकांना फारसा फटका बसला नाही; परंतु ग्रंथप्रदर्शनात भरपूर पैसे देऊन आणि खूप खर्च करून आलेल्या स्टॉलधारकांना मात्र तो भयंकर बसला. दक्षिणमध्यक्षेत्र सांस्कृतिक केंद्रात खरे तर पन्नास स्टॉलएवढीच जागा! पण तेथे उभे, आडवे, तिरपे अशा लटपटी करून सव्वादोनशे स्टॉल बसवले. त्यामुळे या ग्रंथप्रदर्शनाला कसलेच रंगरूप प्राप्त झाले नाही. आत शिरल्यावर दोनचार स्टॉल दिसत– तेवढेच! त्यापुढे स्टॉल आहेत हे कोणाच्या लक्षातच येत नसे... तशात गावात एकही बॅनर नाही... मुख्य कार्यक्रम स्थळापासून हे स्टॉल बरेच लांब! शुक्रवारी पहिल्या दिवशी दोनतीनशे रसिक दिवसभरात आले! दुसऱ्या-तिसऱ्या दिवशीही फारतर हजार-बाराशे रसिक इकडे फिरकले असतील. त्यामुळे प्रकाशक वैतागलेले! तशात उन्हापासून बचाव व्हावा अशी व्यवस्था नीट नव्हती. पडदे मागितले तर एका प्रकाशकाला कॉंट्रॅक्टरकडून मार खाण्याची पाळी आली! साडेतीन शहाण्यांची काटकसर मोहीम– अशी अहिंसेवर अविश्वास दाखवण्यापर्यंत मजल मारू शकते हे प्रकाशकांच्या लक्षात आले– पण बरेच उशिरा! आणि सौम्यशालीन व्यक्तिमत्त्वाच्या अरुण साधू यांनी 'तिसरी क्रांती' वगैरेचा प्रचंड व्यासंग असल्याने कॉंट्रॅक्टर मुसलमान म्हणून प्रकाशकांना सुनावले, ''उगाच जातीय दंगल माजवू नका.'' असो!

काटकसरीने भरवलेल्या या संमेलनाचे कौतुक तरीही करायला हवेच! का? तर कार्यक्रमांच्या भरगच्च आयोजनासाठी आणि वेगवेगळ्या वैशिष्ट्यपूर्ण, वैचारिक

व वाङ्मयीन भूमिका मांडून श्रोत्यांना भरपूर वैचारिक व सांस्कृतिक मेजवानी दिल्याबद्दल!

ग्रंथदिंडी, उद्घाटन, परिसंवाद, मुलाखती, कथाकथन, कविसंमेलन, बालमेळावा वगैरे कार्यक्रम हे प्रत्येक संमेलनात असतातच! त्यात सहभागी होण्यासाठी नागपूरकरांनी सुमारे दीडशे नव्याजुन्या लेखककवींना निमंत्रित करून, वेगवेगळ्या भौगोलिक व वैचारिक क्षेत्रांना सामावून घेतले.

दलित नेते व कवी नामदेव ढसाळ यांना साहित्य संमेलनात मुलाखतीसाठी प्रथमच पाचारण केले गेले. त्यांनी आपल्या परखड भाषेत अनेकांना बिनधास टोले लगावले. या संमेलनात सर्वात नावाजण्यासारखा झालेला हा कार्यक्रम.

आपली राजकीय आणि वाङ्मयीन जडणघडण कशी झाली; ज्ञानोबा, तुकाराम आणि लक्ष्मीबाई टिळक, बहिणाबाई यांचा अपवाद वगळता आपण जीव ओवाळून टाकावा असे कोणी लिहिले नाही; जीएंनी अनेक इझम कथेत आणले, पण त्यांची कथा न मानण्याचे पाप आमच्या हातून घडले; अस्पृश्यांची चळवळ मुख्य प्रवाहात आणून आंबेडकरांचे स्वप्न साकार करणे हे माझ्या उर्वरित जीवनाचे मिशन आहे; आमची कविता रसाळ नाही, ढसाळ आहे कारण जीवनाचे कडू जहर प्यावे लागल्याने ते जहर आमच्या शब्दांतून येणे अपरिहार्य आहे, त्यात कृत्रिमपणा आणून लिहिणे ही स्वत:शी गद्दारी ठरली असती– असे अनेक विचार त्यांनी मांडले.

कादंबरीकार ह. मो. मराठे यांच्यावर 'अभिरूप न्यायालयात' खटला दाखल करण्यात आला. 'आपकी अदालत'च्या धर्तीवर त्यांच्यावर काही आरोप करण्यात आले. तुम्ही पत्रकार की साहित्यिक, बाळासाहेब ठाकरे यांचे नाव वापरून साहित्यिक दहशतवाद निर्माण केला, पैशासाठी नोकऱ्या बदलून बेजबाबदार पत्रकारिता केली, परदेशी पुस्तकांतून उचलेगिरी करण्याएवढी विश्वव्यापकता तुमच्यात का नाही, कॉर्पोरेट वर्ल्डवरचे लेखन केले, वगैरे आरोप त्यांच्यावर ठेवले गेले. ह.मों.नी मजेदार उत्तरे देऊन श्रोत्यांना खिळवून ठेवले. 'ब्राह्मणांना किती झोडपणार' या त्यांच्या लेखावरूनही त्यांना छेडण्यात आले. न्यायाधीश मदन धनकर यांनी त्यांना चक्क काळ्या पाण्याची शिक्षा सुनावून या कार्यक्रमाची सगळी शान घालवली. लुटुपुटीच्या लढाईला त्यांनी भलत्याच गांभीर्याची मात्रा दिली.

प्रा. प्रभा गणोरकर यांची मुलाखत या संमेलनात का ठेवण्यात आली हे एक गूढच म्हणायला हवे. त्यापेक्षा यंदा साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळवणाऱ्या आशा बगे यांची मुलाखत ठेवायला हवी होती. आशाबाईंना विचारले होते, परंतु त्यांनी काही अडचणीमुळे नाही म्हटले असे त्यांनीच मला सांगितले; परंतु संमेलनाला त्या हजर होत्या. त्यांचा सत्कारही झाला. मग मुलाखत का जमवता आली नाही? प्रभा गणोरकर यांनी म्हटले, ''भारंभार कविता लिहिण्यापेक्षा आशयगर्भ कविता लिहिण्यावर माझा विश्वास आहे... त्यामुळे गेल्या बावीस वर्षांत फक्त



८५ कविता माझ्याकडून लिहून झाल्या... माझ्या कविता माझ्या व्यापक स्वानुभवातून आल्या आहेत. माझे पती वसंत आबाजी डहाके हेच माझे आदर्श आहेत, ते उत्तम प्रेमकविता लिहितात, मात्र त्यांच्या काव्याचा वा जीवनदृष्टीचा माझ्यावर प्रभाव नाही. माझी शैली इतरांपेक्षा वेगळी आहे. तिच्यात तोचतोपणा नाही, स्मरणरंजन नाही; मृत्यू या विषयाचे मला आकर्षण वाटते... मी सतत कुटुंबाच्या चिंतेत असते; आपल्याला विरक्ती येत नाही याचा कधीकधी संताप येतो...'' यासारख्या त्यांच्या विधानांनी त्यांच्या परखड, पण संवेदनशील वृत्तीचे दर्शन घडले.

महिलांना या संमेलनात भरपूर आरक्षण द्यावे या हेतूने वसंतराव देशपांडे सभागृहात शनिवारी सगळे कार्यक्रम स्त्रीकेंद्रित ठेवले गेले. 'स्त्रियांचे लेखन' यावर छाया दातार आणि पुष्पा भावे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. नंतर 'आजच्या लेखिकांचे अनुभवविश्व आणि अभिव्यक्ती पुरेशी आधुनिक आहे का?' आणि 'स्त्रीवाचक काय वाचतात आणि वाचतात तरी काय?' या दोन विषयांवर परिसंवाद झाले. २४ महिलांचेच स्वतंत्र कविसंमेलनही तेथेच घेतले गेले. शिवाय प्रभा गणोरकर यांची मुलाखत. महिलांसाठी एका दिवसाचे खरे तर हे मिनी-संमेलनच होते! परंतु बहुतेक महिलांना हा आयोजकांचा 'सद्हेतू' रुचला नाही. 'तुमच्या'तच सामावून घेतलं असतं, तुमच्या व्यासपीठावर घेतलं असतं तर बरं झालं असतं' असे आशा बगे यांनी सौम्य शब्दांत सांगितले तर संमेलनातही वेगळ्या चुलीचे राजकारण होऊ शकते; ते आम्हाला स्वीकारायचे नाही असे प्रा. पुष्पा भावे यांनी म्हटले. ''हा सवता सुभा कशासाठी?'' असा प्रश्न छाया दातार यांनीही विचारला आणि वेगळ्या दालनाबद्दल नाराजी व्यक्त केली. लेखिकांचे अनुभवविश्व 'स्त्रीत्वाच्या कौटुंबिक कलह, प्रेम-विरहाच्या बाहेर पडत नाही, स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुत्व या मूल्यांचा आविष्कार करीत नाही तोवर स्त्रियांचे लेखन आधुनिक कसे होणार? आपल्या आचारविचारात आधुनिकपण हवे, आपली 'चिन्हे' आपली प्रतीके चौकटीतच अडकलेली आहेत. ती वैश्विक होण्याची गरज आहे असे मत मांडले गेले.

मुख्य मंडपातून स्त्रियांना बाजूला काढण्याचा हा प्रयत्न लेखिकांना रुचला नाही, त्याबद्दलचा राग त्यांनी व्यक्त केला. दुसऱ्या परिसंवादाचा विषय 'स्त्रिया काय वाचतात आणि वाचतात तरी काय' हा स्त्रियांचा उपमर्द करणारा आहे, तो उपहासात्मक आहे असा हल्ला मंगला आठलेकर यांनी चढवला.

स्त्रियांना निदान देशपांडे सभागृहाचे छत तरी लाभले. बालमेळाव्याला मात्र भरदुपारच्या रणरणत्या उन्हात खुले व्यासपीठच काय ते लाभले. शनिवारी दुपारी १२॥ ते ४ वाजेपर्यंत कडक उन्हात घामाच्या धारांनी भिजत बालकवींनी आपल्या कविता वाचल्या आणि रंजनात्मक कार्यक्रम सादर केले. उघड्यावरच बालचित्रकारांनी कवितांवर आधारित ८० चित्रे काढली. हा उपक्रम अत्यंत अभिनव ठरला. या

संमेलनाचे एक खास वैशिष्ट्य म्हणून त्याचा उल्लेख करायला हवा.

आजचे ग्रामीण वास्तव आणि मराठी साहित्य, भाषेचा संस्कार आणि माध्यमांची जबाबदारी, शिक्षणाचे माध्यम म्हणून मराठी निकालात निघाली आहे का? हे तीन परिसंवाद सद्य:काळाशी निगडित होते, केवळ ॲकॅडमिक वा प्राध्यापकी वळणाचे नव्हते. त्यामुळे त्यात व्यक्त केले गेलेले विचार विदारक वस्तुस्थितीची कल्पना देणारे होते. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, खैरलांजीमधील दलित अत्याचार, खेड्यांचे चालू असलेले शहरीकरण यांचे संदर्भ देत भीषण ग्रामीण वास्तव साहित्यात फारसे समर्थपणे उमटत नाही असे एक मत; तर ग्रामीण, शहरी, दलित, मुस्लीम असे साहित्याचे गट न पाडता, ग्रामीण जीवन ठिसूळ झाले आहे, ते राजकारणाने पोखरले गेले आहे; ते कधीही कोसळू शकते असे कोणी म्हटले. मराठी भाषेवर हिंदी-इंग्लिशचे आक्रमण होत आहे, आजची वृत्तपत्रे, आजच्या वाहिन्या मराठीला विकृत करीत आहेत याबद्दलची नाराजी व चीड व्यक्त झाली. शिक्षणाचे माध्यम म्हणून मराठी– म्हणजे प्रमाणित मराठी– प्रमाणभाषा वापरली जाते; पण खेड्यापाड्यात ही प्रमाणभाषा परकीच ठरते. बोलीभाषाच तेथे प्रचलित असते. प्रमाणभाषेचा आग्रह भाषेबद्दल अप्रीती निर्माण करतो असे मत मांडतानाच काही वक्त्यांनी सदाशिवपेठी भाषेच्या विरोधात विद्रोहाचा सूर काढला.

'विदर्भातील प्रतिभेचे मराठी साहित्याला योगदान' या विषयावर झालेला परिसंवाद सर्वोत्कृष्ट म्हणावा लागेल. विदर्भातील काव्य, समीक्षा, कथा-कादंबरी आणि नाटक यांचे सुविहित आलेख वक्त्यांनी पेश केले. प्रा. राम शेवाळकर यांनी त्यातील क्षतिपूर्ती करीत वैदर्भीय प्रतिभेचे सर्वंकष महत्त्व मोजक्या शब्दांत उभे केले. जाता जाता हे सारे प्रतिभावंत लेखक विदर्भाचे असले तरी त्यांनी लिहिले ते सर्व मराठी भाषकांसाठी होते, हे स्पष्ट करून ते म्हणाले, "विदर्भातील योगदान ही भाषा काहीशी उपमर्दकारक आणि महाराष्ट्राच्या एकजिनसीपणाच्या दृष्टीने गैर आहे; संपूर्ण मराठी भाषेचे वैभव व विश्व विशाल करण्याचीच आपली आंतरिक इच्छा हवी." प्रा. माणिक कानेड यांनी वैदर्भीय नाट्यपरंपरेचे उलगडून दाखवलेले सौंदर्य विलोभनीय होते.

या संमेलनाला प्रा. शेवाळकर यांनी वेगळ्या प्रकारेही मदत केली. संमेलनस्थळे दूर असल्याने तेथे जाण्यायेण्यासाठी त्यांनी दहा रिक्षांची सोय केली. उद्घाटन समारंभानंतर रंगीबेरंगी फटाक्यांची आतषबाजी घडवून नागपूरकरांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.

या संमेलनाची वैशिष्ट्ये काय सांगता येतील?

१. अरुण साधू यांचे अध्यक्षीय भाषण– त्यातील कादंबरीच्या महतेचा भाग.

२. नामवर सिंह आणि सुशीलकुमार शिंदे यांचे विचारमंथन. कोपरखळ्या.

३. गृहमंत्री आर. आर. पाटील यांची उपस्थिती व वक्तव्य.

४. नामदेव ढसाळ यांची बिनधास्त मते.

५. आठशे मुलांनी रंगविलेली ८० काव्यचित्रे, बसोली ग्रुपच्या चंद्रकांत चन्ने यांची किमया.

६. स्वतंत्र विदर्भाच्या ठरावातील हवा काढून घेण्यातील महामंडळाची चलाखी.

संयोजकांच्या आतिथ्याचा प्रत्यय या संमेलनात कोणा लेखककवींना आला असला तर ठाऊक नाही. पैसे भरा– रूम ताब्यात घ्या– कूपने घ्या– अशा व्यवहाराचा आग्रह तेथे होता. पत्रकार-साहित्यिकांना ओळखणारे स्वागतकक्षात कोणी नव्हते. त्यामुळे नामवंतांचीही बूज राखण्याची कोणाला गरज वाटली नाही. काटकसरीने संमेलन करायचा आयोजकांचा आटापिटा होता. आत्मीयतेत, जिव्हाळ्यातही त्यामुळे काटकसर दिसली तर त्यात आश्चर्य कसले?

एकूणच, नागपूरसारख्या ठिकाणी संमेलन पंचाहत्तर वर्षांनी होणे ही गोष्ट स्वाभाविकच म्हणावी लागेल. संमेलन उत्तम करण्यासाठी लागणारे व्यवस्थापनकौशल्य आणि लोकाभिमुख नेतृत्व येथे काही उतू चाललेले नाही.

**शंकर सारडा**


## पुरुषोत्तम रोहणकार

यांची जाने. २००७ ला प्रसिद्ध झालेली नवीन पुस्तके.

**अक्षता प्रकाशन, पुणे-३०** मो. 9850817685

| | | | |
|---|---|---|---|
| १. | बेस्ट - ऑफ - लक | कादंबरी | -१५० रुपये |
| २. | परिस स्पर्श | कथासंग्रह | -१३५ रुपये |
| ३. | ऊन सावली | कादंबरी | -१४५ रुपये |
| ४. | जसं घडलं तसं | कथासंग्रह | -१४० रुपये |

**रुपवेध प्रकाशन, परभणी** मो. 9422178632

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योगायोग | कादंबरी | -१३५ रुपये |
| २. | आयुष्यात कधी-कधी | कादंबरी | -१५० रुपये |
| ३. | अर्घ्य | कथासंग्रह | -१३० रुपये |
| ४. | मंगळसूत्र | कथासंग्रह | -१२५ रुपये |
| ५. | जेव्हा नवरा बाळंत होतो | एकांकिका | -०६५ रुपये |
| ६. | प्रतिभेचे मोरपंख | काव्यसंग्रह | -०७५ रुपये |

# बाबूराव बागूल : जनस्थानाचे मानकरी
## ‘दलित साहित्याचा धगधगता अंगार’

बाबूराव बागूल यांना कविवर्य कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा जनस्थान पुरस्कार यंदा जाहीर झाला आहे; ही गोष्ट दलित साहित्यातील गावकुसाबाहेरच्या माणसाच्या वेगळ्या भावविश्वाच्या वास्तव चित्रणाच्या ‘अभिजातपणा’वर शिक्कामोर्तब करणारी आहे.

मुंबईच्या माटुंगा रेल्वे लेबर कॉलनीत राहणारा, रेल्वेच्या डब्यात सूचना रंगवणारा एक मॅट्रिक पास तरुण आपल्या अवतीभवतीच्या समाजसमूहाच्या दाहक व्यथावेदनांना शब्दरूप देऊ लागला तेव्हा त्या शब्दांमध्ये धगधगते निखारे फुलू लागले आणि मध्यमवर्गीय वाचकांच्या संवेदनेला चटके देऊ लागले; अस्वस्थ करू लागले.

सुमारे पंचेचाळीस वर्षांपूर्वी १९६३ मध्ये बाबूराव बागूल यांचा ‘जेव्हा मी जात चोरली होती’ हा कथासंग्रह अभिनव प्रकाशनचे वामनराव भट यांनी प्रसिद्ध केला. तो संग्रह तळागाळातल्या, गावकुसाबाहेरच्या लोकांच्या, प्राथमिक आदिम भावसृष्टीच्या आडदांड अभिव्यक्तीचे, रांगडेपणाचे, हिंसक-हिंस्रपणाचे आणि तितक्याच उत्कट लोभ-स्नेहाचे दर्शन घडवणारा होता.

‘जेव्हा मी जात चोरली होती’ या कथेतील निवेदक हा आपली जात लपवून म्हणजे ‘चोरून’ रेल्वेत नोकरी मिळवतो; एका उत्तर भारतीय भय्याच्या घरात भाड्याने खोली घेऊन राहतो. त्याची स्वच्छतेची, टापटिपीची आणि रुबाबदार वागणूक बघून, त्याची संतसाहित्यातील गती बघून, त्याची सफाईदार हिंदी भाषा ऐकून तो भय्या त्याला ब्राह्मण समजून, त्याला सन्मानाने, आदराने वागवतो. पगाराच्या दिवशी घरी नेऊन इतमामाने खाऊपिऊ घालतो. पण त्याचवेळी तो महार असल्याचे त्याच्या कागदपत्रावरून भय्याच्या लक्षात येते तेव्हा तोच भय्या या तरुणाला रक्तबंबाळ होईपर्यंत लाथाबुक्क्यांनी तुडवतो. अवतीभवतीचे लोकही त्याच्यावर तुटून पडतात... त्या जातचोरीची आठवण झाली की ‘अंत:करणाचे अग्निकुंड होते. डोके दु:खाने दुभंगून जाते अन् मग वाटू लागते, या दुर्दैवी देशात माणसाने दलित जातीत जन्म घेऊ नये. घेतल्यास असे दु:ख, असा अपमान सहन करावा लागतो की त्यातून मरण बरे वाटते. विष प्यारे होते. अंत:करणातील अमृत सडून जाते, अन् उरते फक्त तलवारीपेक्षा क्रूर, कठोर चीड...'' असे हा निवेदक म्हणतो तेव्हा त्यातील ती चीड योग्यच आहे, ती अनाठायी नाही हे आपल्याला आतून पटलेले असते. तशातच हा मार खाणारा तरुण खरेतर आडदांड पैलवान आहे. भय्याचा वा इतरांचा प्रतिकार करण्याचे सामर्थ्य त्याच्यात नक्कीच होते. पण तो मार खातो. ‘‘त्या मूर्खांचा मार तू सहन तरी का केलास?'' या प्रश्नाचे उत्तर देताना तो म्हणतो, ‘‘मी त्यांचा मार कुठे खाल्ला? मनूने मला मारले.'' हा निवेदक म्हणतो, ‘‘मी क्रांतीचे विद्यापीठ असलेल्या मुंबई नगरीचा नागरिक आहे. मनूने मातीमोल केलेल्या या दिव्य देशाला मुंबईच्या माणसांनी मुक्ती मिळवून दिली, त्या नगरीचा मी श्रमशूर नागरिक आहे. माझे हात भारताच्या प्रगतीचे रथ आहेत.''

याच संग्रहातील ‘विद्रोह’ ही कथाही अशीच चटका लावणारी आहे.

‘रोमन शैलीतील सुंदर, सबल आणि रुबाबदार रूप असलेला’ मॅट्रिकच्या वर्गात शिकणारा, आपल्या अस्मितेची ओळख पटलेला एक तरुण आसन्नमरण वडिलांच्या आणि आईच्या दटावणीमुळे आयुष्यात पहिल्यांदाच वडिलांच्याऐवजी भंगीकाम करण्यासाठी बाहेर पडतो. संडासाच्या खाली असलेल्या, मैल्याने भरलेल्या, किड्यांनी गजबजलेल्या डब्याकडे बघताना त्याच्या मनात संताप-जुगुप्सेचा एकच कल्लोळ उठतो; विद्रोह भावनेने त्याचे अवघे शरीर पेटून उठते... त्याची धग वाचकांनाही जाणवल्यावाचून रहात नाही...

या अनुभवांची जी दाहकता होती, ती प्रभावीपणे कथांतून उफाळून येत होती आणि तितक्याच आक्रमकपणे, आडदांडपणे अंगावर येऊन आदळत होती... ‘महाराष्ट्र टाइम्स’मध्ये त्या पुस्तकाचे परीक्षण त्या वेळी मी लिहिले. त्यांच्या ओळखीचाही योग साधला.

बाबूराव बागूल यांच्या या पहिल्याच कथासंग्रहाने दलित साहित्यातल्या नव्या पर्वाची ध्वजा उंच फडकणार याची ग्वाही दिली. त्यांच्याआधी लिहिणाऱ्या अण्णा भाऊ साठे किंवा शंकरराव खरात वगैरेंच्या नेमस्त परंपराशरण लेखनापेक्षा हे सारे फारच वेगळे आहे याची खूणगाठ त्यामुळे वाचकांच्या मनात पक्की झाली.

त्यापुढे ‘मरण स्वस्त होत आहे’ (१९६९) हा कथासंग्रह आला. ‘सूड कादंबरिका १९६९ च्या ‘साधने’च्या दिवाळी अंकात आली. साधनेच्या त्या दिवाळी अंकाचे संपादन मीच केलेले होते. त्यावेळी मुद्दाम त्यांच्या लेबर कॉलनीत जाऊन त्यांच्या अर्धवट लिहून झालेल्या कादंबऱ्यांची हस्तलिखिते बघितली... ‘सूड’ची कल्पना त्यांनी सांगितली, तेव्हा हीच कथा विस्ताराने लिहून पाठवा असे सांगितले... ‘सूड’ची नायिका जानकी ही लैंगिक शोषणाच्या चक्रात अडकूनही आपले पावित्र्य, आपले स्वत्व व मनोबळ टिकवून ठेवते; आपल्या स्त्रीत्वाचे नैसर्गिक माहात्म्य अप्रतिहत राखते... वेगळ्या मुशीतील ही नायिका बागूल यांच्या मनातील स्त्रीच्या आदर्शाची, शोषणातून निर्माण होणाऱ्या दु:खाची प्रतिमा उभी करते.

याच काळात लिहिलेली 'कोंडी' ही कादंबरी पुढे तीस वर्षांनी प्रसिद्ध झाली. माटुंगा लेबर कँपमधील आदिम पातळीवरचे जीवन, तेथील राजकीय कार्यकर्ते आणि त्यांच्यातील हेवेदावे, सत्तास्पर्धा, अमानुषता आणि असुरक्षितता, गलिच्छपणा आणि अनाचार या सर्वांचे तिच्यातील चित्रण अंतर्भेदक आहे. कॉम्रेड सयाजी थोरात यांची पदवीधर मुलगी सुशीला ही या कादंबरीची नायिका... नाशिकच्या पावन पगारे या पदवीधर तरुणाशी तिचे लग्न होते. लग्नानंतर तो मुंबईतच लेबर कॉलनीत राहून एम.ए. करायचे ठरवतो. सुशीला त्याला 'मुंबई तुमच्यासारख्यासाठी नाही; त्या दारुड्या, दैन्यदानवतेच्या लालभडक उघड्यावागड्या वणव्याचे भय वाटते' असे सांगून परावृत्त करू पाहते. 'पावनसारखा फुलात वाढलेला, भोळा, कोवळा, स्वप्नं बघणारा सरळ साधा माणूस' या मुंबईच्या भीषण गटबाजीच्या जगात होरपळून निघेल अशी धास्ती तिला वाटते. 'द्वेष हे भूषण आहे. द्वेषाने प्रतिकारक्षमता वाढते. द्वेषातून दिव्यत्व जन्माला येते. द्वेषाचे दिवे जाळा. द्वेषाने क्रांती होते. दानवतेचा होम होतो'' असे आत्यंतिक विचार मांडणाऱ्या कॉ. गांगुर्डेला पावन हा मध्यमवर्गीय प्रवृत्तीचा सुधारणावादी वाटतो... त्याला येथे स्थान नाही असे कॉ. गांगुर्डे व इतरही कॉम्रेडसना वाटते... त्याचा काटा काढणे भाग पडते... पावन पगारे सारख्याने येथे पराभूत होणे क्रमप्राप्त असते.

''हे तरुणा
तू तर सूर्याचा सांगाती.
तुला ओळखतो मी युगायुगापासून.
जीवाच्या पहिल्यावहिल्या युद्धापासून
आव्हान होऊन तू नेहमीच उभा.
दुःखाच्या डोंगरापुढती परमेश्वराचा पुत्र
ख्रिस्त प्रेषित झाला तेव्हा तरुण होता
अन् बुद्धाला तर राहुलच्या प्राप्तीच्या वेळीच
दुःखाचा साक्षात्कार झाला.''

यासारख्या काव्यात्मक ओळीही अधूनमधून येतात.

'मूळचा मी कवी असणारा माणूस. पण कथेच्या प्रेमात पडलो आणि कविता रुसली' असे बागूल म्हणतात; पण त्यांच्या कथाकादंबऱ्यातील अनेक परिच्छेद हे खरे तर कवितासदृशच आढळतात. तेव्हा कविता रुसली असे मानून लेखणी दूर ठेवायची गरज होतीच असे नाही.

बाबूराव बागूल यांनी पुढे मुंबई सोडून नाशिकजवळच्या आपल्या मूळ विहितगावला मुक्काम हलवला. लेखनाचा झपाटा तेथे राहिला नाही... अघोरी (१९८०), दलित साहित्य, आंबेडकर भारत (१९८१) यानंतर गेल्या कितीतरी वर्षांत नवे काही त्यांनी लिहिलेले दिसत नाही. 'कोंडी'तल्या पावन पगारे सारखी थोडीफार त्यांची अवस्था झालेली दिसते. दलित साहित्याला गेल्या तीन दशकात खूप वेगवेगळी परिमाणे मिळाली; परंतु बागूल आपल्या 'स्वतंत्र' जगातच आत्ममग्न राहिले. अधूनमधून मिळणाऱ्या पुरस्कारांमुळे त्यांच्या पूर्वाश्रमीच्या लेखनाचे स्मरण होत राहिले. जनस्थान पुरस्कारामुळे त्यांच्या या पूर्वदिव्य प्रतिभेचा सन्मान नक्कीच झाला आहे. पंचाहत्तरीतल्या बागुल यांनी नव्याने काही लेखन करून आपल्या प्रतिभेचे नवे चमत्कार प्रकट करावे असे अपेक्षिणे वास्तव ठरेलच असे नाही. जीवनगौरव पुरस्कार असेच जनस्थान पुरस्काराचे स्वरूप आहे. सगळे काही कर्तृत्व करून झाल्यावर थकल्याभाकल्या लेखणीला करायचा मानाचा मुजरा ही जनस्थानाची प्रतिमा त्यामुळे सत्तरी पार करणाऱ्या लेखककवींना दिलासा देणारी, आधार देणारी वाटते. कविवर्य कुसुमाग्रज हे बाबूराव बागूल यांना 'गाववाले' म्हणत. आपल्या गाववाल्याचा गौरव झाल्याचा आनंद त्यांनाही लाभेल– हे या पुरस्काराचे यावेळचे 'बोनस' वैशिष्ट्य.

**शंकर सारडा**


## अवश्य वाचा.....

नियमांच्या पालनापेक्षा नियमांचे बुजगावणे दाखवून कार्यविलंब व कार्यनाश करण्यात सरकारी यंत्रणा इतिकर्तव्यता मानते. या यंत्रणेचा अनुभवाधिष्ठित, परखड परामर्श.....




**गव्हर्नन्स**

**अरुण शौरी**

**अनु. भारती पांडे**

२२०रु. पोस्टेज २५रु.

# मराठी साहित्य : ग्लोबलायझेशनची आव्हाने

**विलास वाडकर**

लोकसत्ताच्या ७ जाने. २००७ च्या अंकात मराठी प्रकाशनक्षेत्राला नावीन्यपूर्ण योगदान देणारे प्रकाशक अनिल मेहता यांची आणि यंदा साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळालेल्या आशा बगे यांच्या दोन मुलाखती प्रसिद्ध झाल्या आहेत. संदर्भ वेगवेगळे असले तरी या दोन्ही मुलाखतींना मराठी साहित्याचा समान धागा आहे. मेहता मराठी लेखकांचे अनुभवविश्व तोकडे पडते याकडे आपले लक्ष वेधतात, तर आशा बगे लेखिका म्हणून आपल्यामध्ये कोणत्या प्रकारचे अनुभव घेण्याच्या मर्यादा आहेत हे स्पष्ट करतात. मराठी साहित्य अधिक समृद्ध आणि बहुपेडी व्हावे, अधिकाधिक लोकांनी त्याचा आस्वाद घ्यावा आणि मराठी साहित्याच्या भाषांतरातून– विशेषत: इंग्लिश भाषांतरातून– ते जगाच्या कानाकोपऱ्यात जावे अशी अपेक्षा आज मराठी प्रकाशकाने व्यक्त करावी यातच उद्याच्या मराठी साहित्याची झेप दिसते. नुसते साहित्यच नव्हे तर संगीत, नाटक, सिनेमा, चित्रकला इत्यादी कलाक्षेत्रातील इतर दालनांबाबत हेच म्हणता येईल. यासाठी मार्केटिंगची, ग्लोबलायझेशनची आपल्यापुढील आव्हाने समजून घेतली पाहिजेत आणि ती आव्हाने पेलण्यासाठी कोणी व काय प्रयत्न करायला हवेत हे ठरविले पाहिजे.

'अकराशे प्रतींची आवृत्ती' ही मराठी साहित्यजगतात रुढ मानसिकता, माझ्या कल्पनेप्रमाणे 'स्वामी'ची पहिली स्वस्त आवृत्ती बाजारात आली तेव्हापासून बदलायला लागली. आता विश्वास पाटीललिखित 'संभाजी'ची पहिली आवृत्तीच आठ हजार प्रतींची निघाली. दहा-बारा कोटी मराठी बोलणाऱ्या लोकांनी प्रयत्नांती मराठी साहित्याचं मार्केट विकसित होऊ शकतं, इतकं तरी यातून स्पष्ट झालं. मार्केट वाढलं की लेखकाचं मानधनही वाढतं आणि मग पूर्णकाळ लेखनाला वाहून घेणं लेखकाला 'परवडू' शकतं. मराठी साहित्याचं मार्केट अजूनही अविकसित आणि विकसनशील याच्या अधेमधे कुठंतरी असावं. ते विकसित करण्याचं काम सर्व मार्केट प्लेअर्सनी– प्रकाशक, वितरक, किरकोळ विक्रेते, छोट्या-मोठ्या साहित्यिक/सांस्कृतिक संघटना, लेखक, वाचक-संघटना इ.– विचारपूर्वक करायला हवं. मराठी साहित्यक्षेत्रात पूर्णवेळ लेखक नाहीत हे अविकसित मार्केटचं फलित आहे.

मराठी लेखकांचे अनुभवविश्व तोकडे पडते हा आक्षेप वरील विवेचनाच्या



संदर्भात अर्धसत्य असल्याचेही मग समजायला लागते. आशा बगे यांच्यासारख्या कसदार साहित्याचे योगदान देणाऱ्या लेखिकाही प्रांजळपणे आपल्यातील अनुभव घेण्याच्या मर्यादा स्पष्ट करतात. ओश्ने शेअरस्टँटचे 'दि बुकसेलर ऑफ काबूल' किंवा 'अ हंड्रेड अँड वन डेज' या पुस्तकांतील अनुभवविश्व किंवा ग्रेग रॉबर्टसच्या 'शांताराम'मधील अनुभवविश्व खूपच समृद्ध आणि युनिक आहे असा मापदंड मानला तरी नसीमा हुरजूक यांच्या 'चाकाची खुर्ची' या पुस्तकात किंवा डॉ. सुनीलकुमार लवटे यांच्या 'खाली जमीन वर आकाश' या पुस्तकात मांडलेले अनुभव हेही थोड्याफार फरकाने त्याच जातकुळीचे मानावे लागतील. 'लोकसखा ज्ञानेश्वर'चे डॉ. आनंद यादवांचे लिखाण हे त्यांच्या प्रदीर्घ आणि सखोल चिंतनातून झिरपलेले असल्यामुळे तेही थोरच असल्याचं मान्य करावं लागेल. डॉ. रणजीत मिरजे यांच्या 'दक्षिणायन' या प्रवासवर्णनातील अनुभव निश्चितच समृद्ध आणि युनिक मानावे लागतील. महात्मा फुले यांच्या 'शेतकऱ्यांचा असूड'मध्ये मांडलेले विचारही अनुभवसिद्ध आणि भरभक्कम पायावर आधारित तसेच युनिकही आहेत. 'शेतकऱ्यांचा असूड' इंग्लिशमध्ये भाषांतरित झाला (कारण ते अपरिहार्यच होते.) पण इतर अशाच युनिक, अनुभवसिद्ध मराठी पुस्तकांचे काय? आपले विचार मराठीत आणि नंतर कन्नड, गुजरातीपासून इंग्लिशमधून प्रसिद्ध झालेलं पाहणं लेखकाच्या भाग्यात असेल तर त्याला आणखी काय हवं? विकसित मार्केटच्या माध्यमातूनच हे होऊ शकेल. लेखक आणि प्रकाशक हे मार्केट प्लेअर्स महत्त्वाचे असले तरी इतर प्लेअर्सही कमीजास्त प्रमाणात महत्त्वाचेच असतात. गंगाधर गाडगीळांची लोकमान्य टिळकांवरील कादंबरी, दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांचे तुकारामाचे अभंग इंग्लिशमध्ये भाषांतरित झाले. त्याची मराठी साहित्य जगताने काय दखल घेतली? त्यांचा कोणी, कधी सत्कार केला?

टी.व्ही.सारख्या माध्यमांचे ॲग्रेसिव्ह मार्केटिंग, मराठी माणसाची उदास वृत्ती इत्यादी घटकांना दोष देत दिवस काढण्यापेक्षा मराठी साहित्यक्षेत्राने पुस्तकांच्या खपासाठी मार्केटचा अभ्यास करणे, त्याचे वर्गीकरण करणे (Segmentation) आणि कॉस्ट अकौंटिंगचा उपयोग करून घेणे आवश्यक आहे. कॉस्ट अकौंटिंगमुळे पुस्तकनिर्मितीचा खर्च हा व्हेरिएबल (Variable cost) आणि फिक्स्ड अशा दोन विभागात दाखविता येईल. व्हेरिएबल कॉस्टवरून किती किंमतीला पुस्तक विकले म्हणजे तोट्यात जाणार नाही हे समजेल, किती प्रतींची आवृत्ती घ्यायची हेही ठरविता येईल. अनेक आवृत्त्या पाहिलेल्या बनगरवाडीचे इतर भारतीय भाषांत आणि इंग्लिशमध्ये जाणीवपूर्वक भाषांतर व्हायला हवे आणि त्यासाठी मराठी साहित्याच्या मार्केट प्लेअर्सनी मनापासून प्रयत्न करायला हवेत. मार्केट वर्गीकरण कसे असावे याचे ढोबळ उदाहरण खाली दिले आहे.

| पुस्तकाचे नाव | भर द्यायचा मार्केटचा भाग | भाषांतरविषयी कृती |
|---|---|---|
| १) पानिपत, संभाजी | (१) इतिहासाचे अभ्यासक<br>(२) विद्यार्थी | (१) इतर प्रमुख भारतीय भाषांत<br>(२) इंग्लिश, फ्रेंचमध्ये |
| २) बनगरवाडी, झाडाझडती | (१) समाजशास्त्राचे अभ्यासक<br>(२) ग्रामीण भाग | --- वरीलप्रमाणे--- |
| ३) दक्षिणायन | (१) पर्यटन संघटना<br>(२) पर्यटनातील व्यावसायिक संस्था (हॉटेल्स धरून) | इतर प्रमुख भारतीय भाषांत |
| ४) थॉट लीडर्स | (१) लहान व मध्यम उद्योजकांच्या संघटना<br>(२) व्यवस्थापन डिग्रीचे विद्यार्थी | ----------- |
| ५) देव जो भूवरी चालला | शिर्डीत– विशेषत: शनिवार, रविवार | ----------- |
| ६) लोकसखा ज्ञानेश्वर | पंढरपुरात – विशेषत: एकादशीला | (१) सर्व प्रमुख भारतीय भाषांत<br>(२) इंग्लिश, फ्रेंचमध्ये |

भाषांतराचा प्रश्न किती अवघड आहे, याची थोडीफार कल्पना मलाही आहे. पण मराठी साहित्याच्या मार्केट प्लेअर्सनी इतर भाषांतील मार्केट प्लेअर्सची दृढ संबंध प्रस्थापित करून आणि भाषांतरकारांना प्रोत्साहित करून हा प्रश्न सोडवला पाहिजे. असे झाले तरच ते मार्केट विकसित झाले असे म्हणता येईल.

कसदार साहित्य, कसदार कलाकृती यांची समाजात 'मोठ्याने' चर्चा व्हायला हवी. 'गोजिरवाणे' नाव घेऊन विकृत प्रवृत्तींचे होणारे टीव्हीवरील प्रसारण लोकशिक्षणाच्या रेट्यातून बंद व्हायला हवे. 'बनगरवाडी', 'ध्यासपर्व', 'श्वास', 'डोंबिवली फास्ट' अशा चित्रपटांचा प्रेक्षकांपर्यंत पोचण्याचा 'रीच' वाढायला हवा. त्यासाठी मार्केटिंगचा पद्धतशीर उपयोग करणे महत्त्वाचे ठरेल. चांगला चित्रपट असा असतो, तो जीवनाकडे पाहण्याचा पॉझिटिव्ह ॲप्रोच कसा देतो याची चर्चा व्हायला हवी.

निष्कर्ष एकच– शेवटी मार्केट विकसित व्हायला हवे आणि त्यासाठी सर्व मार्केट प्लेअर्सनी जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवेत.




## रमा मराठे यांची पुस्तके

| ललित | मूल्य |
|---|---|
| रंग सुखाचे | ८० |
| स्वभावाला औषध आहे | १२० |
| **व्यक्तिमत्त्व विकसन** | |
| हसत जगावं | १०० |
| असे घडवा मुलांचे व्यक्तिमत्त्व | १२० |
| तो आणि ती : जॉन ग्रे (अनु.) | २५० |
| **आरोग्य** | |
| औषधाविना आरोग्य | २०० |

## रत्नाकर मतकरी यांची पुस्तके

| गूढकथा | मूल्य |
|---|---|
| खेकडा | ८० |
| निर्मनुष्य | १०० |
| कबंध | १०० |
| मध्यरात्रीचे पडघम (फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स पुरस्कार २००६) | १०० |
| निजधाम | १०० |
| स्वप्नातील चांदणे | ७० |
| **नाटक** | |
| तनमन | ४० |
| जादू तेरी नजर | ६० |

## आशा बगे यांची पुस्तके

**साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित लेखिका**

| कथासंग्रह | मूल्य |
|---|---|
| निसटलेले | १२० |
| ऋतुवेगळे | ७० |
| पाऊलवाटेवरील गाव | ११० |
| प्रतिद्वंद्वी | १२० |

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

पोस्टेज खर्च वेगळा

पुस्तक परिचय




# अस्तित्व

**आपल्या अस्तित्वालाच जेव्हा नियतीचे आव्हान सैरभैर करते, तेव्हा-**

**सुधा मूर्ती**
**अनु. ए. आर. यार्दी**

आपल्या अस्तित्वालाच जेव्हा नियतीचे आव्हान सैरभैर करते, तेव्हा–

सुधा मूर्ती यांची 'अस्तित्व' ही कादंबरी प्रथम कन्नड भाषेत 'तुमुला' या नावाने प्रसिद्ध झाली. तिच्यावर दूरदर्शनवर मालिका निघाली. तेलगू, हिंदी, तमिळ वगैरे भाषांत तिचे अनुवाद, अन्वेषणा, द्वंद्व, पूर्णिमाई इराटू अशा नावांनी प्रकाशित झाले. मराठी अनुवाद प्रा. ए. आर. यार्दी यांनी केला आहे.

या कादंबरीचा नायक आहे मुकेश. लंडन येथे बीबीसीमध्ये भारतीय संस्कृती, कला विभागाचा तो एक अधिकारी होता. त्याला या नोकरीत पगार फार नव्हता; परंतु त्याला त्या कामात खूप रस वाटे. जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधून कलाविषयक पदवी घेऊन पुढच्या शिक्षणासाठी तो लंडनमध्ये येतो. नंतर बीबीसीमध्ये त्याला जॉब मिळतो. त्याची पत्नी वासंती; म्हैसूरच्या ब्राह्मणवस्तीत वाढलेली. परकर पोलके, पातळ, एकादशी, पौर्णिमा, नवरात्र, गुढीपाडवा... सोवळेपणा, धार्मिक व्रतवैकल्ये या वातावरणात लहानाची मोठी झालेली. ती लग्नानंतर पहिल्यांदाच कर्नाटकाबाहेर पडली; लंडनला आली. युरोपात भटकली. स्केटिंग वगैरेमध्ये पटाईत झाली... मुकेश म्हैसूरला एका कलास्पर्धेचा परीक्षक म्हणून गेला असताना वासंतीची चित्रे त्याला बघायला मिळाली. वासंतीच्या सौंदर्याने त्याला प्रथमदर्शनीच घायाळ केले. तिची माहिती त्याने मिळवली. नरसिंहराव जोशी यांची ही सर्वात धाकटी कन्या बी.ए. उत्तीर्ण. वीणावादन, नृत्य, चित्रकला यात प्रवीण. स्वयंपाकात वाकबगार. लंडनमध्येही ती वीणावादनाचे व संगीताचे क्लास घेत असते.

मुकेशचे वडील रावसाहेब. मुकेश गारमेंटस्चे मालक. त्यांचे कपडे परदेशातही निर्यात होतात. मुकेश हा त्यांचा एकुलता एक मुलगा. नीरजा ही त्याची बहीण. विवाहित. तिचा पती सतीश हा वकील. तो नीरजाच्या एका प्राध्यापकाचा मुलगा.



त्याची बुद्धिमत्ता, देखणेपण, वाक्चातुर्य यावर नीरजा भाळली. तिने मुकेशला त्याबद्दल सांगितले. मुकेशने रावसाहेबांना ते सांगितले.

सतीशला बघून रावसाहेब मुकेशला म्हणाले, ''सतीश मला आवडला नाही. एखादी व्यक्ती बघून दहा मिनिटांत तिच्या अंतरंग-बहिरंगाची कल्पना मला येते. तो तुझ्यासारखा नाही. तो फार व्यवहारी आहे.'' मुकेश म्हणाला, ''तुमचा व्यवसाय बघायला तुम्हाला त्याचा व्यवहारीपणा उपयुक्त ठरेल. मी काही तुमच्या व्यवसायात पडणार नाही.'' मुकेशच्या मध्यस्थीने सतीश-नीरजा यांचे लग्न होते. सतीशला वकिली सुरू करण्यासाठी दहा लाख रुपये, एक बंगला, एक कार रावसाहेब देतात...

**सतीशला बघून रावसाहेब मुकेशला म्हणाले, ''सतीश मला आवडला नाही. एखादी व्यक्ती बघून दहा मिनिटांत तिच्या अंतरंग-बहिरंगाची कल्पना मला येते. तो तुझ्यासारखा नाही. तो फार व्यवहारी आहे.**

मुकेशशी रावसाहेब एखाद्या मित्राप्रमाणे वागतात. मुकेश आपल्या सगळ्या गोष्टी आईपेक्षा रावसाहेबांशीच जास्त मोकळेपणाने बोलतो. रावसाहेबही त्याच्या मनाप्रमाणे सर्व करतात. मुंबईला जे. जे. स्कूलमध्ये शिकायचे असे तो म्हणतो तेव्हा रावसाहेब मुंबईत फ्लॅट, स्वयंपाकी, गाडी वगैरे सोयी करून देतात... लंडनलाही त्याला पुढील शिक्षणासाठी पाठवतात. त्याच्या पसंतीच्या मुलीशी– वासंतीशी लग्न लावून देतात. त्याच्या वाढदिवसाला त्याला दोन हजार पौंड पाठवतात. लंडनलाही रावसाहेब कामानिमित्त येतात तेव्हा त्याला आणखी दोन हजार पौंडांचा चेक देऊन जातात. रावसाहेब त्याला मुन्ना म्हणतात. नीरजाला नीरू. मुन्नाचा वाढदिवस रावसाहेब एक जानेवारीला साजरा करतात, तर सुमती– त्याची आई बुद्धपौर्णिमेला! एका मोठ्या अपघातातून त्या दिवशी मुन्ना वाचला– म्हणून! मुकेशच्या नावाने रावसाहेब शाळाकॉलेजांना, धार्मिक संस्थांना देणग्या देतात. ''तुझ्या पुण्याईमुळेच तुझं रक्षण होतंय. मी नसलो तरी तू पुण्यकर्म करीत रहा'' असे ते म्हणतात.

या कादंबरीला सुरुवात होते ती मुकेश व नीरजा स्केटिंगसाठी स्वित्झर्लंडला जातात तेव्हा. नीरजाला स्केटिंग करताना अपघात होतो. ती झाडावर जाऊन आदळते. तिला हॉस्पिटलमध्ये नेण्यात येते. तेथून लंडनला आल्यावर डॉक्टर म्हणतात, ''आठवडाभर तरी येथे रहावे लागेल.'' तिला हॉस्पिटलमध्ये ठेवून मुकेश घरी येतो.

**जोशी वकील मृत्यूपत्र वाचून दाखवतात. ''बँकेतील ठेवींचा निम्मा वाटा- नीरजाला... उरलेला वाटा सुमतीला. राहतं घर सुमतीला. पुढे ते कुणाला द्यायचं हे तिनं ठरवावं. बाकीची संपत्ती मुकेशला. मुकेश गारमेंटस्चे शेअर्स, कूर्गमधला कॉफीचा मळा, दिल्लीतलं घर.**

त्याला अन्सरिंग मशीनवर निरोप मिळतो. ''मुन्ना, बाबांना हार्टअॅटॅक. लगेच निघून ये.'' नीरजाचा रडण्याचा आवाज. नंतर पुन्हा फोन. ''मुन्ना, तू कुठं आहेस? बाबांची तब्येत ठीक नाही. लगेच ये.''

मुकेश लगेच ट्रॅव्हल एजंटला सांगतो, ''बंगलोरला जायचे आहे. फर्स्टक्लासचे तिकीट लगेच हवे आहे.'' वासंतीला तो सर्व कल्पना देतो. तिला बरोबर येणे शक्य नसते. ती त्याला एकटा जा म्हणते. फर्स्टक्लाससाठी तिप्पट पैसे देऊन विमानात तो जागा पटकावतो.

बंगलोरला विमानतळावरच त्याला घ्यायला शफी ड्रायव्हर येतो.

पहाटे चार वाजताच रावसाहेबांनी जगाचा निरोप घेतलेला असतो, हे मुकेशला कळते. शेवटी शेवटी रावसाहेब कोमात गेले होते; पण आधी मुन्नाची खूप आठवण काढत होते. मुन्नाला एकदम आईची आठवण येते...

मुकेश सर्व विधी यथासांग पार पाडतो.

अस्थिविसर्जनासाठी मुकेश श्रीरंगपट्टणला जातो.

त्यावेळी जोशी वकील सांगतात, ''या घराशी संबंधित काही कागदपत्र हवेत.''

मुन्ना ते कागदपत्र नीरजाकडून घ्या असे सांगतो.

अस्थिविसर्जनानंतर मुकेश परत घरी येतो.

जोशी वकील मृत्यूपत्र वाचून दाखवतात.

''बँकेतील ठेवींचा निम्मा वाटा– नीरजाला... उरलेला वाटा सुमतीला. राहतं घर सुमतीला. पुढे ते कुणाला द्यायचं हे तिनं ठरवावं. बाकीची संपत्ती मुकेशला... मुकेश गारमेंटस्चे शेअर्स, कूर्गमधला कॉफीचा मळा, दिल्लीतलं घर, बंगलोरमधील घर–'

सतीश म्हणतो, ''हे बरोबर नाही.''

उरलेली संपत्ती वीस कोटीची तरी होईल. नीरजाला फक्त बँकेतील ठेवीचा निम्मा वाटा. म्हणजे २५ लाख... एवढंच?

मुकेश म्हणतो, ''माझ्यातला निम्मा वाटा मी नीरूला देईन.''

सतीशची नाराजी स्पष्ट होते.



''ताई, संपत्तीपायी भांडणं नकोत. मी तुला अर्धा वाटा देतो. आपण दोघं एका रक्ताचे. एकत्र वाढलो... दुःखी होऊ नकोस. अबोला धरू नकोस.''

तर सतीश म्हणतो, ''तुला या संपत्तीचा अर्धा वाटा लिहून द्यायचाही हक्क नाही. कारण तू या संपत्तीचा वारस नाहीस... तू रावसाहेबांचा औरस मुलगा नाहीस. तू पाळलेला मुलगा आहेस.''

**तर सतीश म्हणतो, ''तुला या संपत्तीचा अर्धा वाटा लिहून द्यायचाही हक्क नाही. कारण तू या संपत्तीचा वारस नाहीस... तू रावसाहेबांचा औरस मुलगा नाहीस. तू पाळलेला मुलगा आहेस.''**

...आणि या कथानकाला एकदम नवे वळण मिळते.

''तू रावसाहेबांचा मुलगा नाहीस. फक्त नीरजा ही त्यांची मुलगी आहे.'' सतीश म्हणतो.

''कोण म्हणतंय तसं?''

''मी म्हणतो. तसा पुरावा आहे माझ्याजवळ.''

आणि सतीश त्याला एक फोटो दाखवतो. मुकेश आणि नीरजा यांचा लहानपणचा फोटो. असले फोटो अनेकदा पाहिलेले. ''हा कसला पुरावा?''

सतीश त्या फोटोच्या मागे बघायला सांगतो. त्यावर तारीख असते २-२-१९७०. पिक्चर पॅलेस, जालना असा शिक्का असतो... ''नीरूचा वाढदिवस ३१-१२-१९६७. तुझा जन्म १-१-१९७०. नीरूपेक्षा तू दोन वर्षे लहान. हा फोटो काढला तेव्हा तू होतास एक महिन्याचा... पण यात तू दिसतोस दोन वर्षांचा– नीरजाचा हॉस्पिटलमध्ये जन्मल्याचा दाखला आहे. तुझा?''

''हा फोटो कुठून मिळाला?''

''बाबांच्या तिजोरीत...'' नीरजाने तिजोरी उघडल्यावर तिला तो दिसला होता. तिने तो सतीशला दाखवला.

सतीश अम्माला विचारतो, ''मुन्नाची जन्मतारीख कोणती?''

तो तिला तो फोटो दाखवतो. तो फोटो बघताच अम्माचा चेहरा उतरतो.

''अम्मा, खरं सांगा. तुमचं अपत्य कोण? नीरजा की मुन्ना?'' सतीश पृच्छा करतो.

''आई, मी तुझी मुलगी नाही का? तू मला जन्म दिला नाहीस का?'' नीरजा.

''अम्मा, तुम्ही खरं काय ते सांगितलं नाहीत तर नीरूचा संसार उद्ध्वस्त होईल.'' सतीश.

**आपली आजवरची समाजात असणारी प्रतिमा, स्वतःबद्दलची ओळख हीच रद्दबातल ठरल्याने आपल्या पायाखालची भूमीच जणू कोणी ओढून घेते... आपले अस्तित्वच त्यामुळे संपुष्टात येते. आपली ओळख स्वतःलाच नव्याने करून घ्यावी लागते.**

"अम्मा, बाबांसाठी तरी तू खरं सांग. त्यांचा आत्मा अजून इथंच आहे."

सुमतीला रावसाहेबांचे शब्द आठवतात, "खऱ्याला एकच आई असते. खोट्याला अनेक आया असतात. खोटं जे असतं ते एक ना एक दिवस बाहेर पडायलाच हवं."

सुमती शेवटी सांगते, "नीरू, तू माझी मुलगी आहेस. मुन्ना हा मानलेला मुलगा आहे. पण मी त्याच्यावर पोटच्या पोरापेक्षाही जास्त प्रेम केलंय."

मुकेशला आपले जन्मरहस्य कळते...

पाच मिनिटांपूर्वी तो सुमतीचा एकुलता एक मुलगा होता; पण आता तिचा मानलेला मुलगा ठरतो.

मुन्ना सुमतीला विचारतो, "अम्मा, मला जन्म देणारी आई जिवंत आहे का?"

"आहे... तुझ्या आईनं तुला आपल्या हातानं आमच्याकडे सुपूर्द केलंय."

"ती कुठं आहे?"

"अमृतसरमध्ये. तिचं नाव रूपिंदर कौर."

"मग मी तुमच्या घरी कसा आलो?"

...आणि सुमती त्याला सगळी पूर्वीची कहाणी सांगते...

ती सगळीच काहणी येथे सांगायला हवी असे नाही.

आपली आजवरची समाजात असणारी प्रतिमा, स्वत:बद्दलची ओळख हीच रद्दबातल ठरल्याने आपल्या पायाखालची भूमीच जणू कोणी काढून घेते... आपले अस्तित्वच त्यामुळे संपुष्टात येते. आपली ओळख स्वत:लाच नव्याने करून घ्यावी लागते.

मुन्ना हा कर्नाटकातील ब्राह्मण रावसाहेबांचा पुत्र नव्हे; तो एका शीख सरदाराचा मुलगा आहे, ही नवी ओळख त्याला स्वत:ला द्यावी लागते... त्यासाठी त्याला पंजाबात जावे लागते.

...पण तीही आपली खरी ओळख नाही हे त्याला नंतर समजून येते. रूपिंदरला मुन्ना विचारतो, "पोटच्या मुलाला तू दुसऱ्याला दिलेस– तुला काही वाटले नाही?" ती म्हणते, "तू माझा मुलगा नाहीस. तू रेड इंडियन आहेस. तुझ्या आईकडून तू आमच्याकडे आलास. दत्तक म्हण हवे तर!"



**वासंती हा मुकेशचा शोधप्रवास ऐकून हसू लागते. "रेड इंडियनचे खूळ गेले ना डोक्यातून?" म्हणून ती हा प्रकार निकाली काढते. 'म्हैसूरला गेल्यावर यापैकी काहीही बोलायचे नाही. मार्टिनचे विश्व जसे वेगळे तसे अग्रहारमधले विश्वही वेगळे- असे ती बजावते.**

...आणि आपला जन्म अमेरिकेत झाला; आपला भाऊ अमेरिकेत अजूनही जिवंत आहे असे मुकेशला कळते.

तेव्हा अमेरिकेत कॅलिफोर्नियाला जाऊन तो अनाथाश्रमातून आपल्या भावाचा पत्ता लागतो का ते पाहतो...

...आणि रेस्टॉरंटमध्ये वेटर म्हणून काम करणाऱ्या मार्टिनचा पत्ता त्याला लागतो.

हुबेहूब आपलीच प्रतिकृती... हाच आपला भाऊ... आणखी सहा वर्षांनी आपण असेच दिसू... असे विचार मुकेशच्या मनात येऊन जातात.

एकाच आईच्या पोटी जन्मलेले... एकाच रक्ताचे दोघे भाऊ... संस्कार, जीवनशैली, शिक्षण यात मात्र कमालीची भिन्नता

मार्टिनच्या घरी मग 'एड' (मुकेश) जातो... मार्टिन बीफचा पॅक सेलमध्ये घेतो... मुकेशला त्यामुळे मळमळल्यासारखे होते.

घरी एक कृष्णवर्णीय स्त्री स्वागत करते. "ही माझी बायको... ही मुले– जेन व जॉन."

घरात दारिद्र्य... दारूचा वास...

मुकेश मुलांच्या हातावर शंभर शंभर डॉलर्स ठेवतो.

एवढा आटापिटा करून येथे आलो... पण सगळं व्यर्थ गेलं असं त्याला वाटतं.

मुकेश मार्टिनला स्वत:चा उद्योग सुरू कर म्हणतो. त्यासाठी पैसे देऊ पाहतो. पण मार्टिन नकार देतो. "तुझी माझी ओळख नाही... तुझी भेट मी कशी घेऊ?"

मुकेशला संपत्ती हडप करण्यासाठी आ वासून बसलेला सतीश आठवतो.

वासंती हा मुकेशचा शोधप्रवास ऐकून हसू लागते. "रेड इंडियनचे खूळ गेले ना डोक्यातून?" म्हणून ती हा प्रकार निकाली काढते. 'म्हैसूरला गेल्यावर यापैकी काहीही बोलायचे नाही. मार्टिनचे विश्व जसे वेगळे तसे अग्रहारमधले विश्वही वेगळे–' असे ती बजावते.

सुमती आणि रूपिंदर यांची भेट वासंती व मुकेश घडवून आणतात.

रूपिंदर किशनला– आपल्या मुलाला– मुकेश कोण हे सांगतच नाही.

**चित्रपटात शोभावी अशी ही कहाणी... आश्चर्यावर आश्चर्याचे धक्के देते. वेगवेगळ्या सांस्कृतिक परिसरात फिरवून आणते. जन्माने मिळणारी नाती- संस्कारांनी अंगवळणी पडणारी जीवनशैली यामधले अंतरही ती स्पष्ट करते.**

सुमतीच्या पायावर डोके ठेवून मुकेश म्हणतो, ''अम्मा, कुठल्याही देशात कुठल्याही घराण्यात जन्मलो म्हणून काय झालं? तू आणि बाबांनी मिळून माझ्यावर प्राणापलीकडे प्रेम केले. मला जीवनमूल्यं दिलीत... तू आणि रूपिंदर... भारतीय माता किती मोठ्या मनाच्या हे आता मला कळलंय... अम्मा, हे जीवन विचित्र आहे. माझा पायगुण वाईट म्हणून सुरिंदरनं मला घराबाहेर काढलं. त्याच मुलाला बाबांनी चांगल्या पायगुणाचा, भाग्योदय असं म्हटलं. माझ्या जीवनाचा प्रवास किती विचित्र आहे, नाही?''

''अम्मा, तू लंडनला कधी येणार आहेस?''

''वर्षश्राद्ध होऊ दे. मग मी तुझ्याबरोबर येईन.''

''सहा महिन्यांनी?''

''हो. मुन्ना, मला आजी होण्यासाठी अजून सात महिने आहेत.''

मुकेश वासंतीकडे आश्चर्याने बघतो. ती होकारार्थी मान हलवते. लाजते.

...स्वत:ची नवी ओळख मुकेशला पटते. नव्या अस्तित्वाची ग्वाही मिळते.

चित्रपटात शोभावी अशी ही कहाणी... आश्चर्यावर आश्चर्याचे धक्के देते. वेगवेगळ्या सांस्कृतिक परिसरात फिरवून आणते. जन्माने मिळणारी नाती– संस्कारांनी अंगवळणी पडणारी जीवनशैली यामधले अंतरही ती स्पष्ट करते.

डॉ. सुधा मूर्ती यांनी अत्यंत चटकदार शैलीत ही सर्व कथा फुलवली आहे.

जॅफ्रे आर्चरच्या 'सन्स ऑफ फॉर्च्युन'मध्ये, भैरप्पांच्या 'वंशवृक्ष'मध्ये अशाच प्रकारच्या आपल्याच रूढ ओळखीला, अस्तित्वाला आव्हान मिळते– आणि आजवर जपलेल्या मूल्यांना हादरा बसतो... अस्तित्वाचा नव्याने अर्थ शोधणे मग अपरिहार्य ठरते.

सुधा मूर्ती यांनी फार समंजसपणे हा प्रश्न सोडवला आहे.

खरे तर वासंतीला आपल्या नवऱ्याच्या रेड इंडियन परंपरेचा खरा धक्का बसावा; पण ती मुकेशला नि:संदिग्धपणे सांगते, ''तुम्हाला आठवतं? तुमच्या सुखदु:खात मी सहभागी होईन असं वचन सप्तपदीच्या वेळी मी दिलंय. तुम्ही कुणाचंही अपत्य असलात तरी माझे पती आहात.''

लग्नाच्या वेळी मुकेश कसा होता ते आपल्या दृष्टीने महत्त्वाचे; त्याचे घराणे



वगैरे नव्हे. गेल्या दोन वर्षांत तो नवरा म्हणून आपल्या कर्तव्याला चुकला नाही. त्याने प्रेम दिले, आपुलकी दिली. कुठेही आणि कधीही फसवाफसवी केली नाही. तो प्रामाणिकपणे वागत होता... त्याने काहीही लपवून ठेवले नव्हते... रावसाहेबांची संपत्ती नीरजाला देण्याचा त्याने घेतलेला निर्णयही वासंतीला योग्यच वाटतो. हा पैसा घेतला असता तर त्याला आयुष्यभर पश्चात्ताप करीत बसावे लागले असते. वडिलांसारखा तो निघाला. वडिलांचा वारसा पैशातच मोजायला असेल तर तो पैसाच नको असे त्याने ठरवले. हा गुण त्याने आपल्या वडिलांपासूनच घेतला... असा तिचा एकूण तर्कसंगत विचार तिला या समस्येतून मार्ग काढण्यास मदत करतो.

**वासंतीच्या या निर्णयामुळे मुकेशलाही आपल्या मार्गावरून पुढे जाणे, आपल्या अस्तित्वाचे अधिष्ठान टिकवून धरणे शक्य होते. जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने बघून योग्य तो निर्णय प्रगल्भ पातळीवर घेणे हेच आपल्या अस्तित्वाला आशयघन बनवते.**

वासंतीच्या या निर्णयामुळे मुकेशलाही आपल्या मार्गावरून पुढे जाणे, आपल्या अस्तित्वाचे अधिष्ठान टिकवून धरणे शक्य होते. जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने बघून योग्य तो निर्णय प्रगल्भ पातळीवर घेणे हेच आपल्या अस्तित्वाला आशयघन बनवते.

**पृष्ठे: १०४ ● किंमत: ८० रु. ● सभासदांना: ६० रु. ● पोस्टेज: २० रु.**

**सुधा मूर्ती यांची पुस्तके**




**गोष्टी माणसांच्या**

**अनु. लीना सोहोनी**


**वाइज अँड अदरवाइज**




**१३० रु.**

**पोस्टेज प्रत्येकी : २५ रु.**

**१५० रु.**




# पुण्यभूमी भारत

## सुधा मूर्ती यांनी टिपलेले मानवी स्वभावाचे वैशिष्ट्यपूर्ण नमुने

**सुधा मूर्ती**
**अनु. लीना सोहोनी**

'पुण्यभूमी भारत'मध्ये सुधा मूर्ती यांनी वेगवेगळे अनुभव सांगणाऱ्या ३१ लेखांचे संकलन केले आहे. 'वाइज अँड अदरवाइज' आणि 'गोष्टी माणसांच्या' या त्यांच्या आधीच्या दोन पुस्तकांप्रमाणेच या पुस्तकातही मानवी स्वभाववृत्तीच्या वेगवेगळ्या छटा संवेदनाशील मनाने टिपण्यात आलेल्या आहेत.

सुधा मूर्ती या इन्फोसिस फाउंडेशनच्या अध्यक्ष आहेत आणि त्या विश्वस्तनिधीद्वारे अनेक समाजोपयोगी कार्यांना सक्रिय मदत देत असतात. कर्नाटकात लहान लहान खेडेगावातही या फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी 'गाव तेथे ग्रंथालय' हा उपक्रम व्यापक प्रमाणावर राबवला आहे; गरजू विद्यार्थ्यांना मदत, आपत्तिग्रस्तांना मदत, वसतिगृहांना मदत, परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, वृद्धाश्रमांना सहाय्य, रुग्णालयांना इमारती व उपकरणे यासाठी अनुदान अशा निरनिराळ्या मार्गांनी समाजाकडून जे मिळते ते समाजाला परत देण्याचा धर्म त्या निभावत आहेत. मात्र हे दान सत्पात्री असावे यावर त्यांचा कटाक्ष असतो. त्या वेगवेगळ्या सामाजिक कार्यांमध्ये सहभागी होतात; सेवाभावी व्यक्ती आणि संस्था यांच्या कामाची प्रत्यक्ष माहिती घेतात; चांगल्या कामासाठी योग्य ती मदत करतात. कुठल्याही प्रकारची बडिवार न माजवता, प्रसिद्धीची अपेक्षा न धरता त्या मदतीसाठी तत्पर असतात. 'नितळ' हा चित्रपट पांढरे डाग असणाऱ्या व्यक्तीविषयी समाजात असणारे गैरसमज दूर करण्याच्या दृष्टीने काढण्यात आला. 'महाश्वेता' ही कादंबरी सुधा मूर्ती यांनी कोड असणाऱ्या नायिकेच्या जीवनाला केंद्रीभूत धरून लिहिली आहे. 'नितळ'बद्दल त्यांना कळले, तेव्हा त्यांनी 'नितळ'च्या प्रीमियर शोच्या प्रसंगी उपस्थित राहून त्याला भरघोस रकमेचा धनादेश दिला. कुठलीही अट न घालता, केवळ हे काम सामाजिक जागृतीचे व संवेदनाक्षमता वाढीचे आहे– हे बघून त्यांनी त्याला हातभार लावला. गेली दोन दशके सुधा मूर्ती आणि इन्फोसिस फाउंडेशन यांनी भारतीय पातळीवर आपल्या या दातृत्वाने सामाजिक कार्यात एक आदर्श निर्माण केला आहे.

सुधा मूर्ती यांचे अनुभव रेखाटणारे तीनचार पृष्ठांचे लेख– पण ते वाचकांच्या हृदयाला भिडतात. त्यामुळेच त्यांच्या या पुस्तकांचे अनुवाद वीस-बावीस भारतीय भाषांमध्ये अल्पावधीतच झाले.

**"सुरुवातीला इन्फोसिस फाउंडेशनची मी आई होते आणि ते माझं बाळ होतं. पण आता फाउंडेशन हीच माझी आई झाली आहे आणि तिचा हात पकडून मी आयुष्याचा कधी सुखकर, तर कधी खडतर प्रवास केला आहे...**

'इन्फोसिस' फाउंडेशन'ला त्यांनी जन्म दिला. त्यामुळे त्याचे मातृत्व त्यांच्याकडे जाते. पण आता त्या म्हणतात, "सुरुवातीला इन्फोसिस फाउंडेशनची मी आई होते आणि ते माझं बाळ होतं. पण आता फाउंडेशन हीच माझी आई झाली आहे आणि तिचा हात पकडून मी आयुष्याचा कधी सुखकर, तर कधी खडतर प्रवास केला आहे... फाउंडेशन हा माझ्या आयुष्याचा अविभाज्य घटक आहे. आम्ही परस्परांची साथसंगत कधीच सोडलेली नाही. ना दुःखात, ना सुखात. माझ्या जीवनात माझ्या वैयक्तिक सुखापेक्षा इन्फोसिस फाउंडेशनचं स्थान नेहमीच वरचं राहिलेलं आहे." म्हणून हे पुस्तक त्यांनी इन्फोसिस फाउंडेशनलाच अर्पण केले आहे.

सुधा मूर्ती यांचे हे बरेचसे अनुभव इन्फोसिस फाउंडेशनच्या निमित्ताने भेटणाऱ्या व्यक्तींबद्दलचे आहेत आणि त्याद्वारे मानवी स्वभाववृत्तीच्या वेगवेगळ्या पैलूंचे जे दर्शन त्यांना घडले; ते कधी त्यांना विस्मयचकित करणारे ठरले तर कधी उद्विग्न करणारे वाटले. आपल्याला जाणवलेले हे भलेबुरे अनुभव लिहून काढण्यात आणि सांगण्यात त्यांना स्वारस्य वाटते. ते अनुभव आपल्या वाचकांना वा सुहृदांना कथन करण्यात, शेअर करण्यात त्यांना आनंद वाटतो. आपल्याला आले तसेच अनुभव इतरांनाही येत असणार आणि त्यायोगे त्यांनाही मानवी स्वभाववृत्तीतील चांगुलपणा किंवा उथळपणा, निःस्वार्थीपणा किंवा आपमतलबीपणा, आत्मीयता किंवा तुटकपणा जाणवला असणार... त्यावरून योग्य तो बोध घेणे, सावधगिरी घेणे आणि वाईट अनुभव आले तरी त्यामुळे आपले चांगुलपण न विसरता काम करीत राहणे; नकारात्मक अनुभवांमुळे मानवतेवरचा विश्वास डळमळीत होऊ न देणे... या दृष्टीने त्या वाचकांचे मनोबलही जणू परिपुष्ट करतात. खूप

> ''माझ्या आजीचं वागणं मनावर घेऊ नका. ते विचित्र वाटेल तुम्हाला... पण ती तुमचे आभार मानते आहे. तुमच्या देशाने आमच्या दलाई लामांना सन्मानपूर्वक आश्रय दिला आहे. आम्ही दलाई लामांना साक्षात परमेश्वर मानतो.

माणसे बघितल्याने प्रामाणिक माणूस कोण आणि ढोंगी माणूस कोण हे सहजपणे ओळखता येते. आणि ढोंगी माणसाला 'एक्स्पोझ' करण्याची संधीही त्या वाया दवडत नाहीत.

अर्थात माणसाच्या निरपेक्ष प्रेमाचे आणि प्रामाणिकपणाचे अनुभव अधिक आश्वासक असतात आणि त्यामुळेच भारतात त्यांना 'पुण्यभूमी'च दिसते हे उघड आहे. इतर देशांमध्येही भारताबद्दल तशी 'पुण्यभूमी'ची भावना आढळून येते याचीही नोंद त्या करतात.

तिबेटच्या ल्हासा शहरातील जोखांग मंदिरात गेल्यावर तेथील मठाधिकारी सुधा मूर्तींशी हस्तांदोलन करून एक पांढरा स्कार्फ त्यांच्या खांद्यावर ठेवतात; तर तेथे दर्शनाला आलेली एक वृद्ध स्त्री त्यांचा हात हाती घेऊन त्याचे चुंबन घेऊन काहीतरी पुटपुटते; आणि तिचा नातू इंग्लिशमध्ये सांगतो, ''माझ्या आजीचं वागणं मनावर घेऊ नका. ते विचित्र वाटेल तुम्हाला... पण ती तुमचे आभार मानते आहे. तुमच्या देशाने आमच्या दलाई लामांना सन्मानपूर्वक आश्रय दिला आहे. आम्ही दलाई लामांना साक्षात परमेश्वर मानतो. माझी आजी त्यांची नि:स्सीम भक्त आहे. ती तुम्हाला 'भारत ही पुण्यभूमी आहे' असे सांगत होती...''

इन्फोसिस फाउंडेशनच्या कामाच्या निमित्ताने भेटणाऱ्या व्यक्ती, देणगीच्या नावाने फसवणूक करणाऱ्या व्यक्ती, खोटे कारण सांगून मदत मिळवणाऱ्या व्यक्ती, मदतीच्या कार्यात अडथळा आणणारे महाभाग, चांगल्या कामाला मदत देण्याची संधी असूनही त्याबाबत अनुत्साह वा तिटकारा दाखवणाऱ्या व्यक्ती, सवलतीत वा मोफत उपचार मिळवण्यासाठी फाटके कापड घालून येणाऱ्या सुखवस्तू कुटुंबातील व्यक्ती, एकापेक्षा अधिक वेळा रांगेत उभे राहून ब्लँकेटस् वगैरे दोनदोनदा घेऊ पाहणाऱ्या व्यक्ती यांचे किस्से या लेखांमध्ये आले आहेत.

मदत देण्याआधी काटेकोर पाहणी करून गरजूंची यादी तयार केली जाते. परंतु ही यादी डावलून काही पुढारी व्यक्ती आयत्या वेळी कोणाला तरी पुढे करून अधिक वस्तू मागतात; न दिल्यास तुमची मदत नको अशी धमकी देतात. सुधा मूर्ती अशा धमक्यांना दाद देत नाहीत. त्या म्हणतात, ''आम्ही गरजूंची यादी तयार केली. तेवढ्या वस्तू आणल्या आहेत. आयत्या वेळी तुम्ही जादा नावे घुसडणार व धमक्या देणार असाल तर– आम्ही आणलेले सामान



परत नेऊ. वाटप करणार नाही.''

> **इन्फोसिस फाउंडेशनमुळे सुधा मूर्ती यांना सेलिब्रेटी स्टेटस् लाभलेली आहे. लोक सुधा मूर्ती यांना कार्यक्रमांना बोलावतात. फोटो वगैरे काढून घेतात; पण कधीकधी साध्या चहाचे वा जेवणाचेही आतिथ्य करायचे विसरतात-**

आपल्या मुलाला– सोमनाथला कॅन्सर झाला आहे, उपचारासाठी पैसे हवेत म्हणून मदत घेऊन जाणारा त्याचा बाप रामप्पा सुधा मूर्ती यांजकडून मिळालेल्या मदतीच्या आधारे इतरांकडूनही पैसे गोळा करतो आणि सोमनाथवर उपचार न करता स्वत:चं घर बांधतो; सोमनाथ मरणारच आहे तर त्यावर उपचारापोटी उगाच खर्च कशाला करा, असा रामप्पाचा युक्तिवाद असतो... (वात्सल्य) चार हप्त्यात पैसे परत करीन असे आश्वासन देऊन गणपती हा इन्फोसिसकडून एक लाख रुपये गावातील पाणपोईसाठी नेतो. इमारतीचे उद्‌घाटन सुधा मूर्तींच्या हस्ते होते. त्यावेळी इन्फोसिसच्या 'मदतीचा चेक' म्हणून दहा हजार रुपये देतो व उरलेल्या ९५ हजारमध्ये पाणपोईचे काम झाले असे सांगतो. मात्र तेथील संगमरवरी शिलेवर 'गावच्या प्रेमासाठी गणपतीकडून भेट' असा मजकूर असतो. पैसा इन्फोसिसचा, श्रेय स्वत:ला, असा हा प्रकार (देणगी).

इन्फोसिस फाउंडेशनमुळे सुधा मूर्ती यांना सेलिब्रेटी स्टेटस् लाभलेली आहे. लोक सुधा मूर्ती यांना कार्यक्रमांना बोलावतात, फोटो वगैरे काढून घेतात; पण कधीकधी साध्या चहाचे वा जेवणाचेही आतिथ्य करायचे विसरतात– याचेही काही मजेदार नमुने 'दुधारी सुरी'मध्ये आले आहेत.

सुधा मूर्ती यांच्या अनेक जुन्यानव्या मैत्रिणींचे किस्सेही या पुस्तकात येतात.

सतत चिंता करणारी, तक्रार करणारी, गाऱ्हाणी गाणारी सरोज (चप्पल घालून चाल), दुसऱ्यांच्या वैभवाची वा यशाची आपल्याशी तुलना करून दु:खी वा आनंदी होणारी सुमन, तिला आग्रहाने खाऊ घालणारी व ती खात नाही म्हणून दोष देणारी जया (पाहुणचार) या काही मैत्रिणी.

बोलकी राधा व अबोल शांत रोहिणी या त्यांच्या विद्यार्थिनी म्हणून हाताखालून गेल्यावर काही काळाने भेटतात, तेव्हा त्यातील रोहिणीमध्ये न्यूनगंडाची भावना प्रबळ दिसते; त्याबद्दलची कारणमीमांसा 'निवडीचं स्वातंत्र्य'मध्ये आलेली आहे. संपन्न राधा रोहिणाच्या मुलांसाठी भारी भेटी आणते तेव्हा ती आपल्याला हिणवते आहे, असे रोहिणीला वाटत राहते. सुधा मूर्ती तिला सल्ला देतात, ''भेटीमागची भावना लक्षात घे. उगाच न्यूनगंड बाळगू नकोस. त्यामुळे तुझ्यात व राधामध्ये दुरावा निर्माण होईल...''

**आजी एकदा लेखिकेला म्हणते, ''मला फक्त दहा मुलं झाली; पण या दोन हातांनी मी गावातल्या शंभरावर मुलांना जन्म दिला आहे. अक्का, तू तुझ्या आयुष्यात तुझ्या पोटच्या कितीही मुलांना जन्म दे. पण तरीही तू सुद्धा शंभर मुलांची आई** हो.''

शालिनी, मालिनी व रुद्राणी या तीन मैत्रिणींपैकी रुद्राणी श्रीमंता घरची; लाजाळू आणि शांत. शालिनी मनमोकळी, बोलभांड. मालिनी कमी बोलणारी. लग्नानंतर तिची आर्थिक स्थिती ढासळलेली... या मैत्रिणी अधूनमधून भेटत असतात. शालिनीला दागिन्यांचे प्रदर्शन करायची हौस. भरपूर साड्या बाळगण्याची हौस. रुद्राणी श्रीमंत असूनही मालिनीच्या घरी जायचे म्हणून दागिने वगैरे फारसे न घालता जाते, श्रीमंतीचा बडेजाव मिरवत नाही. ''बरोबरीच्या लोकांमध्ये वावरताना मोकळेपणा वाटतो. परिस्थितीशी तुलना करू नये. पैसा, संपत्ती या गोष्टी काळानुसार येतात, जातात. मैत्री घट्ट ठेवायची असते...'' असे ती म्हणते तेव्हा शालिनीचा चेहरा पडतो. (अलंकार)

सावित्री ही कॉलेजमधील सहकारी प्राध्यापिका. ती दुसऱ्याबद्दल कायम टीकात्मक बोलत असते. अफवा पसरवत असते. तेव्हा लेखिका तिला एकदा सांगते, ''अशा अफवांमुळे कितीतरी कुटुंबं उद्ध्वस्त झाली आहेत. एखाद्या व्यक्तीच्या पाठीमागे तिच्याविषयी बोलणं, अफवा पसरवणं ही वाईट गोष्ट आहे. अशा व्यक्तीपासून लोक नेहमी चार हात दूर राहणं– पसंत करतात.'' (गॉसिप)

आपली आजी अंबाबाई... अंबाक्का... हिनं गावात शंभरावर बाळंतपणं केली. त्यामुळं तिला लोक शंभर मुलांची माता म्हणत. आजी एकदा लेखिकेला म्हणते, ''मला फक्त दहा मुलं झाली; पण या दोन हातांनी मी गावातल्या शंभरावर मुलांना जन्म दिला आहे. अक्का, तू तुझ्या आयुष्यात तुझ्या पोटच्या कितीही मुलांना जन्म दे. पण तरीही तू सुद्धा शंभर मुलांची आई हो.''

या पुस्तकातील काही लेख हे पाकिस्तान, तिबेट, दक्षिण आफ्रिका, ब्लॅक फॉरेस्ट येथील भेटींच्या संदर्भातील आहेत. पाकिस्तानात अगदी भारतात असल्यासारखे वाटते. पण तेथील म्युझियमच्या प्रवेशासाठी शुल्क मात्र 'परदेशी' म्हणून भरमसाट घेतले जाते असा अनुभव त्या नमूद करतात. (परदेशी) पाकिस्तानातील आपल्या जन्मघराच्या पुढील रस्त्यावरची माती मस्तकी लावून रूपा म्हणते, ''कुण्या अनोळखी माणसानं एका निर्जीव आकाशावर एक रेषा ओढली... खुशाल दोन देश बनवून टाकले. अचानक आम्ही आपल्याच भूमीवर परके झालो... दोन देशांची फाळणी करणारी रेषा मला माझ्याच भूमीत परकं करून गेली... माझी



वेदना... इतरांना कधीच कळू शकणार नाही.''

'ब्लॅक फॉरेस्ट'मधील हत्ती, सिंह, पक्षी यांचे दर्शन आणि स्वभावविशेष लेखिकेला थक्क करतात. वाचकांनाही थक्क करतील.

**प्रत्येक फुलाचं स्वतःचं असं खास सौंदर्य असतं. म्हणूनच आपल्याला दोन फुलांमध्ये तुलना करता येत नाही. निसर्ग हा फार मोठा कलावंत आहे. त्याचमुळे प्रत्येक व्यक्तीचं स्वतःचं खास वेगळेपण असतं... प्रत्येकाला आपापल्या मर्यादा असतात...**

सुधा मूर्ती यांच्या व्यक्तिमत्त्वातील प्रांजल, निरपेक्ष पैलूंमुळे त्यांच्या या अनुभवांमध्ये वाचकांनाही सहजपणे सहभागी होता येते.

त्यांच्या मैत्रिणी, त्यांचे प्रवास, त्यांचे इन्फोसिसमार्फत चाललेले कार्य, त्यांची समाजसेवा याबद्दल जाणून घेता आल्याने त्यांच्याबद्दलची जवळक वाटते.

त्यांच्या या लेखांत अनेक सुविचार, सुभाषिते विखुरलेली आहेत. ती लक्ष वेधून घेतात.

* जो माणूस स्वत: असमाधानी असतो तो दुसऱ्याला कधीच आनंद देऊ शकत नाही. (८)

* तुमचा दृष्टिकोन जर चांगला असेल तर तुम्ही स्वत:भोवती स्वर्ग निर्माण करू शकता... तुम्ही कुठेही असलात तरी! (१०)

* मातृत्व ही निसर्गदत्त देणगी आहे. तिथे जात, धर्म, वंश... कशाकशाचा संबंध नसतो. आपल्या भारतीय संस्कृतीनं मातृत्वाला शिरोधार्थ मानलं आहे. म्हणूनच मातेला सर्वोच्च आदराचं स्थान मिळतं... (३)

* गरिबी ही मातृत्वापेक्षाही जास्त मोठी असते का? (५)

* तुलना करून दुसऱ्याचा मत्सर करीत बसण्यापेक्षा स्वत:त सुधारणा करणं किती तरी चांगलं... एखादी व्यक्ती आपल्यापेक्षा सरस वा वरचढ असेल तर त्या व्यक्तीची आणि आपली ओळख आहे याचा आपल्याला आनंद वाटायला हवा. (१४)

* प्रत्येक फुलाचं स्वत:चं असं खास सौंदर्य असतं. म्हणूनच आपल्याला दोन फुलांमध्ये तुलना करता येत नाही. निसर्ग हा फार मोठा कलावंत आहे. त्याचमुळे प्रत्येक व्यक्तीचं स्वत:चं खास वेगळेपण असतं... प्रत्येकाला आपापल्या मर्यादा असतात... मर्यादा असणं हा काही त्या व्यक्तीचा दोष नसतो. (१४)

* आयुष्य ही सतत बदलत असणाऱ्या घटनांची मालिका असते. (१५)

* आपल्याला अनेक लोक भेटतात आणि पुन्हा दूर जातात. एखादा

> **प्रत्येक स्वयंपाकघरातून तांदूळ, तेल, गहू सगळंच असतं. तरीही प्रत्येक घरच्या स्वयंपाकाची चव वेगळीच असते ना? त्याचप्रमाणे आयुष्यात प्रेम, संघर्ष, जन्म, मृत्यू यांचं गाठोडं असतंच. लेखक म्हणून आम्ही त्यातून काहीतरी उचलतो आणि त्यावर लिहितो.**

नशीबवान असलाच तर त्याच्या मृत्यूनंतरही जग त्याची आठवण काढतं. (१५)

* प्रत्येक स्वयंपाकघरात तांदूळ, तेल, गहू सगळंच असतं. तरीही प्रत्येक घरच्या स्वयंपाकाची चव वेगळीच असते ना? त्याचप्रमाणे आयुष्यात प्रेम, संघर्ष, जन्म, मृत्यू यांचं गाठोडं असतंच. लेखक म्हणून आम्ही त्यातून काहीतरी उचलतो आणि त्यावर लिहितो. (१६)

* आपण आयुष्याकडे ज्या नजरेनं पाहू तसं आपल्याला जग दिसतं. (१८)

* समाजसेवेचं व्रत घेऊन कोणीही व्यक्ती लोकांसाठी काही काम करीत असली तर त्याबद्दल विपर्यस्त भूमिका घेणारे लोक आढळतातच. (१८)

* दात्यांची कधी चणचण पडत नाही. वानवा असते ती व्यवस्थापनाची, काम करणाऱ्या यंत्रणेची... (२०)

* आपलं मन स्वच्छ, नितळ, असेल तर चांगली मैत्री होऊ शकते. (२३)

* आपल्याला जर सुखी व्हायचं असेल तर आपला दृष्टिकोन आधी बदलला पाहिजे. जगाचा नाही. (२६)

* या चिखलानं भरलेल्या जगात जर तुला आपले पाय स्वच्छ ठेवायचे असतील तर त्याला दोनच उपाय आहेत. एकतर संपूर्ण पृथ्वी चामड्यानं झाकून टाकणं नाहीतर स्वत:च्या पायात चप्पल घालणे; असं भगवान बुद्ध म्हणत. (२६)

* बुद्धाला समजून घेण्यासाठी बौद्ध होण्याची गरज नाही. त्यांचा उपदेश समजून घेतला तर त्याचं मोल खऱ्याखुऱ्या रत्नापेक्षा जास्त आहे. (२६)

* एखाद्या व्यक्तीला आर्जवानं खाण्याची विनंती करणं हा सुसंस्कृतपणा आहे; पण त्या व्यक्तीला काही कारणानं पथ्य असेल तर त्यातून काही चुकीचा अर्थ लावणं योग्य नाही. (३०)

* आजकाल माणसाला कणाकणानं मारत जाणारी अनेक दुखणी आढळतात. त्यांच्यावर ताबा मिळवायचा तर आपल्याला आधी आपल्या जिभेवर ताबा मिळवायला हवा. (३०)

* दुसऱ्या कुणाचं दु:ख वाटून घेणं, दुसऱ्याला मदत करणं म्हणजे



आयुष्याला अर्थ देणं. (३७)

> **आयुष्यात कुठल्या ना कुठल्या संकटाचा सामना करावाच लागतो असं मला शिकवण्यात आलं होतं. त्यामुळे माझ्यापुढे कोणतंही संकट आलं की इतरांची दु:खं बघितल्यावर मला वाटायचं, त्यामानानं आपलं दु:ख काहीच नाही**

* खऱ्या मैत्रीमध्ये तुमच्या सामाजिक स्थानाचा काहीएक संबंध नसतो. (४८)

* आपण एखाद्या जवळच्या व्यक्तीला प्रेमानं जी भेट देतो त्या भेटीची किंमत पैशात करायची नसते. त्या भेटीमागची भावना महत्त्वाची असते. (४८)

* नातेवाईक तर जन्माबरोबर मिळतात; पण मित्र आपल्याला निवडता येतात... ही खरोखर देवाचीच कृपा... (४८)

* प्रत्येकाला आयुष्यात कुठल्या ना कुठल्या संकटाचा सामना करावाच लागतो असं मला शिकवण्यात आलं होतं. त्यामुळे माझ्यापुढे कोणतंही संकट आलं की इतरांची दु:खं बघितल्यावर मला वाटायचं, त्यामानानं आपलं दु:ख काहीच नाही... (५७)

* या जगात प्रत्येक गोष्टीची किंमत आपल्याला मोजावीच लागते. प्रत्येक घडणाऱ्या गोष्टीला एक कारण असतं आणि प्रत्येक घडणाऱ्या गोष्टीचा एक परिणामही असतो. (५८)

* तुमच्याकडे जी औषधे जास्तीची उरली आहेत, ती देणगी म्हणून देण्याची आपली इच्छा आहे... पण त्या औषधांसाठी योग्य ठरेल असा रोग आम्ही निर्माण करू शकत नाही. त्यामुळे ती जास्तीची औषधे देणगी म्हणून स्वीकारता येत नाहीत... (६४)

* मानवजातीची सेवा आणि व्यवसाय यांची गल्लत करू नका. नाहीतर या दोन्ही गोष्टी बिघडवून टाकाल. (६४)

* एखाद्या व्यक्तीच्या निधनानंतर तिच्याबद्दल खरोखर दु:ख वाटून अश्रू ढाळणारी माणसं अस्तित्वात असली तर ती मरणारी व्यक्ती भाग्यवानच म्हटली पाहिजे. (६९)

* एखादी व्यक्ती जेव्हा लढाईला उभी ठाकते तेव्हा ती लढाई चालू ठेवण्यासाठी तिला कोणीतरी प्रतिस्पर्धी लागतो. वार केल्यावर प्रतिकार करणारा समोर कोणी योद्धाच नसेल तर लढाई करणार कुणाशी?... (७९)

* जन्मभर इतरांची निंदानालस्ती करणाऱ्यांना त्यांच्या वागण्याचं फळही तसंच मिळतं. अखेर त्यांच्या वाट्याला एकाकीपणा येतो. (७९)

आपण स्वतः संकटाशी झुंजत असताना दुसऱ्याचा विचार करणारी माणसं या जगात विरळाच! इथे तुमचे शिक्षण, भाषा, जातपात, धर्म या कशाकशाचा संबंध नसतो. त्यासाठी हृदयात अपार करुणा असावी लागते. (१६५)

* रागाच्या भरात कोणी काही बोलले तर त्याचा उलटसुलट अर्थ लावून वाद घातला तर त्यातून तुमचे संबंधच संपुष्टात येतील. (७९)

* दानधर्म आपणा स्वत:ला करायचा नसेल तर करू नये. पण दुसरा कोणी दानधर्म करीत असेल तर त्याचा गैरफायदा तरी घेऊ नये. (११२)

* आपण गरिबी हटवू शकतो. पण माणसाची वृत्तीच लोभी असेल तर ती नाही घालवू शकत. (११३)

* माणसाचं सौंदर्य त्याच्या चेहऱ्यावर जे तेज असतं त्यातच असतं. ते काही दागिन्यांमध्ये नसतं. (११७)

* पैसा, संपत्ती या गोष्टी काळानुसार येतात, जातात. पण खरी घट्ट धरून ठेवायची असते ती मात्र मैत्री. (११७)

* निरागसपणा हा माणसाच्या ठायी असणारा विश्वास आणि श्रद्धा यामुळे आलेला असतो... लहान मूल हे नेहमीच निरागस असतं. आपण मोठी माणसं अज्ञानी असलो तरी निरागस नसतो. (१२२)

* आपण स्वत: संकटाशी झुंजत असताना दुसऱ्याचा विचार करणारी माणसं या जगात विरळाच! इथे तुमचे शिक्षण, भाषा, जातपात, धर्म या कशाकशाचा संबंध नसतो. त्यासाठी हृदयात अपार करुणा असावी लागते. (१६५)

ही सर्व निरीक्षणे आपल्याला अंतर्मुख करतील; आपल्याला विशिष्ट कसोटीच्या वेळी मार्गदर्शन करतील.

एकूणच, 'पुण्यभूमी भारत'मधील लेखांमुळे जीवनाच्या विविध पैलूंवर प्रकाश पडेल. कोणताही लेख वाचायला घेतला की संपवल्याशिवाय थांबावेसे वाटत नाही. सुधा मूर्ती यांच्या अनुभवविश्वात सहज प्रवेश मिळवून देणारे हे पुस्तक आहे. 'वाइज अँड अदरवाइज' आणि 'गोष्टी माणसांच्या' ह्या त्यांच्या आधीच्या पुस्तकांकडेही पुन्हा नव्याने वळावेसे त्यामुळे वाटेल.

**पृष्ठे: १७६ ● किंमत: १३० रु. ● सभासदांना: ९८ रु. ● पोस्टेज: २५रु.**



# रणजित देसाई यांची पुस्तके

| | | | |
|---|---|---|---|
| **कादंबरी** | मूल्य | गंधाली | १०० |
| स्वामी | १६० | मोरपंखी सावल्या | ६० |
| **(राज्य पुरस्कार १९६२, ह. ना. आपटे पुरस्कार १९६३, साहित्य अकादमी पुरस्कार १९६४)** | | मेघ | १०० |
| | | आषाढ | ८० |
| | | वैशाख | ९० |
| श्रीमानयोगी | ४०० | प्रपात | १०० |
| अभोगी | १५० | संकेत | ८० |
| राधेय | १५० | बाबुलमोरा | १२५ |
| पावनखिंड | १०० | मेख मोगरी | ७० |
| माझा गाव | १५० | **नाटके / एकांकिका** | |
| समिधा | १०० | लोकनायक | ५० |
| बारी | १२० | संगीत तानसेन | ३० |
| राजा रविवर्मा | १८० | कांचनमृग | ४० |
| प्रतिक्षा | ८० | पंख जाहले वैरी | ५० |
| शेकरा | ६० | पांगुळगाडा | ६० |
| लक्ष्यवेध | ९० | तुझी वाट वेगळी | ६० |
| **कथासंग्रह** | | सावली उन्हाची | ५० |
| रुपमहाल | ८० | **ललित** | |
| मधुमती | ८० | स्नेहधारा | ९० |
| कमोदिनी | १०० | संचित | |
| आलेख | १२० | (निवडक अध्यक्षीय भाषणे) | ६० |

**पोस्टेज खर्च वेगळा**












# डॉलर बहू

## अमेरिकेतील भारतीयांचे जीवन म्हणजे दुरून डोंगर साजरे

**सुधा मूर्ती**
**अनु. उमा कुलकर्णी**

'डॉलर बहू' ही सुधा मूर्ती यांची कादंबरी अनेक भाषांमध्ये अनुवादित झाली आहे आणि तिच्यावर टेलिसीरियलही झाली आहे.

अमेरिकेत सध्या भारतीय तरुण संगणकक्षेत्रात, माहितीतंत्रज्ञान क्षेत्रात मोठ्या संख्येने कार्यरत आहेत आणि त्यांना तेथे होणारी प्राप्तीही अमेरिकेतील उच्च श्रेणीतील वर्गाशी तुल्यबळ असल्याने, कोणालाही त्यांचा हेवा वाटावा– असे सध्याचे वातावरण आहे. अमेरिकेचे आकर्षण त्यामुळे सर्वांना वाटते. अमेरिकन विद्यापीठात प्रवेश मिळावा म्हणून दरवर्षी दीडदोन लाख पदवीधर मुलांचा प्रयत्न असतो. तेथे एम.एस., पीएच.डी. वगैरे पदव्या मिळाल्या की कँपस इंटरव्ह्यूमध्येच बहुतेकांना नोकऱ्या मिळतात. चांगला पगार मिळू लागतो. अशा तरुणांशी लग्न होऊन अमेरिकेत वास्तव्य करता यावे असे स्वप्न कितीतरी तरुणी बाळगत असतात आणि अमेरिकेत गेल्यावर तेथील सुबत्तेच्या, समृद्धीच्या, सुखसोयींच्या भुलभुलैय्यात हरवून जाण्यात धन्यता मानतात. अमेरिकेत ग्रीनकार्ड मिळाले म्हणजे आयुष्याचे सार्थक झाले अशी भावना सर्वदूर दिसते. अमेरिकन जीवनशैली अंगवळणी पडली की भारतात परत येणे नकोसे वाटते. अशा जोडप्यांना होणारी मुलेबाळे लहानपणापासून अमेरिकन ढंगात वाढत राहिली तर विचारूच नका. भारतीय वातावरण, येथील अस्वच्छता, बेशिस्त, दारिद्र्य, गैरसोय वगैरे बघून हा देश आपला नव्हे, अशी त्यांची धारणा होते आणि भारताला कधीमधी धावती भेट देण्यापलीकडे त्यांचे मायभूमीशी काही नाते उरत नाही.

अमेरिकेत वास्तव्य करणाऱ्या तरुणाशी लग्न करून 'डॉलर बहू' होण्याची स्वप्ने बघणाऱ्या तरुणीची कथा डॉ. सुधा मूर्ती यांनी 'डॉलर बहू' या कादंबरीत सांगितली आहे. अशा डॉलरबहूचे कौतुक सासरी-माहेरी सर्वांना वाटते.



परंतु अमेरिकेतले भारतीयांचे जीवन हे दुरून वाटते तितके गोंडस, ग्लॅमरस नसते; तेथे पगार वगैरे चांगला असला आणि जाती, भाषा, धर्म यांच्या राजकारणाचा जाच टाळून आपलं काम निर्वेधपणं करून चांगल्या प्रकारे जगणं शक्य असलं तरी अमेरिकेत आपण तसे उपरेच असतो आणि तसे एकाकीही असतो; अडीअडचणीच्या वेळीही मित्रमंडळी तेवढ्यापुरती मदतीला आली तरी आपले आपणच बघणे क्रमप्राप्त असते. आपले परिचित वर्तुळ आधारासाठी लागते. तेथील नोकरीमध्ये भरपूर काम करावे लागते; नोकरचाकर ठेवणे अशक्यप्राय असल्याने स्वत:च आपली सर्व कामे करणे भाग असते; अर्थात तेथील सुखसुविधांमुळे तेही जमणे अवघड जात नाही आणि तेथील त्या सुखसुविधा अंगवळणी पडल्यावर काही वर्षांनी पुन्हा भारतात येऊन येथे नव्याने आपले लागेबांधे निर्माण करून जम बसवणे हे मात्र अवघड वाटते... त्यामुळे तेथेच राहणे, दुय्यम नागरिक म्हणून जीवन व्यतीत करणे हेच भागधेय उरते.

**अमेरिकेतील समृद्धीने तो चक्रावून जातो. ''पाण्याचा दुष्काळ नाही, विजेची तक्रार नाही, घराची कटकट नाही. मानवाच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी अतितत्पर असलेला देश...'' तशात नोकरीही चांगली. केलेल्या कामाचा मोबदलाही भरपूर...**

डॉ. सुधा मूर्ती यांनी अमेरिकेत राहणाऱ्या भारतीयांच्या जीवनाचे अनेकविध पैलू 'डॉलर बहू'च्या माध्यमातून पेश केले आहेत.

बंगलोरच्या जयनगर भागात राहणारे संस्कृतचे मास्तर शामण्णा. त्यांची पत्नी गौरम्मा. काटकसरीचा संसार. तीन मुलं. थोरला चंद्रशेखर इंजिनिअर. दुसरा मुलगा गिरीश बँकेत क्लार्क. बेताचा पगार. मुलगी सुरभी... चंद्रशेखर बंगलोरच्या इस्रो या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनीत सॉफ्टवेअर इंजिनिअर. कंपनी त्याला अमेरिकेला एक वर्षासाठी पाठवते. अमेरिकेतील समृद्धीने तो चक्रावून जातो. ''पाण्याचा दुष्काळ नाही, विजेची तक्रार नाही, घराची कटकट नाही. मानवाच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी अतितत्पर असलेला देश...'' तशात नोकरीही चांगली. केलेल्या कामाचा मोबदलाही भरपूर... खाण्यापिण्याची चंगळ... डॉलरची शान... डॉलरला साऱ्या जगात मान.

बाँडप्रमाणे वर्षानंतर चंद्रशेखरला परत भारतात यायचे असते; पण मिनिसोटामधील एक कंपनी त्याला ग्रीनकार्ड मिळवून देण्याची हमी देऊन आपल्याकडे नोकरीला ठेवते. 'स्किपिंग' करून अमेरिकेत स्थिरावण्याचा, बाँडचा भंग करून अमेरिकेत राहण्याचा हा मार्ग चंद्रशेखर निवडतो; आपल्या कंपनीला अंधारात ठेवून चंद्रशेखर

> “राजारामांचा मुलगा- शेखर- अमेरिकेत असतो. हिऱ्याच्या कुड्या, अमेरिकेचं तिकिट, दोन किलो चांदी, पन्नास तोळे सोनं, तीन दिवसांचं चांगलं लग्न... योग्य तो मानपान... हुंडा अजिबात नको... अशा बेताच्या अपेक्षा असणारे हे स्थळ-

मिनिसोटाला पळ काढतो. ‘मिनिसोटा’मध्ये अज्ञातवास पत्करतो. यथावकाश त्याला ग्रीनकार्ड मिळते. तो अमेरिकेचा अधिकृत नागरिक होतो. जीवन सार्थकी लागल्याचा आनंद त्याला होतो. ‘आयुष्यात कधीही लक्ष्मी प्रसन्न न झालेल्या शिक्षकाचा’ तो मुलगा, सारं आयुष्य पैशाच्या चणचणीत गेलेलं. आता तोच अमेरिकेचा अधिकृत नागरिक झालेला... आता राजरोसपणे भारतात येऊ शकत होता. आपल्या माणसांना भेटू शकत होता...

दरम्यान त्याचा भाऊ गिरीश विवाहबद्ध होतो. त्याला पत्नी म्हणून मिळते ती धारवाडची विनिता... खरं तर धारवाडला बँकेत नोकरी करताना चंद्रशेखर तिच्या प्रेमात पडलेला होता– पण ते प्रेम अव्यक्तच राहिलेलं होतं... विनिता आपली वहिनी म्हणून आपल्याच घरात आलेली बघून तो काहीसा उद्विग्न होतो; पण सोडतीन वर्षांनी भारतात तीन आठवड्यांच्या रजेवर आलेल्या चंद्रशेखरच्या लग्नाच्या दृष्टीने हालचाली सुरू होतात. गौरम्माने काही मुली शॉर्टलिस्ट करून ठेवलेल्या असतात. कृष्णाप्पा सावकारांची मुलगी जमुना दिसायला सर्वसाधारण असली तरी तिची श्रीमंती बघून गौरम्मा हरखते. चंद्रशेखर बीएस्सी. पास जमुनाला बघतो. “आमची परिस्थिती... आमचं घराणं श्रीमंत नाही. धाकट्या बहिणीच्या लग्नाची जबाबदारी माझ्यावर आहे...” असे सांगतो. जमुना त्याला विचारते, “तुम्ही तिथंच राहणार की परतणार?” तो तिथंच राहण्याचा विचार आहे असे सांगतो तेव्हा ती खूष होते... लग्न... हनीमून... श्रीमंत जमुनाचे सासू गौरम्माकडून चाललेले कौतुक आणि ‘गरीब’ विनिताची होणारी अवहेलना... दोन सुनांमधील तुलना सासूच्या मनात क्षणोक्षणी होत असते. आणि त्यात विनितेला तुच्छतेची वर्तणूक मिळत असते.

तशातच कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटमध्ये शिकवणाऱ्या सामान्य स्थितीतल्या गोपीच्या प्रेमात सुरभी पडते. गौरम्मा तिला या दरिद्री प्रेमाचा नाद सोडून दे असे सांगते. “अमेरिकेच्या हिशेबाने पाहिले तर शंभर डॉलरसुद्धा न मिळवणाऱ्या नवऱ्याशी संसार करताना तुझे हाल होतील...” अशी भीती घालते. “मला अमेरिकेत नोकरी करणाराच जावई पाहिजे” असे गौरम्मा सांगते. आईच्या स्वभावाची कल्पना असल्याने गिरीश गप्प बसतो. अमेरिकेतले एक स्थळ लग्न जुळवणाऱ्या दलालाकडून सुचवण्यात येते. “राजारामांचा मुलगा– शेखर– अमेरिकेत असतो. हिऱ्याच्या



> तिथं डॉलर मिळवण्यासाठी आम्ही आपली माणसं, घरदार सगळं सोडून कष्ट करीत राहतो... तिथं केवळ भारतीय माणसांबरोबर मिसळतो. तिथल्या समाजाचा अविभाज्य भाग मात्र होऊ शकत नाही... पैशाच्या दलदलीत आणि मोहाच्या जाळयात सापडलोय आम्ही!

कुड्या, अमेरिकेचं तिकिट, दोन किलो चांदी, पन्नास तोळे सोनं, तीन दिवसांचं चांगलं लग्न... योग्य तो मानपान... हुंडा अजिबात नको... अशा बेताच्या अपेक्षा असणारे हे स्थळ– गौरम्माला ठीक वाटते. राजाराम व शेखर सुरभीला बघायला येतात. “ही दरिद्री माणसं माझ्या मुलाला काय देतील– उगाच आमच्या मुलाचा वेळ फुकट घालवला” असे राजारामांना वाटते. आठ वर्षांनी सुरभीपेक्षा मोठा असणारा शेखर– गिरीश शेखरबद्दल माहिती मिळवतो– तो एका अमेरिकन मुलीबरोबर रहात असतो...

त्यामुळे सुरभीचे लग्न बँकेत नोकरी करणाऱ्या सुरेशशी ठरते. हैदराबादमध्ये त्याचे घर असते... चंद्रशेखर लग्नासाठी दोन लाख रुपये पाठवतो... जमुनाच्या सोयीने लग्नाची तारीख ठरते.

लग्नाला चंद्रशेखर आणि जमुना दोघे येतात. त्यावेळी विनिता बाळंतपणासाठी धारवाडला गेलेली असते. लग्नाच्या दिवशीच ती बाळंत होते. लग्नानंतर जमुना माहेरी जाते; सुरभी हैदराबादला जाते. चंद्रशेखर धारवाडला जातो.

अमेरिकन जीवनाची कल्पना देताना चंद्रशेखर सांगतो, “विनिता, तिथं डॉलर मिळवण्यासाठी आम्ही आपली माणसं, घरदार सगळं सोडून कष्ट करीत राहतो... तिथं केवळ भारतीय माणसांबरोबर मिसळतो. तिथल्या समाजाचा अविभाज्य भाग मात्र होऊ शकत नाही... पैशाच्या दलदलीत आणि मोहाच्या जाळयात सापडलोय आम्ही! आमच्या लायकीपेक्षा फार उत्तम नोकरी तिथं मिळते... इथं आलो तरी तशी नोकरी मिळणार नाही. देहालाही तिथल्या सुखासीन जीवनाची सवय झालीय... गाडी नसली तर घराबाहेर पडायला मी तयार नसतो. तिथलं सगळं सोडून मी इथं आलो तर आणखी दुःखी होईन.”

विनिताही मग मोकळेपणाने सांगते, “तुमच्या डॉलरनं आपल्या घराचा सत्यानाश केला. आम्ही काहीही केलं तरी अम्मा त्याची तुलना तुमच्या डॉलरशी करतात... लग्नाची तारीख ठरवतानाही केवळ जमुनेची सोय पाहिली. आपल्याबरोबर चार वर्षे राहणाऱ्या सुनेची आठवणही ठेवली नाही. डॉलर बहूचं महत्त्व अम्माला जास्त वाटतं... आताही माझी खात्री आहे, लग्नघरात अम्मा त्या जमुनेच्या कृपेनं लग्न झालं असंच म्हणाल्या असतील. माझं नावही त्यांनी काढलं नसेल.”

चंद्रशेखरला त्यातले सत्य जाणवते.

पुढे जमुनेच्या बाळंतपणासाठी गौरम्मा अमेरिकेला जाते.

चंद्रशेखरचं पाच बेडरूमचं प्रशस्त घर बघून खूष होते. गालिचे, भारी पडदे, टीव्ही...

केसांचा छोटासा बॉब, लांबलचक गाऊन, रितं कपाळ, रिते हात, सावळा वर्ण– अशी जमुना समोर येते, तेव्हा ती गौरम्माला प्लेझर टाऊनमध्ये मासे विकणाऱ्या सर्वसामान्य बाईसारखी वाटते.

**केसांचा छोटासा बॉब, लांबलचक गाऊन, रितं कपाळ, रिते हात, सावळा वर्ण- अशी जमुना समोर येते, तेव्हा ती गौरम्माला प्लेझर टाऊनमध्ये मासे विकणाऱ्या सर्वसामान्य बाईसारखी वाटते.**

अमेरिकेतील डिपार्टमेंटल स्टोअर्स, त्यामधील मालाची रेलचेल बघून थक्क होते.

जमुना हॉस्पिटलमध्ये दाखल होते. मुलगी होते. तिसऱ्या दिवशी जमुना घरी येते. दहा दिवस सोयराचे– पण जमुना घरभर शिवाशिव करते. गौरम्मा गप्प बसते. बाळाला वेगळ्या खोलीत झोपवणे, टबमध्ये आंघोळ घालणे, हे सारे अमेरिकन स्टाइलमधले वागणे गौरम्माला खटकते.

मुलीच्या बारशाला तीसएक मित्र येतात. नंतर गुढीपाडवा येतो. तो सामूहिक साजरा केला जातो. सण कधीही असला तरी साजरा करायचा वीकएंडला– हे गौरम्माला विचित्र वाटते.

जयाच्या घरी गुढीपाडव्यासाठी सर्व भारतीय जमतात. नवऱ्या मुलीपेक्षाही जमुना नटूनथटून जाते. इतर बायकाही भरपूर अलंकारांनी मढलेल्या. उत्तम साड्या पेहरलेल्या... गौरम्मा त्या ऐश्वर्याने थक्क होतात.

त्या पार्टीत गौरम्माला चित्रा भेटते. ''मी तुमच्या यजमानांची विद्यार्थिनी. शंकरण्णांची मुलगी. लहानपणी तुमच्या घरी खूप वेळ येत असे.'' ही चित्रा... रसरशीत टोमॅटोसारखी दिसणारी... तिच्या लग्नाला शामण्णा गेले होते आणि तिला लवकरच वैधव्य आले हे गौरम्माला आठवते... तर चित्रा म्हणते, ''उद्या माझ्या घरी याल? मी येईन तुम्हाला घ्यायला.''

जीन्स व टी शर्ट घालून दुसऱ्या दिवशी चित्रा येते... कपाळावर कुंकू. गळ्यात मंगळसूत्र. इंडियन स्टोअरमधून ती आंबा, फणसाचे टिन घेते... घरी गेल्यावर आपली हकीकत सांगते. ''सतराव्या वर्षी मामाशी लग्न झाले... मामा दहा वर्षे मोठे... हुंडा, खर्च न करता लग्न झाले... दारूच्या नशेत सायकल चालवताना ट्रकवर आदळून मेला... लग्नाला तेव्हा वर्षही झालेले नव्हते...



वडील माहेरी घेऊन आले. टायपिंग शिकले. नोकरी करू लागले.'' तेथे एका तरुणाचे तिच्याकडे लक्ष जाते. लग्न ठरते; पण ती विधवा आहे हे कळल्यावर ते मोडते. त्याचवेळी ज्या कंपनीत टायपिंगचे काम करते, त्या कंपनीच्या मालकाकडून तिला ऑफर मिळते– ''माझी मुलगी-जावई अमेरिकेत डॉक्टर आहेत. मुलगी सौम्या बाळंत झालीय. जुळ्या मुली आहेत– त्यांची देखभाल करायला कुणीतरी हवंय. तू जाशील का?...'' आणि चित्रा अमेरिकेत येते. मुलींची देखभाल करते... ड्रायव्हिंग शिकते. छोटे-मोठे कोर्सेस करते. बँकेत कामाला लागते. तेथे अमेरिकेत तरुण जोसेफ तिला भेटतो. जोसेफ तिला लग्नाचे विचारतो. ती पूर्वाश्रमीची कहाणी सांगते. जोसेफ तरीही तिच्याशी लग्न करतो. ''तू तुझा धर्म पाळ. मी माझा पाळतो'' असं तो सांगतो. तिच्या घरात गौरम्माला महादेव आणि मेरीची मूर्ती शेजारी शेजारी दिसतात. चित्राचा एकूण संसार चांगला चाललेला आहे; नवरा फिरंगी, गोरा पण तिचा खराखुरा जीवनसांगाती– हे तिला जाणवते. निघताना गौरम्मा तिला हळदकुंकू लावून आशीर्वाद देते, ''दीर्घ सुमंगली भव.'' जोसेफही गौरम्माच्या पाया पडतो...

**जोसेफ तरीही तिच्याशी लग्न करतो. ''तू तुझा धर्म पाळ. मी माझा पाळतो'' असं तो सांगतो. तिच्या घरात गौरम्माला महादेव आणि मेरीची मूर्ती शेजारी शेजारी दिसतात. चित्राचा एकूण संसार चांगला चाललेला आहे; नवरा फिरंगी गोरा पण तिचा खराखुरा जीवनसांगाती-**

याच प्रकारे अमेरिकेत राहणाऱ्या भारतीयांच्या वेगवेगळ्या समस्या गौरम्माच्या लक्षात येतात. चंद्रशेखरचा मित्र वेंकटू यांची मुलगी तेरा वर्षांची... तिला तिच्या मित्रांचे येणारे फोन; अमेरिकन मुलींप्रमाणे डेटिंग करू लागली तर– म्हणून त्याला वाटणारी काळजी...

राधाकृष्ण नावाचे मित्र पत्नीसह सावित्री दोन दिवस चंद्रशेखरकडे पाहुणे म्हणून येतात. सावित्रीच्या मुलीचे– श्यामाचे लग्न भारतातील सुरेंद्रशी होते. तो एम.एस.साठी अमेरिकेत तिच्याबरोबर येतो. पुढे त्याला स्कॉलरशिप मिळते; तो तिच्याशी भांडू लागतो. ''मी तुझ्याकडे ग्रीनकार्ड होते म्हणून लग्न केले–'' ती म्हणते, ''मी नसते तर तू इंडियातच सडत पडला असतास... तुझं घराणंही...'' शेवटी ती डायव्होर्स घेऊन परत आईवडिलांकडे येते. आईला म्हणते, ''भारतातील मुलगा हवा हा तुमचा आग्रह. त्यासाठी तुम्ही माझा बळी दिलात... आता माझ्या आयुष्यात ढवळाढवळ करू नका.'' ती आता कॅलिफोर्नियात ब्राझीलमधील एका मुलाबरोबर राहते. रेस्टॉरंटमध्ये वेट्रेस म्हणून काम करते... दुसरी मुलगी सविता–

**तेव्हा त्या दुकानाची मालक आशा पाटील 'मला कन्नड येते' म्हणून तिला आपली ओळख करून देते. ती कोल्हापूरची असते. तिची आई अक्कलकोटची. त्यामुळे तिला कानडी येते. पस्तिशीतली आशा चुणचुणीत असते. तिची व गौरम्माची दोस्ती होते.**

तिचं भविष्य काय याची चिंता राधाकृष्ण यांना आहे.

चंद्रशेखर एकदा आईला घेऊन शिकागोला जातो.

तेथे राजीव व पद्मा या मैसूरच्या दांपत्याकडे मुक्काम.

पद्माची नणंद तारा. रमेश या मामेभावाशी तिचे लग्न होते. त्याच्याबरोबर अमेरिकेला आल्यावर तिला कळते की रमेशचे लग्न झालेले आहे. त्याची एक गोरी बायको आहे, एक मूल आहे. ती त्याला सोडायला तयार नसते... तारा डायव्होर्स घेते. नोकरी करून पोट भरते. भारतात परत जायची तिची तयारी नाही.

चंद्रशेखर गौरम्माला श्रीकांत या मित्राकडे घेऊन जातो. ''श्रीकांतच्या घरी बायको-मुलं आहेत ना?'' या गौरम्माच्या प्रश्नावर चंद्रशेखर म्हणतो, ''हा प्रश्न आधी इथंच विचारलास हे बरं केलंस... त्याच्या घरी गेल्यावर विचारू नकोस. त्याची बायको रूपा त्याच्याबरोबर रहात नाही. ती डॉक्टर आहे. हुशार आहे. भरपूर कमाई करते. श्रीकांतला ती हिणवत राहिली. तुझ्यासारख्याला मी पगारावर कामाला ठेवेन... तेव्हा त्यांचा डायव्होर्स झाला... रुपानं मग गोऱ्या डॉक्टरशी लग्न केलं... श्रीकांतनं स्वत:ची कंपनी काढली... रुपापेक्षाही जास्त श्रीमंती मिळवली.

श्रीकांतच्या घरी नाथ हा तरुण भेटतो... तो एक इंडियन स्टोअर चालवतो. इंडियन रेस्टॉरंटही चालवतो... त्याची पत्नी मालती मोती-पोवळी विकण्याचा व्यवसाय करते. हा नाथ म्हणजे सुरभी ज्याच्या प्रेमात पडली होती तो गोपीनाथ– हे गौरम्माच्या लक्षात येते. अमेरिकन नवरा हवा म्हणून आपण याला नाकारले– हे आठवून तिचे डोके गरगरू लागते.

पद्माच्या बाळंतपणासाठी गौरम्मा जाते. तिला स्टेशनवर घ्यायला वत्सला येते. ती बिदरची. तिचा नवरा रुदेश हा म्हैसूरचा. अठ्ठावीस वर्षे ती अमेरिकेत रहात असते. वत्सलाचा मुलगा अशोक ड्रग्जच्या आहारी गेलेला... शिवाय मद्यपान... मुलगा हाताबाहेर गेला याचं वत्सलेला दु:ख...

'बॉम्बे ग्रोसरी'मध्ये खरेदीला गेल्यावर गौरम्मा उडदाच्या डाळीला इंग्लिशमध्ये काय म्हणतात असे चंद्रशेखरला विचारते. तेव्हा त्या दुकानची मालक आशा पाटील 'मला कन्नड येते' म्हणून तिला आपली ओळख करून देते. ती कोल्हापूरची असते. तिची आई अक्कलकोटची. त्यामुळे तिला कानडी येते. पस्तिशीतली



आशा चुणचुणीत असते. तिची व गौरम्माची दोस्ती होते. ती आपली कर्मकहाणी सांगते... मुलगा बिझनेस करतो असे तिला सांगण्यात येते. तो बिझनेस म्हणजे चहापावाची हातगाडी असे तिला लग्नानंतर कळते... तिची सासू तिला छळते. ती स्किझोफ्रेनिक होते... माहेरी येते. न्यूयॉर्कला एक गुजराती गृहस्थ किराणा दुकान व हॉटेल काढणार होते. त्यांना कामासाठी एक जोडपे हवे होते. आशाचे वडील आशाला व तिच्या नवऱ्याला पाठवायला तयार होतात. अमेरिकन डॉलरचा मोह आशाच्या सासूलाही पडतो... पुढे हे जोडपे स्वत:चे दुकान काढते. सचोटीने व्यापार करते– त्यांचे स्वत:चे घर होते. मुलगा व नवरा– संसार ठीक चालतो. ती म्हणते, ''मी भारतातच राहिले असते तर वेडी झाले असते... आत्महत्या केली असती किंवा सासूचा जीव घेतला असता... अरुणभाई गुजराथींच्या रूपानं माझ्या आयुष्यात देव आला... मी इथं आल्यावर बाबांचं कर्ज फिटलं. नणंदांची लग्नं झाली.''

**''मी भारतातच राहिले असते तर वेडी झाले असते... आत्महत्या केली असती किंवा सासूचा जीव घेतला असता... अरुणभाई गुजराथींच्या रूपानं माझ्या आयुष्यात देव आला... मी इथं आल्यावर बाबांचं कर्ज फिटलं. नणंदांची लग्नं झाली.''**

गौरम्मा अशा अनेक जणींच्या हकीकती ऐकते. अमेरिकेतील भारतीयांच्या जीवनाबद्दल, समस्यांबद्दल तिला जे कळते त्यामुळे तिचे काही भ्रम दूर होतात. जमुना ही डॉलरबहू– पण तिच्या वर्तनातले काही दोष तिला जाणवतात. गिरीशची पत्नी विनिता हिच्यावर आपण अन्याय केल्याची भावना तिला सतावू लागते. अमेरिका म्हणजे दुरून डोंगर साजरे... गौरम्मा भारतात परत जायचे असे मुलाला सांगते. विनोद शहाची सोबत बघून चंद्रशेखर आईला बंगलोरला पाठवतो...

बंगलोर विमानतळावर शामण्णा तिला घ्यायला येतात. गिरीश-विनिता आले नाहीत म्हणून गौरम्मा जरा खट्टू होते.

घरी आल्यावर तिला कळते की विनिता-गिरीश हे धारवाडला रहायला गेले आहेत. ''तू तुझ्या या सुनेचा सारखा पाणउतारा करायचीस. म्हणून मीच तिला धारवाडला जा म्हटले. तुझ्याबरोबर राहून ती डिप्रेशनमध्ये गेली असती– तुझ्या प्रत्येक पत्रात अमेरिकेचं वैभव, कौतुक असायचं. विनिताबद्दल कधीच काही नसायचं...''

गौरम्मा म्हणते, ''अमेरिकेला जाऊन माझे डोळे उघडले. तिथं गेल्यावर मला कळलं, मी किती भाग्यवान आहे. विनितेसारखी सून मला मिळाली आहे–

> **गौरम्मा म्हणते, ''अमेरिकेला जाऊन माझे डोळे उघडले. तिथं गेल्यावर मला कळलं, मी किती भाग्यवान आहे. विनितेसारखी सून मला मिळाली आहे- मी उगाच डॉलरबहूच्या कौतुकात तिला तुच्छ लेखत होते... चला, आपण धारवाडला जाऊया.**

मी उगाच डॉलरबहूच्या कौतुकात तिला तुच्छ लेखत होते... चला, आपण धारवाडला जाऊया. नातवाला बघू. विनिता-गिरीशला भेटू... वर्ष झालं त्यांना बघून...''

एका परीने ही बोधकथा आहे. अमेरिकेबद्दल आकर्षण, अमेरिकेतील श्रीमंतीची भूल– यामुळे अनेक तरुण तिकडे जातात... तेथील जीवनात वेगळ्याच समस्या उद्‌भवतात. तेथील वेगळी जीवनप्रणाली... तिच्यामुळे आचारविचार बदलतात... तेथील वास्तव वेगळेच असते. आपली मूल्ये वा निकष गृहीत धरून अमेरिकेतील भारतीयांना दोष देण्यात अर्थ नाही. तेथील जीवनाशी त्यांना मिळवून घ्यावे लागते... अमेरिकेतील श्रीमंतीमुळे डॉलरबहूचे कौतुक करताना आपल्या इतर सुनांची वा नातवंडांची अवहेलना करणे हा करंटेपणा आहे.

अमेरिकेच्या भ्रमजालातून बाहेर काढण्याचा 'डॉलर बहू'च्या या कहाणीद्वारे सुधा मूर्ती यांनी प्रयत्न केला आहे. गौरम्माच्या निरीक्षणातून आणि तिला भेटणाऱ्या भारतीयांच्या जीवनकहाण्यांमधून तेथील समस्या, त्यातील न पटणाऱ्या गोष्टींशी करावी लागणारी तडजोड– हे सर्व तिला जाणवते. आपल्या डॉलरबहूच्या वागण्यातील हिशेबीपणा तिला कळून येतो... आणि आपल्या घराची ओढ तिला लागते...

सुधा मूर्ती यांची निवेदनशैली वेगवान असते... एकापुढे एक प्रसंग चित्रपटातील सीनप्रमाणे त्या ठेवत जातात... त्यातून वेगवेगळ्या कहाण्यांची मालिका नजरेपुढून तरळत जाते... काहीशा सनातनी, कर्मठ अशा गौरम्माच्या नजरेतून अमेरिकेतील जीवनैशलीतील समस्यांचे आणि आधुनिकपणाचे दर्शन घडल्याने, त्यातील ताण अधिक तीव्र होतो... या जीवनशैलीशी आपली नाळ सहजी जुळू शकणार नाही; नाइलाजाने ती जुळवून घ्यावी लागेल आणि त्याची खंत कायम मनाला टोचत राहील असाच संदेश जणू त्या देत आहेत.

**पृष्ठे: १६० ● किंमत: १२० रु. ● सभासदांना: ९० रु. ● पोस्टेज: २५रु.**






# व. पु. काळे यांची पुस्तके

| **कथा** | मूल्य |
|---|---|
| वपु ८५ | ६० |
| संवादिनी | ७० |
| मोडेन पण वाकणार नाही | ८० |
| वलय | १०० |
| स्वर | १०० |
| इन्टिमेट | १०० |
| बाई बायको कॅलेंडर | १०० |
| वपुर्वाई | १०० |
| वन फॉर द रोड | १०० |
| मी माणूस शोधतोय | १०० |
| हुंकार | १०० |
| गोष्ट हातातली होती! | १०० |
| गुलमोहर | १०० |
| कर्मचारी | ११० |
| का रे भुललासी | १२० |
| ऐक सखे | १२० |
| काही खरं काही खोटं | १२० |
| तप्तपदी | १२० |
| सखी | १२० |
| दोस्त | १२० |
| महोत्सव | १३० |
| घर हरवलेली माणसं | १४० |
| भुलभुलैय्या | १२० |
| रंग मनाचे | १८० |

| **वैचारिक** | |
|---|---|
| आपण सारे अर्जुन | १०० |
| **कादंबरी** | |
| ठिकरी | ५० |
| तू भ्रमत आहासी वाया | ७० |
| ही वाट एकटीची | १२० |
| **(राज्य पुरस्कार १९७०-७१)** | |
| पार्टनर | १२० |
| **ललित** | |
| दुनिया तुला विसरेल | ५० |
| पाणपोई | ५० |
| निमित्त | ८० |
| फॅण्टसी एक प्रेयसी | ९० |
| प्रेममयी | १०० |
| माझं माझ्यापाशी? | १०० |
| कथा कथनाची कथा | १२० |
| प्लेझर बॉक्स भाग-१ | १६० |
| प्लेझर बॉक्स भाग-२ | २०० |
| वपुर्झा | १८० |
| रंगपंचमी | २०० |
| **व्यक्तिचित्र** | |
| सांगे वडिलांची कीर्ती | ७० |
| चिअर्स | १०० |
| माणसं | १४० |

**पोस्टेज खर्च वेगळा**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



# आनंद भेट

## रशियन कथांचा आनंददायक नजराणा

**डॉ. सुनीती देशपांडे**

डॉ. सुनीती अशोक देशपांडे या मुंबईच्या 'कल्चरल सेंटर ऑफ रशिया' या संस्थेत रशियन भाषेच्या अध्यापिका आहेत. मॉस्कोमध्ये पाच वर्षे राहून त्यांनी रशियन भाषेतील पीएच.डी. मिळवली आहे. रशियन भाषा आणि इंग्रजी भाषा या दोहोंतील त्या एम.ए. आहेत. मूळ रशियन भाषेतून अनुवाद केलेल्या कथांचे तीन संग्रह 'अंतरपर्व', 'कथांतर' आणि 'फुलांचे बोल' हे मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित झाले होते. 'आनंदभेट' हा १७ कथांचा संग्रह नुकताच बाजारात आला आहे.

या संग्रहालाही रशियन सांस्कृतिक केंद्राचे व्हाइस कौन्सल व डायरेक्टर एम. ए. नझार किन यांचा शुभसंदेश लाभलेला आहे. हे पुस्तक डॉ. सुनीती देशपांडे यांनी आपल्या कोल्हापूर, सांगली आणि मुंबई येथील शिष्यांना 'शिष्यदक्षिणा' म्हणून अर्पण केलेले आहे.

१९७९ पासून अध्यापन क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या डॉ. सुनीती देशपांडे यांना आपला प्रत्येक विद्यार्थी म्हणजे आपल्याला मिळालेली आनंदभेट असे वाटत आले आहे. आरंभी इंग्रजी भाषा व साहित्य शिकवणाऱ्या डॉ. सुनीती पुढे रशियन भाषेच्या अभ्यासानंतर रशियन भाषेचे अध्यापन करू लागल्या. उल्हास कुलकर्णी, विकास गोगटे, अमोल गाडेकर, किरीट खुराना, रेक्स उथुप, हेमंत पोवळे, झुबिन दविएरवाला, राजेश मेस्त्री, तजुना कोपरकर (रानडे), शांता शेणॉय, सुनीता बोस, विजय कांबळे, बारक आगा, मंगल गोगटे, सय्यद अल बाकर, सूरज इनामदार, अमृता जोशी, नीलाक्षी सावंत (कदम), लक्ष्मी अय्यंगार, भरत भगत, राजेश भाटिया, शिरीष वैद्य, सुमीत मेहता, संदीप हेगडे, ज्योती कथोक वगैरे विद्यार्थ्यांचे स्मरण त्यांनी या पुस्तकाच्या आरंभ केले असून, या शिष्यसंपदेच्या



तेजापुढे साक्षात् कुबेराचे धनही फिके पडावे असे त्यांना वाटते.

प्रख्यात साहित्यकार शं. ना. नवरे यांनी सुनीती देशपांडे यांच्या या भावानुवादाचे वैशिष्ट्य सांगताना त्यांचे रशियातील वास्तव्य (त्यायोगे जाणून घेतलेले तेथील वातावरण, लोकसंस्कृती, रीतीरिवाज, जीवन, निसर्गविभ्रम) आणि आपल्या जन्मभूमीशी, आपल्या मातृभाषेशी घट्ट जोडलेला आपला पिंड या दोहोंच्या उचित संगमाचा निर्देश केला आहे. 'दोन्ही भाषा जेव्हा आपल्याच वाटू लागतात तेव्हा कथांची निवडही स्वाभाविकपणेच स्वदेशाच्या मातीशी मिळतीजुळती होते–' असेही ते म्हणतात.

**देश भिन्न असले तरी मानवी भावना सर्वत्र सारख्याच असतात; त्यामुळे या कथा वाचताना नावे-स्थळे रशियन असली तरी मानवी मन व स्वभाव हा आपला परकेपणा जाणवू देत नाही.**

या संग्रहातील बहुतेक कथांमध्ये मध्यमवर्गीय घरगुती वातावरण आहे; काही कथांमध्ये बालकुमार नायक आहेत; काही कथांमध्ये प्रेमाच्या विविध छटा रंगवलेल्या आहेत. 'कागदी बाहुली' या कथेत अद्भुत वातावरण आहे. देश भिन्न असले तरी मानवी भावना सर्वत्र सारख्याच असतात; त्यामुळे या कथा वाचताना नावे-स्थळे रशियन असली तरी मानवी मन व स्वभाव हा आपला परकेपणा जाणवू देत नाही. तरल मानसिक आंदोलने, भावनात्मक जवळीक वा दुरावा, परदु:खाबद्दलची सहानुकंपा यातून माणसे एकमेकाशी जोडली जातात– मग ती नात्यातील असोत वा अल्पकाळ अवचित भेटून चटका लावून गेलेली असोत. कथानकाच्या गुंतागुंतीपेक्षा भावनात्मक आंदोलनांचा खेळ दाखवण्यात या कथा अधिक भर देतात.

## पतीचं वाण

'पतीचं वाण' ही कथा प्रेमाची ओढ, निष्ठा प्रकट करते. फाझिल इस्कान्देर हा तिचा लेखक. आयेषा. टपोरे डोळे. काळाभोर केशसंभार. नात्यानं मावशी. चेहरा फारसा आकर्षक नसूनही सुंदर डोळ्यांमुळं पुरुषांना आकर्षून घेणारी... कुटुंबातील सर्वांची आवडती. दहा भावंडांनी गजबजलेलं घर. तेइमरास हा नात्यातला तरुण एकदा त्या घरी येतो. आजारी पडतो. तेव्हा आयेषा त्याची शुश्रुषा करते. त्यामुळे त्याचे तिच्यावर मन जडते. त्यांचे लग्न होते. प्रेमळ आणि आज्ञाधारक सून म्हणून आयेषा सासरी सर्वांची लाडकी होते. शेजारची एक वृद्ध स्त्री कोल्ह्याने चावा घेतल्याने आजारी पडते. आयेषा तिचीही शुश्रुषा करते. ती वृद्ध स्त्री मरण पावते तेव्हा एक मांत्रिक एक काढा करून तिला प्यायला देतो.

**प्रेमाचं वाण केवळ पत्नीचंच असतं हा समज तेइमरास खोटा ठरवतो. पतीचंही वाण असतं. ते तेइमरासनं निभावून नेलं. वृक्ष सावलीच्या शोधात निघाला. सावलीविना वृक्ष कसा राहील? आत्म्याविना देह कसा राहील?**

त्या वृद्ध स्त्रीच्या सेवेत असणाऱ्या सर्वांनी तो काढा प्यायला हवा असा त्या मांत्रिकाचा आग्रह असतो. आयेषा गरोदर असते. ती नकार देते. पण तिला सक्तीने तो काढा घ्यायला लावतात. त्यानंतर ती आजारी पडते. वैद्य सांगतो– तिच्या रक्तात विष भिनत चालले आहे. ती बाळंत होते. अर्भक मृतावस्थेतच जन्मते. आणि आयेषाही मरण पावते. तेइमरास आयेषाच्या अंत्यविधीनंतर अस्वस्थ होतो. आपल्या घोडीवरून आयेषाच्या माहेरी येतो. आपल्या पुरुषी शौर्याचे प्रदर्शन करतो. नंतर आयेषाच्या कबरीजवळ जातो. दगडगोटे रचून त्यांचा ढीग लावतो. घरी येऊन आईला म्हणतो, ''मी प्रवासाला निघणार आहे. लवकर परत न आलो तर घोडी विकून टाका. आम्हा दोघांचे श्राद्ध एकदमच करा.'' तेइमरास स्वयंपाकघरात जातो. त्याच्या सदऱ्याने पेट घेतल्याने पळत बाहेर येतो. आग विझवू पाहतो. अक्रोडाच्या झाडाखाली तो कोसळतो. कायमचाच! निवेदक म्हणतो, ''मी आयेषाला बघितलं नव्हतं. या वेड्या प्रेमवीरालाही बघितलं नव्हतं. पण त्यांचं नातं अलौकिक, अतूट होतं. त्यांच्या निष्ठेला, प्रेमाला तोड नाही. प्रेमाचं वाण केवळ पत्नीचंच असतं हा समज तेइमरास खोटा ठरवतो. पतीचंही वाण असतं. ते तेइमरासनं निभावून नेलं. वृक्ष सावलीच्या शोधात निघाला. सावलीविना वृक्ष कसा राहील? आत्म्याविना देह कसा राहील? सोबतीविना प्रवास कसा होईल?...

चिंगीझ ऐतमातव याची 'सुख स्वर्गीचे आले' ही कथाही प्रेमाचाच आविष्कार करते. निवेदक तरुण गाडीवान असतो. आपली गाडी घेऊन पॅसेंजर वाहून नेतो. एकदा गाडीखाली पडून तो काही दुरुस्ती करीत असतो; तेव्हा एक स्त्री दिसते. ती कोणी वृद्ध स्त्री असावी असे समजून तो म्हणतो, ''आजीबाई, गाडी दुरुस्त व्हायला वेळ लागेल. तुम्ही थांबवू नका.'' उत्तर येते, ''मी काही आजीबाई नाही. मुलगी आहे.'' तो गाडीवान गाडीखालूनच म्हणतो, ''अस्सं का? सुंदर आहेस का?'' तो गाडीखालून बाहेर येतो. ''खरंच सुंदर आहेस'' म्हणतो. तिला तिच्या घराकडे तो पोचवतो. घराच्या दाराशीच त्या मुलीची आई भेटते. ''वेळेवर आलीस. तुला बघायला मंडळी आली आहेत. कपडे बदलून ये.''

गाडीवानाला ती तरुणी नंतर भेटत नाही. तो एकदा तिची चौकशी करायला



**''पपा, तुम्ही आहात, ममी आहे. मीही आहे. हे छोटंसं घर आपलं आहे. किती मज्जा आहे, नाही? आपण एकमेकांचे आहोत. एकमेकांचे राहणार. एकमेकांशिवाय जगण्यात काय गंमत असणार?...''**

तिच्या ऑफिसात जाऊन येतो... तिचं लग्न झालं असावं असा त्याचा ग्रह होतो; पण नंतर ती भेटते. ''लग्न लवकरच होणार आहे'' असं म्हणते. ''तुझ्याकडं दुरून पाहिलं तर चालेल ना?'' तो तिला विचारत राहतो. त्याची बदली होते. तिचं लग्न शुक्रवारी होणार असतं; तर ती आधी बुधवारीच त्याला भेटते. त्याला म्हणते, ''मला वाटलं, तू माझी वाट बघत आहेस.'' तो तिला गाडीत बसायला सांगतो. ''चल कुठंतरी फिरून येऊ.'' ती आढेवेढे न घेता तयार होते. तो तिला घेऊन गाडी जोराने पळवतो. ''नव्या कामाच्या जागी जाऊ...'' वाटेत तो थांबून तिच्यासाठी कपडे घेतो. शाल घेतो. नव्या कामाच्या ठिकाणी एका मित्राच्या कुटुंबात तिची व्यवस्था करतो... सारेजण नववधूचं पारंपरिक रीतीनं स्वागत करतात. ते ती गाडी सजवतात. फुलं, फिती, रंगीबेरंगी गोंडे... स्वर्गसुख दाराशी आलंय असं त्या दोघांना वाटतं.

## तिची माझी फुलबाग

'तिची माझी फुलबाग' ही कथा अरका दि गैदर या लेखकाची आहे.

तिशीतले एक जोडपे. त्याला सहा वर्षांची मुलगी स्वेतलाना. स्वेतलानाचे वडिलांवर खूप प्रेम. आई मरुस्यापेक्षा तिला बापाचाच जास्त लळा. मरुस्या थोडी कडक. लहानसहान गोष्टीवरून नवऱ्याला, मुलीला फैलावर घेणारी... तेव्हा हे बाप-लेक एक दिवस मरुस्याला न सांगता दूर जायचं ठरवतात. दिवसभर भटकत राहतात. गावच्या दुसऱ्या टोकाला जातात. स्वेतलाना बापाला विचारते, ''तुम्हाला मम्मी कुठं भेटली ते सांगा...'' ''त्यावेळी मरुस्या सतरा वर्षांची होती. एका दंगलीत ती रस्त्यावर घाबरून उभी होती. गस्तीचा शिपाई... तिची चौकशी केली... ती मला बिलगली... आजतागायत ती माझ्याबरोबर आहे...'' स्वेतलाना म्हणते, ''सकाळी आपण घरातून निघालो– ते तिच्या बोलण्यानं रागावून... पण तिचं आपल्यावर प्रेम आहे. तिच्याविना घर– तिच्याविना आपण– तिच्याविना जगणं... कसं शक्य आहे?...'' ते घरी येतात. मरुस्या बागेत उभी असते. स्वेता तिच्याकडे झेपावते. ''पपा, तुम्ही आहात, ममी आहे. मीही आहे. हे छोटंसं घर आपलं आहे. किती मज्जा आहे, नाही? आपण एकमेकांचे आहोत. एकमेकांचे राहणार. एकमेकांशिवाय जगण्यात काय गंमत असणार?...''

सुटीतील सर्वात आवडता दिवस या विषयावरचा गृहपाठ बाई देतात... आपले आईवडील भांडतात; वाद घालतात; घटस्फोट घ्यायचा म्हणतात हे मुलाला कळत असते... तो या दोघांना जवळ आणण्यासाठी, त्यांच्यात समेट घडवून आणण्यासाठी काहीतरी करायला हवे असे ठरवतो...

मरुस्याच्या नजरेत शांत चंद्रकिरणांचा आढळ होतो... आपलं हे घरकुल. स्वेताच्या रूपानं त्यात फुललेली फुलबाग... हे सारं आपलंच भाग्य नव्हे का? असा विचार त्या 'बापाच्या' मनात येत राहतो...

आपले वडील वारलेले आहेत, म्हणजे काय झालेले आहे हे न कळणाऱ्या वयातला मुलगा वोवा; तो शेजारी नव्यानेच राहण्यास आलेल्या सिरगेइ इवानिच प्रिस्निकोव या वैमानिकालाच आपले वडील मानू लागतो... त्यांच्याजवळ बराच वेळ घालवू लागतो. एकदा वोवा आजारी पडतो. ''माझ्या वडलांना बोलव'' असे आईला सांगतो. आई शेजारच्या त्या गृहस्थांना सांगते, ''मुलगा तापानं फणफणलाय. तुम्हाला बोलवा असा हट्ट करतोय... याल का तुम्ही?'' वैमानिक येतो... वोवा त्यांचा हात घट्ट पकडून ठेवतो... तो बरा होतो... विमान कोसळून हे वैमानिक वडील त्यात मृत्यू पावतात... वोवा रडत राहतो... वोवा त्यांचा फोटो आपल्या टेबलावर लावतो. आपले आडनाव तो प्रिस्निकोव असे लावतो... अशी ही मानलेल्या नात्याची अनोखी कहाणी! युद्धकालीन वातावरणाच्या पार्श्वभूमीची!

## सुटीतील सर्वात आनंदाचा दिवस

सुटीतील सर्वात आवडता दिवस या विषयावरचा गृहपाठ बाई देतात... आपले आईवडील भांडतात; वाद घालतात; घटस्फोट घ्यायचा म्हणतात हे मुलाला कळत असते... तो या दोघांना जवळ आणण्यासाठी, त्यांच्यात समेट घडवून आणण्यासाठी काहीतरी करायला हवे असे ठरवतो... पण काय करावे हे त्याला कळत नाही! आईवडील कामाला गेलेले असताना तो घर स्वच्छ करतो... लवकर उठून चहा करतो... व्यायाम करतो. बाबा शाबासकी देतात... पण आई-वडील यांच्यात संवादच नसतो. शेवटी तो ठरवतो, ''आपण घरातून पळून जायचे... बेपत्ता व्हायचे...'' तो संध्याकाळी आईला म्हणतो, ''मी झेन्याकडे जातोय. अर्ध्या तासात परत येईन.'' तो झेन्याकडे जातो. त्याला सांगतो, ''माझ्या घरी दर पाच मिनिटांनी फोन करीत रहा. अजून मी का आलो नाही असे विचारत रहा... त्यांचं डोकं चिंतेनं ताळ्यावर येईपर्यंत हे नाटक करायचे आहे...''

पाचव्या फोननंतर आई-बाबांचा फोन झेन्याला येऊ लागतो, ''अजून नाही आला?... काय झालं असावं?... आम्ही फार काळजीत आहोत...''

असे पाचदहादा होते. मग तो मुलगा घरी जातो... आई त्याला उचलून घेते. स्फुंदू लागते. बाबा तिची समजूत काढू लागतात... तो मुलगा निबंध लिहू लागतो... 'सुटीतील सर्वात आवडता दिवस–'

## अस्सल कलावंत

लीदानची शिल्पाकृती पाहून थक्क होतो... ''या मूर्तीत जागता श्वास आहे आणि स्वतःचं खास अस्तित्वही... याला म्हणायचं खरी कला.'' आणि तो स्वतःच्या मूर्तीवर जवळच्या हातोडीने तीन प्रहार करतो...

विद्यापीठाच्या नवीन इमारतीच्या प्रवेशद्वाराशी ब्रान्झ पुतळा करण्याची स्पर्धा लागते. गोनिसोन हा शिल्पकार त्या स्पर्धेत भाग घेतो. आपल्या पुतळ्याला बक्षीस मिळेल, आपले दैन्य दूर होईल अशी त्याला आशा वाटते. एक प्राध्यापक त्याला भेटले. म्हणाले, ''तुमचा पुतळा बघितला. फार चांगला वाटला.'' पण त्या प्राध्यापकाच्या बोलण्यात लीदान या शिल्पकाराच्या पुतळ्याचा काहीच उल्लेख येत नाही... लीदान हा अहंमन्य असतो. काही लोकांना तो आवडत नाही. बक्षीस आपल्याला मिळाल्यावर काय काय आणायचे याचे मनोरथ त्याची पत्नी करू लागते... परंतु गेनिसोनला वाटते– हा पुरस्कार लीदानलाच मिळायला हवा... तो आपल्यापेक्षा श्रेष्ठ कलाकार आहे. गेनिसोन ते पुतळे ठेवलेल्या दालनात प्रवेश मिळवतो. लीदानची शिल्पाकृती पाहून थक्क होतो... ''या मूर्तीत जागता श्वास आहे आणि स्वत:चं खास अस्तित्वही... याला म्हणायचं खरी कला.'' आणि तो स्वत:च्या मूर्तीवर जवळच्या हातोडीने तीन प्रहार करतो... ''हे आघात मी मूर्तीवर नव्हे तर स्वत:वरच केलेले आहेत. लीदानला विजयाविषयी आता कसलीच शंका नको... खऱ्या कलेलाच दाद मिळावी म्हणून मी प्रतिस्पर्धी नष्ट केला आहे.'' असे तो स्वत:शीच म्हणतो.

एकेक सच्चा कलावंत स्वत:च्या स्वार्थबुद्धीपलीकडे, मानसन्मानाच्या हव्यासापलीकडे जाऊन खऱ्या कलेची बूज राखू शकतो– हे दाखवणारी ही कथा. या कलावंताच्या मोठेपणालाही दाद द्यायला हवी. स्वत:ची मूर्ती नष्ट न करताही परीक्षकांनी लादीनची मूर्ती निवडलीच असती असा विश्वास त्या कलावंताला का वाटू नये असा प्रश्न पडू शकेल. कदाचित कम्युनिस्ट राजवटीच्या, सामाजिक वास्तववादाच्या काळात काही वेगळेच निकष पुरस्कारासाठी वापरले जात असतील असे मानायलाही हरकत नाही.

या संग्रहाला ज्या कथेचे नाव देण्यात आले आहे ती 'आनंदभेट' ही कथा

> **"तुम्हाला नाही घर..
> नाही निवारा...
> कशासाठी लग्न करताय?
> असे क्षुल्लक शारीरिक
> मोह टाळायला हवेत..."
> पण त्याला मदत करणारे
> लोकही भेटतात. शेत-
> घर-सुखसोयी सर्व
> मिळतात... लग्नही होते.
> पाद्री महाशय येतात.
> आशीर्वाद देतात...**

बालमनाची मानसिकता प्रकट करणारी आहे.

## आनंदभेट

कमारव हे या कथेतील चार वर्षाच्या मुलाचे नाव. बालवाडीत शिकणारा. द्वाड गणला जाणारा मुलगा. त्याला सांभाळणं शिक्षिकेला जड जातं– अशी तक्रार असते. अंगात कपडे न घालता पनामा टोपी घालून तो वावरत असतो. रांगेची शिस्त तो पाळत नाही. तो चालताना सारखा पडतो. आणि त्याचं कारण– चड्डीच्या एकाच 'पायात' त्याने दोन्ही पाय घातलेले असतात. त्यामुळं चालताना गंमत येईल असं त्याला वाटतं.

शिक्षक म्हणजे शिस्त, शिस्त म्हणजे भीती ही समीकरणं शाळेत प्रचलित असतात. पण कमारव स्वातंत्र्याचा आनंद लुटणारा असतो. तो फिरायला बाहेर पडतो तेव्हा पाईन वृक्षाखाली त्याला एक शंकूच्या आकाराची डहाळी मिळते. ते खाजकुईलीचं रोप असतं. त्याचे काटे टोचून त्याच्या बोटांतून रक्त येऊ लागते... जवळच एक वासरू चरत असते... अरे, मला तुझ्याशी दोस्ती करायचीय म्हणत तो त्या वासराच्या पाठीवर हात फिरवतो. तर वासरू पळत सुटते. कमारव त्याच्या मागे धावतो. त्याला गाठतो. त्याला गोंजारतो. पुढं त्याला हिरवागार रस्ता– विस्तीर्ण पठार दिसतं. त्यांचं गाणं ऐकू येतं. नंतर दिसतो बेडूक... आणि बालवाडीतील इतर मुलंही दिसतात. संतापानं त्याच्याकडे बघणाऱ्या करड्या शिक्षिकेला कमारव शंकूच्या आकाराची ती बीजे, खाजकुइलीची फांदी, उलटा धरलेला बेडूक– हे सर्व देऊन म्हणतो, "बाई, हे तुमच्यासाठी."

त्या वस्तू देताना कमारवचा चेहरा प्रसन्न असतो. आपल्या आनंदभेटीचं वैभव सर्वांनी बघावं, त्याचं कौतुक करावं असा त्याचा भाव असतो.

मॅक्झिम गॉर्कीची एक कथाही या संग्रहात आहे.

एका लहानशा स्टेशनवर एक वयस्क गृहस्थ डब्यात शिरतो. त्याला इतर प्रवासी जागा देतात. नातवाच्या लग्नासाठी चाललोय... तीन स्टेशनं तर जायचंय असे तो सांगतो. तो आपली जीवनकथा सांगतो... लहानपणी शेतात खणताना एक दगड उडून त्याचा डोळा निकामी होतो... एकोणिसाव्या वर्षी ईदा नावाच्या मुलीवर प्रेम बसते. लग्नासाठी चर्चमध्ये जातात तर पाद्री म्हणतो, "तुम्हाला



नाही घर... नाही निवारा... कशासाठी लग्न करताय? असे क्षुल्लक शारीरिक मोह टाळायला हवेत..." पण त्याला मदत करणारे लोकही भेटतात. शेत-घर-सुखसोयी सर्व मिळतात... लग्नही होते. पाद्री महाशय येतात. आशीर्वाद देतात... "आणि आज नातवाच्या लग्नाचा योग आलेला असतो. आपल्याला भली माणसं भेटली; आपल्या नातवालाही अशी भली माणसं भेटतील..." अशी आशा तो प्रकट करतो.

> **जीवनावर प्रेम करा;
> निसर्गाचा आनंद घ्या,
> माणसामाणसाच्या नात्यांना
> जपा, इतरांसाठी काहीतरी
> सकारात्मक करा;
> भलेपणाने रहा असा संदेश
> देणाऱ्या या कथा. भाषा
> थोडी वेगळी असली,
> वातावरण भिन्न असले तरी
> माणसाच्या मनाचा व्यापार
> सर्वत्र सारखाच असतो**

## भाग्यवान प्रियकर कोण?

'भाग्यवान' ही बरीस लास्वीनची गोष्टही मजेशीर आहे.

'इलेना या तरुणीवर प्रेम करणारे तीन तरुण असतात. ते तिथे सैनिकी प्रशिक्षणासाठी जातात. ते संपल्यावर इलेना त्यांना घरी बोलावते. ती म्हणते, "तुमच्यासाठी आज मी केक तयार केला आहे."

निकोलाय, व्हिक्टर आणि निवेदक तिघे टेबलाशी बसतात. निवेदक म्हणतो, 'इलेना, आम्हा सर्वांनाच तू फार आवडतेस."

"आणि मलाही तुम्ही... सारेच."

"ते काही नाही." निवेदक तिला सांगतो, "तू असं कर... त्या केकमध्ये एक नाणं लपवून ठेव. ज्याच्या वाट्याला ते येईल तो सर्वात भाग्यवान... तोच तुझा जोडीदार होईल."

इलेना तो केक घेऊन आत जाते... नंतर बाहेर घेऊन येते. तीन भाग करते. तिघेही एकेक भाग उचलतात.

प्रत्येकालाच उत्सुकता असते. कोण तो भाग्यवान आहे?

व्हिक्टर उभा राहून तोंडातून नाणे काढून दाखवतो.

निकोलाय व निवेदक एकमेकांकडे बघत राहतात. "हा लग्नाचाच केक म्हणायचा तर!" व्हिक्टर कुर्न्यात हो म्हणतो.

सहा महिन्यांनी लग्न होते. निकोलाय व निवेदक येतात. शुभेच्छा देतात. व्हिक्टर विचारतो, "अरे, भेटवस्तू आणलीच नाही का?"

निकोलाय म्हणतो, "ते भेटीचं नंतर बघू. तूर्त हे घे..." तो खिशातून एक नाणे काढून व्हिक्टरला देतो... निवेदकही आपल्याकडचे एक नाणे देतो.

व्हिक्टर चक्रावून जातो, "हे काय? याचा अर्थ काय?"

इलेना म्हणते, ''त्या दिवशी केकमध्ये मी तीन नाणी ठेवली होती.''

''मी माझं नाणं अर्धा तास तोंडात धरून बसलो होतो.'' निकोलाय.

''मी तर गिळायच्याच बेतात होतो.'' निवेदक.

व्हिक्टरचा चेहरा बघण्यासारखा होतो. ''मित्रांनो, हे मात्र...''

अशी ही कथा अनपेक्षित शेवटामुळे ओ. हेन्रीच्या वळणावर जाते.

जीवनावर प्रेम करा; निसर्गाचा आनंद घ्या, माणसामाणसाच्या नात्यांना जपा, इतरांसाठी काहीतरी सकारात्मक करा; भलेपणाने रहा असा संदेश देणाऱ्या या कथा. भाषा थोडी वेगळी असली, वातावरण भिन्न असले तरी माणसाच्या मनाचा व्यापार सर्वत्र सारखाच असतो हे दाखवून देणाऱ्या या कथा. खरोखरच आनंददायक भेटीसारख्या.

**पृष्ठे: १३४ ● किंमत: १२० रु. ● सभासदांना: ९० रु. ● पोस्टेज:२०रु.**

## आरोग्य / माहितीपर

| | | |
|---|---|---|
| हृदयविकार निवारण | शुभदा गोगटे | २०० |
| चाळिशीनंतरची वाटचाल | डॉ.सुभाष दांडेकर | १२० |
| सुखद मातृत्व | डॉ.रत्नावली दातार | ७० |
| २० मिनिटे तंदुरुस्तीसाठी : शेली बात्रा | अनु.गंगाधर महाम्बरे | १३० |
| डॉक्टरांकडे जाण्यापूर्वी | डॉ. विकास / विनिता गोगटे | २५० |
| बाल परिचर्या | सुधा पाटील | २०० |
| मधुमेह : एक आव्हान | डॉ.अरुणा/अशोक जैन | १२० |
| पाणी :एक अद्‌भुत उपचारपद्धती | अनु.सुभाष जोशी | ७० |
| भारतवैद्यक | डॉ. शाम अष्टेकर | ६०० |
| एकच पेला शिवाम्बूचा | डॉ. शशि पाटील | ९० |
| कर्करोग असाध्य नाही : ए.एन.भिसे | अनु. राम दातार | ५० |
| आपले सौंदर्य आणि त्याची निगा | अनु.मीना टाकळकर | १०० |
| रेकी | शुभदा दामले | ६० |
| आरोग्यासाठी योग | अनु.मंगेश कश्यप | ८० |
| तणावमुक्तीसाठी योगसाधना | अनु. डॉ. सुभाष दांडेकर | ५० |
| वजन कमी करण्यासाठी योगसाधना | अनु. डॉ. सुभाष दांडेकर | ५० |
| कार्यमग्न, व्यस्त लोकांसाठी योगसाधना | अनु. अरुंधती महाम्बरे | ५० |

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पोस्टेज खर्च वेगळा



## व्यक्तिमत्त्व विकसन

| | | |
|---|---|---|
| आपण : **आपले ताणतणाव -** एक चिंतन | अंजनी नरवणे | १०० |
| निरामय यशासाठी ध्यान | शुभदा गोगटे | ७० |
| मनावर विजय **: एकनाथ ईश्वरन्** | अनु. वैशाली जोशी | १२५ |
| चिंतामुक्त जीवन | आर. डी. मुनोत | १६० |
| यशाचा कानमंत्र **: अनंत पै** | अनु. चारुलता पाटील | ५० |
| आत्मविश्वासाचा कानमंत्र **: अनंत पै** | अनु. चारुलता पाटील | ४० |
| उत्तम स्मृतीचा कानमंत्र **: अनंत पै** | अनु. चारुलता पाटील | ५० |
| आपल्या मुलांच्या यशस्वितेचा कानमंत्र **: अनंत पै** | अनु.प्रशांत तळणीकर | ८० |
| पाल्य व्यक्तिमत्त्वाचा कानमंत्र | संजीव परळीकर | ७० |
| पुढाकार घ्या प्रभावी व्यक्तिमत्वाचे सूत्र | संजीव परळीकर | २०० |
| मुलांच्या समृद्ध जीवनासाठी | डॉ.सुचित तांबोळी | १५० |
| मुलांवरचे संस्कार **(राज्य पुरस्कार)** | शं. व्यं. काश्यपे | ९० |
| असे बना अन् बनवा विद्यार्थी | शं. व्यं. काश्यपे | १०० |
| तुम्ही आणि तुमची मुलं | रुपां. अविनाश भोमे | ८० |
| सुजाण पालकत्व | मीना टाकळकर | ६० |
| प्रियाराधन आणि विवाह : डॉ. विजय नागस्वामी | अनु.भारती पांडे | १५० |
| चला उठा कामाला लागा! : स्वाती शैलेश लोढा | अनु. अंजनी नरवणे | १२० |
| द मॅजिक ऑफ थिंकिंग बिग : डेव्हिड श्वार्ट्झ | अनु. प्रशांत तळणीकर | २०० |
| शांततेनं काम करा! : पॉल विल्सन | अनु. सुनंदा अमरापूरकर | २४० |

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पोस्टेज खर्च वेगळा




# खट्याळ खलाशी

## खेळण्यांच्या जगाला जेव्हा चैतन्य लाभते-

**निर्मला मोने**

निर्मला मोने यांनी बालवाचकांसाठी लिहिलेल्या कथांचे संग्रह अस्वलाची शेपटी, घड्याळातली कोकिळा, खट्याळ खलाशी या नावांनी प्रसिद्ध झालेले आहेत.

डबल क्राऊन अष्टपत्री आकारातील गडबड गोष्टींचे हे तीनही संग्रह बहुरंगी छपाईमुळे आणि देवीदास पेशवे यांच्या आकर्षक चित्रांमुळे खूपच देखणे आणि दिमाखदार वाटतात.

'अस्वलाची शेपटी' या पुस्तकातील पहिलीच गोष्ट 'खलाशी' ही एका पत्र्याच्या खेळण्यासंबंधी आहे. राजूच्या अनेक खेळण्यांपैकी खलाशी हा एक. खलाशी म्हणजे जहाजावर काम करणारा नाविक. कडक, इस्त्रीची, पांढरीशुभ्र पँट, काळा कोट, डोक्यावर कॅप, हातात हातमोजे, गमतीदार चेहरा असा हा खलाशी राजूच्या इतर खेळण्यांशी फटकून रहायचा. तो बुजरा होता की स्वत:ला जास्त शिष्ट समजायचा? कोणास ठाऊक! इतर खेळणी नाना प्रकारच्या गमतीजमती करीत. पण खलाशी त्या गमतीजमतीत भाग घ्यायचा नाही. त्यामुळे राजूही त्याच्याकडे फारसे लक्ष द्यायचा नाही. मोटारीच्या बदल्यात तो ह्या खलाशाला मिनीला देऊन टाकतो.

मिनीकडची खेळणी या खलाशाला नाना प्रकारे छेडतात.

''अरे, घरात असताना हातमोजे कशाला हवेत? थंडी वाजते का तुला?'' चिंध्याची बाहुली खलाशाला विचारते.

टेडी अस्वल त्याला म्हणायचे, ''ये रे खलाशा, कोलांट्या उड्या मारूया आपण. बेडूकउड्या येतात का तुला? काढ तुझा कोट... चल, मजा करू.'' पण खलाशी मख्ख!



**इतर खेळणी म्हणाली, ''अरे, हात नसला म्हणून काय झालं? तू मोठाच हीरो आहेस. कुत्र्याच्या हल्ल्यापासून बाहुलीला वाचवण्यासाठी तू स्वतःची पर्वा केली नाहीस. तू शूर आहेस. तू कसाही असलास तरी आम्हाला तुझा अभिमान वाटतो.''**

खिडकीच्या पुढच्या फळीपर्यंत विटांची भिंत बांधायचे काम खेळण्यांनी एकदा सुरू केले. खिडकीतून बाहेरच्या गमतीजमती बघता याव्यात म्हणून. राजूला त्यांनी मदतीसाठी बोलावले. पण खलाशी म्हणाला, ''नाही. मला जमणार नाही.''

सगळी खेळणी त्याच्यावर वैतागतात. त्याच्याशी कट्टी करतात. त्याच्या बोलायचे बंद करतात. फक्त घड्याळातला उंदीर तेवढा अपवाद. तो तेवढा त्याच्याशी बोलायचा.

एकदा राजूचा खेळण्यातला घोडा हिरू त्या खेळण्यांकडे येतो. तो खलाशाची चौकशी करतो. त्याला म्हणतो, ''चल दोस्ता; बस माझ्या पाठीवर. मार चक्कर! राजूकडे असताना तुला माझ्या पाठीवर बसून फिरायला किती आवडायचं!''

खलाशी पहिल्यांदाच हसतो. ''अरे हिरू, तू आलास? आपले दोस्त कसे आहेत?''

मग खलाशी हिरू घोड्याच्या पाठीवर बसतो. त्या खेळण्यांच्या खोलीत खूप फेऱ्या मारतो.

हिरू वरून खाली उतरतो. तेव्हा हिरू विचारतो, ''अरे, तुझा हात कसा आहे आता? नवा हात बसवला का तुला?''

''नाही... अन् आता कोणी बसवणारही नाही.''

''काय झालंय याच्या हाताला?'' अस्वल मध्येच विचारतो.

घोडा उत्तर देतो, ''अरे, या खलाशीदादाने राजूच्या बाहुलीला कुत्र्याच्या हल्ल्यातून वाचवलं. त्यावेळी त्याच्या हाताचा लचका कुत्र्यानं तोडला. मोठा पराक्रमी आहे हा खलाशी.''

–आणि तो खलाशीदादाला कोट काढायला सांगतो. तर त्या हाताच्या ठिकाणी फक्त एक काठीच दिसते. हातमोजा घातल्यामुळे आणि कोटाच्या बाहीमुळे तेथे हात नाही हे लक्षात येत नसे.

घोडा पुढे म्हणाला, ''आपल्याला एक हात नाही हे कळू नये म्हणून खलाशीदादा कायम कोट-हातमोजा घालून वावरतो.''

खलाशी म्हणतात, ''माफ करा मित्रांनो, मला हात नाही हे सांगायचा धीर

**खेळण्यांच्या जगात चालणाऱ्या गमतीजमतींच्या या गोष्टी मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना देतील.**

झाला नाही.''

इतर खेळणी म्हणाली, ''अरे, हात नसला म्हणून काय झालं? तू मोठाच हीरो आहेस. कुत्र्याच्या हल्ल्यापासून बाहुलीला वाचवण्यासाठी तू स्वत:ची पर्वा केली नाहीस. तू शूर आहेस. तू कसाही असलास तरी आम्हाला तुझा अभिमान वाटतो.''

पुढे नवल घडते. त्याच्या तुटलेल्या हाताच्या जागी दुसऱ्या एका बाहुलीचा हात बसवला जातो. तेव्हा मात्र हा खट्याळ खलाशीदादा चक्क इतरांच्या खोड्या काढायला लागतो. खेळण्यातल्या कुत्र्याला पाण्याच्या झारीनं भिजवून टाकतो. उंदराला घाबरवून सोडतो. नळाचं पाणी सोडून खोलीतला गालिचा ओला करतो. पूर आलाय म्हणून सर्वांची धावपळ उडवतो.

एका पेटीत तो खेळण्यांच्या किल्ल्या टाकून, त्यांची सगळी हालचालच तो थांबवतो. तेव्हा सगळी खेळणी मिळून त्याची फजिती करतात. कशी?

पार्टीला जायच्या आधी टबमध्ये अंघोळ कर असे त्याला सांगतात. तो आपले कपडे बाजूला ठेवतो. ते कपडे, खेळणी लपवून ठेवतात, ''आमच्या वस्तू परत दे. मगच तुला कपडे देऊ'' असे बजावतात.

खलाशी उघडाबंब. केवळ टॉवेल अंगावर...

अशा मजेदार कल्पना या गोष्टींमध्ये आल्या आहेत.

खेळण्यांच्या जगात चालणाऱ्या गमतीजमतींच्या या गोष्टी मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना देतील.

दाबल्यावर आवाज करणारी रबराची बाहुली खुर्चीवरचा कुशनमध्ये लपते. आई तिच्यावर बसते तेव्हा ती किंचाळते. आईला वाटते, आपण चुकून मांजरावरच बसलो वाटतं! सगळी खेळणी ही आईची फजिती बघून हसतात.

मान हलवणारा माणूस चॉकलेट केक खायला मिळावा म्हणून काय करतो? खेळण्यांची धावण्याची शर्यत चालू असताना मध्येच कुणीतरी आपल्या पायावर पाय दिला म्हणून किंचाळतो. त्याचं किंचाळणं थांबावं म्हणून त्याला म्हणतात; 'अरे, किंचाळू नको. चॉकलेट खा आणि गप्प बस.''

दरवेळी काही हवं असलं की हा किंचाळत राहतो. पण खेळणी त्याच्याकडे चक्क दुर्लक्ष करू लागतात. किंचाळून एकदा त्याचं डोकं चक्क खांद्यावरून निसटून खाली पडतं. ते नीट बसतच नाही...



**मंकू त्याची गंमत करायचे ठरवतो. त्याच्या शेपटीला मध लावतो. त्यामुळे चिंटूच्या शेपटीवर मधमाशांचा थवा जमतो... चिंटू त्यांना झटकू लागतो तर मधमाशा त्याला चावतात.**

खेळण्यांच्या खोलीत एक नवा रेडिओ येतो. त्यावरचे कार्यक्रम ऐकून खेळणी खूष होतात. एकदा घरात चोर शिरतो तेव्हा विदूषक चक्क तो रेडिओ लावतो. त्याच्या आवाजाने घरातले लोक जागे होतात. चोराला पकडतात... सगळी खेळणी विदूषकाला शाबासकी देतात.

'अस्वलाची शेपटी' ही कथाही गमतीशीर आहे.

चिंटू अस्वलाला शेपटीच नसते. माकड, घोडा, मांजर, कुत्रा, उंदीर– सर्वांना शेपटी आहे. मलाच का नाही? असा प्रश्न त्याला पडतो. तो उंदराकडे शेपटी मागतो. उंदीर नाही म्हणतो. मंकू माकडही नाही म्हणतो. पण चिंटू मंकूची शेपटी अर्धी कापून स्वत:ला लावू पाहतो. इतर खेळणी ती काढून घेऊन मंकूच्या मूळ शेपटीला जोडू पाहतात. पण ती जोडली जात नाही. चिंटूला शेपटी दिली तरच त्याचा उपद्रव थांबेल हे माकडाला कळते. तो बाहुलीला सुतळीची शेपटी जोडतो आणि तिचाच एक तुकडा चिंटूला देऊन, तो अस्वलामागे शिवतो. ''सगळ्यात सुंदर आहे माझी शेपटी–'' म्हणत चिंटू ऐटीत सगळीकडे मिरवतो.

मंकू त्याची गंमत करायचे ठरवतो. त्याच्या शेपटीला मध लावतो. त्यामुळे चिंटूच्या शेपटीवर मधमाशांचा थवा जमतो... चिंटू त्यांना झटकू लागतो तर मधमाशा त्याला चावतात. ''मला नको बाबा ही शेपटी'' असे म्हणू लागतो. ''पुन्हा शेपटी मागणार नाहीस ना?'' इतर खेळणी त्याला विचारतात. तो कबूल करतो, तेव्हा त्याची शेपटी ओढून काढण्यात येते. ''आता मी कोणाला त्रास देणार नाही... मी चांगला वागेन. शप्पथ!'' असे चिंटू म्हणतो.

घड्याळातली कोकिळा एकदा घड्याळातच बंदिस्त होते तेव्हा विदूषक डॉलीच्या फ्रॉकवरचा बिल्ला (ब्रूच) घेऊन विदूषक घड्याळाचे दार उघडतो. पण त्या प्रयत्नात बिल्ल्यामागची पिन मोडते. डॉली रडू लागते. तेव्हा एक गांधीलमाशी तिच्याभोवती गिरक्या घेऊ लागते. डॉलीच्या गालावरच बसते... डॉली भयंकर घाबरते... पण तेवढ्यात घड्याळातली कोकिळा बाहेर येते आणि गांधीलमाशीला खिडकीबाहेर पळवून लावते... डॉली खूष होते. कुहूही मग रोज घड्याळाबाहेर येऊन इतर खेळण्यांबरोबर खेळत राहते. त्या खेळात रमल्यावर तासाचे टोले

**अशा अफलातून कल्पनांवरच्या या कथा मराठीत आणताना शक्य तेवढे आपल्याकडचे वातावरण उभे करण्याचा प्रयत्न निर्मला मोने यांनी केला आहे. त्यामुळे या कथा वाचताना मुलांना गंमत वाटेल.**

द्यायलाही विसरते कधी कधी!

बिट्टूची गोटी त्याच्या खिशातून पडते; घरंगळत डोंगरावरच्या शाळेच्या दरवाजाच्या लाकडाखाली लपते. तेथून घरंगळत खाली गटाराजवळ येते; रस्त्यातल्या खड्ड्यात पडते... चिमण्या तिला चोचीने टोचतात तेव्हा खड्ड्याबाहेर येते... गडगडत पुढे जात राहते. आणि चक्क चिंटूच्याच घराच्या दारापाशी येऊन थांबते. सगळ्या गोट्या मग तिचे कौतुक करतात. साहसी सफर करून आलेली गोटी– म्हणून तिला मान देतात.

रतनच्या खेळण्यात एक काळी मेंढी असते. तिला इतर खेळणी ब्लॅकशिप म्हणून चिडवतात. तिला वाईट वाटते. एकदा ती रंगाच्या बादलीत पडते आणि पांढरीशुभ्र होते... बर्फासारखी... सगळी खेळणी तिच्याकडे आदराने बघत राहतात... रतन मग तिला ब्रशने घासून काढतो... तिचा मूळचा काळा रंग दिसू लागतो... तरीही सगळी खेळणी तिच्याशी प्रेमाने वागतात...

खेळण्यातला हत्ती एकदा इकडेतिकडे खूप नाचतो. त्यात त्याचे चौदा तुकडे होतात. ते तुकडे जोडण्यात येतात. त्यात सोंडेच्या ठिकाणी शेपटी आणि शेपटीच्या ठिकाणी सोंड– असे होते. हत्तीला विचित्र वाटते. पण ससा त्याला दिलासा देतो...

जादूगाराचा मुलगा गंपू एकदा दरोडेखोर टिकूचा व त्याच्या सोबत्यांचा पाठलाग करतो. टिकूच्या लक्षात ते येते आणि टिकू त्याला पकडतो. ''तुला उंच फांदीवर बांधून ठेवू का तळ्यात फेकू?'' तो विचारतो. ''मला तुमच्या टोळीत घ्या'' असे गंपू सांगतो. अंगात घालायचे कोट असणारी पेटी त्याच्याकडे सांभाळण्यासाठी देण्यात येते. रात्री थंडीच्या वेळी दरोडेखोर टिकू स्वत: चांगल्या झोपडीत झोपतो. सोबत्यांना झाडाखाली झोपा म्हणतो. गंपू त्यांना म्हणतो, ''एक खड्डा खणून त्यात रहा. म्हणजे थोडी ऊब लागेल... मी तुम्हाला या पेटीतला एकेक कोट देईन...'' आणि त्या चोरांना तो चकवतो...

अशा अफलातून कल्पनांवरच्या या कथा मराठीत आणताना शक्य तेवढे आपल्याकडचे वातावरण उभे करण्याचा प्रयत्न निर्मला मोने यांनी केला आहे. त्यामुळे या कथा वाचताना मुलांना गंमत वाटेल. त्या सांगतानाही आईबाबांना व शिक्षकांना नाट्यपूर्ण शैलीचा वापर करता येईल. निरनिराळी खेळणी, त्यांची



एकमेकांशी असणारी मैत्री किंवा स्पर्धा, त्यांच्या आशाआकांक्षा, त्यांच्या व्यथावेदना– या सर्व माणसासारख्याच असल्याने त्या खेळण्यांकडेही जिवंत व्यक्ती म्हणून बघण्याची नजर मुलांमध्ये विकसित होईल. त्यांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळेल. रंगीत चित्रांमुळे या खेळण्यांचे वा प्राण्यांचेही व्यक्तिमत्त्व मनावर ठसेल. त्यांना चैतन्य लाभेल. मुलांचे भावविश्व त्यामुळे समृद्ध होईल.

**पृष्ठे: ३२ ● किंमत : ३० रु. ● सभासदांना: २० रु. ● पोस्टेज: २० रु.**

## विज्ञान प्रयोग

| | | |
|---|---|---|
| वैज्ञानिक खेळणी | डी. एस्. इटोकर | ५० |
| छंदातून विज्ञान | डी. एस्. इटोकर | ६० |
| फक्त खेळण्यांसाठी | डी. एस्. इटोकर | ७० |
| **(राज्य पुरस्कार २०००-०१)** | | |
| खेळणीच खेळणी | डी. एस्. इटोकर | ६० |
| **(राज्य पुरस्कार २००४)** | | |
| विज्ञान गमती | | |
| **(राज्य पुरस्कार ९४-९५)** | डॉ. अरुण मांडे | ५० |
| विज्ञान जमती | | |
| **(राज्य पुरस्कार ९४-९५)** | डॉ. अरुण मांडे | ६० |
| चला, प्रयोग करू या! | | |
| उर्जा | मीना किणीकर | २५ |
| उष्णता | मीना किणीकर | २५ |
| अन्न | मीना किणीकर | २५ |
| परिस्थितीशास्त्र | मीना किणीकर | २५ |
| हवा | मीना किणीकर | २५ |
| पदार्थ | मीना किणीकर | २५ |
| अवकाश | मीना किणीकर | २५ |
| हवास्थिती | मीना किणीकर | २५ |
| गती : चलन | मीना किणीकर | २५ |
| ध्वनी | मीना किणीकर | २५ |
| मोजमापे | मीना किणीकर | २५ |

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.** **पोस्टेज खर्च वेगळा**

## साधंसुधं...

# भय इथले संपत नाही...

**प्रमोदिनी वडके-कवळे**

दत्ताच्या देवळामागच्या मैदानात मंगलवाडी विरुद्ध काळे गल्ली या दोन तुल्यबळ गटातला खोखोचा आंतरराष्ट्रीय सामना अगदी रंगात आला होता. जोरदार आरडाओरडा आणि टाळ्यांनी मैदान गजबजलं होतं. घसा दुखेस्तोवर ओरडून आम्ही आमच्या खेळाडूंना मनोधैर्य पुरवीत होतो. खेळ सगळ्यांनाच आवडतो, पण मैदानावर जाऊन खेळण्याची आणि पराभवानंतरच्या निंदेला सामोरं जाण्याची तडफ ज्यांच्यात असते तेच खेळाडू होऊ शकतात, असं आमच्या एका धड्यात सांगितलेलं होतं. आमच्याकडेही तीच परिस्थिती!.. त्यामुळेच आजही प्रत्यक्ष खेळणाऱ्यांपेक्षा प्रोत्साहन देणाऱ्यांचा उत्साहच जास्त दिसत होता.

उत्साहाच्या त्या लाटेत वाहताना अंधार कधी पडला ते माझ्या लक्षातच आलं नाही. धाकटी बहीण मागे येऊन रडवेल्या स्वरात 'ताई चल ना आता.' म्हणून विनवायला लागली तेव्हा कुठे मला आठवलं, मी धाकट्या दोघी बहिणींना घेऊन दत्ताच्या देवळाजवळच्या गिरणीत दळण टाकायला आले होते. आणि दळण दळून व्हायला वेळ असल्याने या मैदानाकडे वळले होते; त्याला आता बराच वेळ होऊन गेला होता. .

हे वास्तव जाणवताच मात्र माझ्या उरात धडकी भरली. आता गिरणीतून दळण घेऊन घरी जायचं म्हणजे महासंकट! कारण तो रस्ता काळ्यांच्या बोळातून जायचा. काळ्यांच्या वाड्याची मागची बाजू असल्याने या बोळात गुडूप्प अंधार तर असायचाच, शिवाय तिथे दोन चिंचेची, तीन आंब्याची आणि एक बकुळीचं अशी जगभर भुताटकीची म्हणून ओळखली जाणारी सणसणीत अर्धा डझन झाडं असल्यानं दिवसासुद्धा आम्हाला तिथून जायला सोबत लागायची. आता तर काय रात्रीचीच वेळ.

पण आता तिथून जाण्याखेरीज दुसरा पर्यायच नव्हता. माझ्या एका हातात दळणाचा डबा आणि दुसऱ्या हातानं लहान बहिणीचं बोट धरलेलं. तिच्या पलिकडे मधली बहीण अशी आमची वरात रामराम म्हणत त्या निर्जन बोळाच्या तोंडाशी



आली. कोणत्याही परिस्थितीत बोळ पार केल्याशिवाय गत्यंतरच नाही म्हणून जिवाचा धडा करून आम्ही बोळात पाऊल टाकलं. जेमतेम आठदहा पावलं पुढे गेलो असू नसू, तेवढ्यात झाडावरून काहीतरी (बहुधा एखादं पिकलेलं फळ) धपकन खाली पडलं. त्या आवाजाने इतका वेळ कसाबसा गोळा केलेला माझा धीर संपला. हातातला दळणाचा डबा खाली रस्त्यातच ठेवून मी जोरदार भोकाड पसरलं. घाबरलेल्या दोघी बहिणींनीही तत्परतेने माझ्या सुरात सूर मिसळला.

आमच्या या समूहभयगीताचा आवाज बोळाच्या पलिकडच्या तोंडाशी पोचला असावा. कारण बोळाच्या तोंडाशी असलेल्या घराचं दार फटकन उघडलं आणि मोघेकाका काठीबिठी घेऊन साप मारायच्या तयारीत घाईघाईत बाहेर आले.

पुढचे सगळे तपशील फारसे महत्त्वाचे नाहीत. मात्र या घटनेतल्या अजूनही जशाच्या तशा जाणवणाऱ्या तीन गोष्टी म्हणजे मोघेकाकूंचा उबदार मायाळू स्पर्श, आजींच्या हातची आंब्याची वडी आणि काकांच्या दमदार आवाजातलं सांगणं. . ''अशी चार पुस्तकं वाचलीस ना, तर तुझ्या मनातली सगळी भुतं आणि ब्रह्मराक्षस कुठल्याकुठे पळून जातील बघ..''

त्यावेळी काकांनी मला ना. धो. ताम्हनकरांचं 'चिंगी' दिलं होतं. आजही माझ्याकडे ते पुस्तक जपून ठेवलेलं आहे. मी माहेरी गेले की भाचीला त्यातल्या गोष्टी वाचून दाखवणं हा ठरलेला कार्यक्रम असतो. मला आणि भाचीला दोघींनाही मनापासून आवडणारा.

ताम्हनकरांची ही खट्याळ तरीही भाबडी अशी चिंगी तेव्हापासून माझी जिवाभावाची मैत्रीण बनून राहिली आहे. बापटसरांच्या माराला, बीजगणितातल्या क्ष आणि य ला, इतिहासातल्या सनावळ्यांना, अंधारातल्या भुताला, गोष्टीतल्या ब्रह्मराक्षसाला, वर्गातल्या भांडखोर वनिताच्या टोमण्यांना, उंदराझुरळाला- अगदी मेलेल्या सापालासुद्धा भिऊन रहाणाऱ्या मला चिंगीचा बोलधीटपणा आणि कोणत्याही गोष्टीला थेट जाऊन भिडण्याचा बेधडकपणा मनापासून भावला. आणि नकळतच मी मैत्रीचा हात तिच्यापुढे केला.

कॉलेजला गेल्यावर होस्टेलला रहाण्याचं दिव्य करावं लागलं आणि माझा भित्रेपणा आणखी वाढला. कारण आजवर घर सोडून एकटी मी कधीच बाहेर राहिले नव्हते. आजपर्यंत मला फक्त वर्गातल्याच मुलांशी बोलायची सवय होती. आता वेगवेगळ्या उपक्रमांच्या निमित्ताने मुलांच्यात मिसळावं लागलं. घरापासून दूर राहिल्यानं एकटेपण सतत मनात असायचंच, तशात एखाद्या मुलानं काही त्रास दिला, किंवा मन डळमळून जावं असं काही घडलं, की मी पार सटपटून जायची. रात्रंदिवस मनावर आपल्या हातून काहीतरी वेडंवाकडं तर घडणार नाही ना, या भीतीचं प्रचंड ओझं यायचं. (त्यावेळी 'वेडंवाकडं'च्या संकल्पना फारच मर्यादित आणि भाबड्या

होत्या.) अशा डळमळीत मनःस्थितीत असतानाच एक दिवस मला 'बाबी' भेटली. व. पु. काळ्यांची ही मानसकन्या 'ही वाट एकटीची' कादंबरीमधून माझ्या ओळखीची झाली आणि चिंगीइतकीच जवळची वाटायला लागली. तारुण्यातल्या सगळ्या वादळी आवेगांना प्रामाणिकपणे सामोरी जाणारी आणि नंतरच्या परिणामांनाही तेवढ्याच प्रामाणिकपणे स्वीकारून ताठपणे जगणारी बाबी मला अक्षरशः दिपवून गेली. त्या अव्यवहारी वयात भुरळ घालणारं चकचकीत शब्दांचं तत्त्वज्ञान बाबी जातायेता चॉकलेट हातावर ठेवावं तशा सहजपणे सांगून जायची आणि अडीनडीच्या वेळी ते नुसतं आठवूनच माझ्या भित्र्या मनाला धीर यायचा.

वास्तवाचा निखारा हातात घेऊन, त्या चटक्यांसहित जगणाऱ्या बाबीसारख्या मुली या जगात नक्कीच कुठेतरी असतील असा भाबडा विश्वास माझ्या मनात खोल रुजला. त्या विश्वासाच्या बळावरच स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराच्या बातम्या मी अजूनही - अगदी आजही पचवू शकते.

वडिलांनी पाठवलेल्या मेसबिलाच्या रकमेत काटकसर करून मी 'ही वाट एकटीची' खरेदी केलं आणि बाबीला कायमचं जवळ ठेवून घेतलं.

जगरहाटीनुसार माझं लग्न झालं.

भित्री असले म्हणून काय झालं? मीही संसार मांडला. माझ्यावरच्या जबाबदाऱ्या वाढल्या. अर्थात अजूनही माझ्या मध्यमवर्गी पापभीरू मनावर दुसऱ्या कोणत्याही भावनेपेक्षा भीतीचाच पगडा जास्त होता. अर्ध्या आयुष्याचा अनुभव पचवूनही मन कच्चंच राहिलं होतं अजून. पालक म्हणून मुलांच्या मागे खंबीरपणे उभं रहायची वेळ आली तरीही, मनातला दुबळेपणा तसाच होता. सासरच्या नातेवाईकांचं दडपण, समाजनियमांची भीती, नोकरी आणि घर दोन्ही सांभाळताना होणाऱ्या फजितीचं भय, मुलांच्या अपयशाचा बागुलबुवा, ऑफिसमधल्या सहकाऱ्यांचं वागणं . . सगळ्या आघाड्यांवर फक्त भीती आणि भीतीच!

अंतराच्या आणि माझ्या नोकरीच्या वेळेच्या दृष्टीने सोयीचं असलेलं एक पाळणाघर मिळालं. पण तिथले नियम आणि अटी फारच जाचक होत्या. मुलांना तिथे सोडताना माझ्यावर खूप दडपण यायचं. पण 'त्यांच्या भल्यासाठीच तर आपण हे सगळं करतोय ना?' अशी मनाची समजूत घालून मी मुलांना तिथे सोडायची. नोकरी करणाऱ्या स्त्रियांना हे सहन करणं भागच आहे असं मनाला बजावायची.

त्याच सुमारास केव्हातरी माझ्या हातात 'नॉट विदाऊट माय डॉटर' पडलं आणि माझ्या भित्र्या मनाने नकळत बेट्टी महमुदीला सलाम केला. मुलीला पोटाशी धरून सात समुद्रापेक्षा मोठाली संकटं ओलांडणारी बेट्टी मला झाशीच्या राणीइतकीच शूर वाटली. या जन्मी जमलं नाही तरी, पुढच्या जन्मी आपण तिच्यासारखंच निडर व्हायचं असा मनोमन संकल्प केला आणि बारा बाय पंधराच्या माझ्या हॉलच्या



कोपऱ्यातल्या चिमुकल्या लायब्ररीत मी तिची स्थापना केली.

स्वतःचं घर घ्यायचं ठरवलं, तेव्हा आयुष्यात पहिल्यांदा मला कायद्याचं (त्याच्या तिरकस चालीचंही) अस्तित्व जाणवलं. पण मी पठ्ठी अशी हुशार की नोकरीची सबब सांगून आणि पैशाची ढाल पुढे करून अलगद त्या कागदपत्रांच्या कचाट्यातून माझी सुटका करून घेतली. नवऱ्याने काही सांगायचा प्रयत्न केलाच तर, 'तुम्हाला ठाऊक आहे ना? मग झालं तर.' असा पवित्रा घेऊन मोकळी राहिले. कोण स्वतःला त्या जंजाळात अडकवून घेणार? मी भित्री असले तरी शहाणी होते. कोर्टाच्या पायरीला पाय लावायचा वेडेपणा मी कशी करेन?

पण एका संध्याकाळी मला 'केतकर वहिनी' भेटल्या आणि माझा 'शहाणपणा'बद्दलचा गैरसमज बंधन तुटलेल्या कपड्यासारखा नकळत गळून पडला. शिक्षण घेऊनही अशिक्षित रहाण्याचा अट्टाहास धरणाऱ्या स्वतःची मला प्रचंड लाज वाटली. मग ती लपवण्यासाठी जो भेटेल त्याला मी केतकरवहिनींबद्दल सांगत राहिले. ऐकणाऱ्यांची पर्वा न करता ऑफिसमध्ये, जेवणाच्या टेबलावर, समारंभा-हळदीकुंकवातही त्यांच्याबद्दलच बोलत राहिले. वाचनाची सवय असलेल्या मित्रमैत्रिणींना ते पुस्तक भेट देत राहिले. भेकडपणे जगण्याचा अक्षम्य अपराध झाला होता माझ्याकडून. या जन्मी तरी तो पुसला जाणार नव्हता. पण त्यावरचं प्रायश्चित्त म्हणून मी केतकरवहिनींची अशी मानसपूजा बांधत राहिले. .

'.. अजूनही मी तशीच भित्री आहे. कल्पित भुतांच्या सावल्या माझ्या मध्यममार्गी, कातडीबचाऊ मनाला सतत भेडसावत असतात. त्या सावल्या जास्तीच लांब व्हायला लागल्या की मी यातलं एखादं पुस्तक काढते. माझ्यासारख्याच सामान्य परिस्थितीत राहून, असामान्य जिद्दीने जगणाऱ्या, आयुष्याची लढाई धैर्याने लढणाऱ्या या स्त्रियांच्या कथा वाचून माझ्या भित्र्या मनाला धीर येतो .

शेवटी आपण सामान्य माणसं! शेजाऱ्यांच्या अल्सेशियन कुत्र्याला हाड म्हणायची हिंमत नसली तरी, आपण नाटकासिनेमातल्या शौर्याचा फुकाचा अभिमान बाळगतो. पेपरातलं अत्याचाराच्या बातमीचं पान वरवर वाचून उलटतो पण भीती लपवून छाती फुगवत ढोंगीपणे जगतो.


आपलं हे पोकळ निःसत्त्व जगणं आपल्याला सुसह्य होतं ते साहित्यातल्या या 'अक्षर' व्यक्तिमत्त्वांमुळेच ना?

— — — — — — — — — — —

**प्रमोदिनी वडके-कवळे**
प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०,
सुखसागरनगर क्र. २, गल्ली क्र. १०,
कोंढवा बुद्रुक, पुणे ४११०४८

# चिकन सूप फॉर द वुमन्स सोल

## आगमन...




स्त्री मनोगुणांचा शोध घेणाऱ्या कथा

**जॅक कॅनफिल्ड/ मार्क व्हिक्टर हॅन्सन / जेनिफर रीड हॉथॉर्न / मार्सी शिमॉफ**

**अनु. श्यामला घारपुरे**

**१६०रु. पोस्टेज २०रु.**

***गृहिणी सचिवः सखी मिथः***
***प्रियशिष्या ललिते कलाविधौ.....***

महाकवी कालिदासाच्या या उक्तीतून स्त्रीची विविध रुपं प्रकट होतात.

चिकनसुप फॉर द वुमन्स सोल या पुस्तकात स्त्रीशी निगडित असलेल्या या साऱ्या गुणवैशिष्ट्यांचे मार्मिक चित्रण आढळतं.

स्त्रीच्या आत्म्याची मंगलता व सौंदर्य इथे प्रकट होतं.

व्यावसायिक असो की गृहिणी, बालिकेपासून वृद्ध स्त्रीपर्यंत सर्वस्तरावर हे अनुभव दीर्घकाळपर्यंत सोबत करतील.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**


चुकीची दुरुस्ती : फेब्रुवारी २००७च्या अंकात वरील पुस्तकाच्या अनुवादिकेचे नाव चुकीचे छापले गेले होते. या पुस्तकाचा अनुवाद उषा महाजन यांनी केला नसून श्यामला घारपुरे यांनी केला आहे.



# पुरस्कार

### * बाबुराव बागूल यांना 'जनस्थान पुरस्कार'

दलित साहित्याला नकाराचे आणि विद्रोहाचे भान देणारे ज्येष्ठ साहित्यिक बाबुराव बागुल यांची कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या जनस्थान पुरस्कारासाठी निवड केल्याची घोषणा डॉ. जब्बार पटेल यांनी केली. एक लाख रुपये, मानचिन्ह आणि सन्मानपत्र अशा स्वरूपाचा हा पुरस्कार कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी, २७ फेब्रुवारी रोजी बाबुरावांना नाशिकमध्ये सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

'जेव्हा मी जात चोरली होती' आणि 'मरण स्वस्त होत आहे' या पहिल्या दोन कथासंग्रहांनीच अवघ्या मराठी साहित्यविश्वात खळबळ उडवून देणाऱ्या बागुलांची निवड एकमताने झाल्याचे पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ. अरुण टिकेकर यांनी सांगितले. ते म्हणाले, 'दलित वाङ्मयाचा मूलस्त्रोत ठरलेल्या आणि गटबाजी न करता निष्ठेने लेखन करणाऱ्या एकांड्या शिलेदाराचा हा सन्मान आहे. सुधीर रसाळ, सतीश काळसेकर, अक्षयकुमार काळे, मीना वैशंपायन, यशवंत पाठक, केशव शिराळकर हे पुरस्कार निवड समितीचे सदस्य होते. सतीश काळसेकर यांनी 'बागुलांना हा पुरस्कार म्हणजे त्यांच्या पिढीचा व काळाचा गौरव' असे नमूद केले.

### * 'युवा पत्रकार' पुरस्कार

'अनुपमा जयराम मेमोरिअल ट्रस्ट'तर्फे देण्यात येणारा 'युवा पत्रकार' पुरस्कार पुण्याच्या स्मिता आगरवाल या विद्यार्थिनीस 'नेटवर्क ऑफ वुमेन इन मीडिया-इंडिया' (एन. डब्ल्यू. एम. आय.) च्या बंगळूर येथील राष्ट्रीय परिषदेत ज्येष्ठ नेत्या रूथ मनोरमा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पुण्यातील तसेच परदेशांतील महिला पत्रकार या परिषदेत सहभागी झाल्या होत्या.

अमेरिकेतील स्त्रीवादी ज्येष्ठ कार्यकर्त्या ग्लोरिया स्टिनेम यांनी या वेळी स्त्रीवादी चळवळीचे विविध पैलू सांगितले. 'आयटी'मधील महिला, त्यांचे प्रश्न व त्यांची सामाजिक स्थिती या विषयावरही परिषदेत चर्चा झाली. श्रीलंका, पाकिस्तान व मालदीव येथील महिला पत्रकारांनी आयोजित केलेल्या चर्चासत्रात दहशतीच्या सावटाखाली पत्रकारिता करताना येणाऱ्या अडचणी सांगितल्या.

### * प्रकाश मिसाळ यांना आदर्श ग्रंथपाल पुरस्कार

'पुणे नगर वाचन मंदिरा'तर्फे दिला जाणारा आदर्श ग्रंथपाल पुरस्कार 'बँक

ऑफ महाराष्ट्र'चे ग्रंथालयप्रमुख प्रकाश मिसाळ यांना ७ फेब्रुवारी रोजी 'लोकमत'चे संपादक अनंत दीक्षित यांच्या हस्ते संस्थेच्या १५९ व्या वर्धापनदिन समारंभात देण्यात आला.

### * वरुणराज भिडे पुरस्कार

बीएमसीसी माजी विद्यार्थी संघटनेतर्फे पत्रकारितेतील विशेष कार्यासाठी देण्यात येणारा '(कै.) वरुणराज भिडे पुरस्कार' या वर्षी एज्युकेशनल मीडिया रिसर्च सेंटरचे संचालक समीरण वाळवेकर यांना जाहीर झाला आहे. कला क्षेत्रातील कामगिरीसाठी देण्यात येणारा 'बाळासाहेब सरपोतदार पुरस्कार' अभिनेते प्रसाद ओक यांना जाहीर झाला आहे. मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष अजय सरपोतदार यांच्या हस्ते ता. ११ फेब्रुवारी रोजी बीएमसीसी महाविद्यालयात पुरस्कार देण्यात आले.

### * गुलजार यांना पु.ल. पुरस्कार

'पु. ल. देशपांडे यांनी तीन तास वाचलेल्या मराठी कवितांची आठवण आपल्या मनात आजही ताजी आहे. किंबहुना त्या आठवणीचा सुगंध मनात दरवळतोय! मराठी समजत नसूनही पुलंची शायरी माझ्यापर्यंत अगदी सहज सरळ पोहोचली, असे उद्‌गार पटकथा लेखक आणि दिग्दर्शक गुलजार यांनी पुलोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी काढले.

आशय सांस्कृतिक आणि परांजपे स्कीम्सतर्फे चौथ्या 'पुलोत्सवा'चे निमंत्रक आणि पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते गुलजार यांना 'बहुरूपी पु.ल. स्मृती सन्मान' देण्यात आला. पुणेरी पगडी, स्मृतिचिन्ह आणि एक लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. त्यापूर्वी ८० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष अरुण साधू यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्‌घाटन झाले. लेखक अरुण शेवते आणि रंगकर्मी माधव वझे यांनी गुलजार यांची मुलाखत घेतली.

दिग्दर्शक विकास देसाई यांच्यामुळेच 'पु.लं.'ची गाठ पडली होती, असे सांगून गुलजार म्हणाले, 'पुण्याशी आपले नाते तरुणपणापासूनच जोडले गेले आहे, असे सांगून गुलजार म्हणाले. आकाशवाणीतील मित्रांबरोबर सायकलींवरील भ्रमंती आजही आठवते. पुण्यातील मराठीचा 'लहेजा' मनापासून आवडतो. महाराष्ट्राची संस्कृती घुसळल्यानंतर निघालेले लोणी म्हणजेच हे सांस्कृतिक शहर आहे', अशी उपमाही त्यांनी दिली.

### * आळेकर, हट्टंगडी यांना नाट्यपुरस्कार प्रदान

ज्येष्ठ नाटककार आणि तरुण कलाकारांचे प्राध्यापक सतीश आळेकर यांना वि. वा. शिरवाडकर पुरस्कार तर ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी यांना वसंत



कानेटकर पुरस्कार देऊन नाशिकमध्ये गौरविण्यात आले. मराठी नाट्य परिषदेच्या नाशिक शाखेतर्फे दिले जाणारे हे पुरस्कार यंदाच्या नाट्य संमेलनाच्या नियोजित अध्यक्षा लालन सारंग यांनी प्रदान केले.

सतीश आळेकरांना नाट्यलेखनाचा तर हट्टंगडींना रंगकर्मी पुरस्कार मिळाला. दोन्ही पुरस्कार २५ हजारांचे आहेत. दोन्ही कलावंतांना यावेळी मानपत्र तसेच स्मृतिचिन्हही देण्यात आले. या वेळी लालन सारंग म्हणाल्या, ''नाटक हे जिवंत माध्यम आहे. आयुष्यभर मनसोक्त नाटकात रमत आले, हे माझे भाग्य आहे आणि नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद हा माझ्या भूमिकांचा सन्मान आहे.

रोहिणी हट्टंगडी यांनी कानेटकरांच्या नावाने पुरस्कार असल्याने त्याचे विशेष महत्त्व असल्याचे सांगितले. १९७६ मध्ये वसंत कानेटकर यांच्या 'कस्तुरीमृग' या नाटकातून त्यांनी व्यावसायिक रंगभूमीवर पाऊल ठेवले होते.

सतीश आळेकर म्हणाले, 'हा पुरस्कार म्हणजे शिरवाडकरांचा मिळालेला प्रसादच आहे. गोवा येथे साहित्य संमेलनात माझा शिरवाडकरांशी परिचय झाला. त्यांचे 'कौंतेय' हे नाटक मला जास्त भावले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात विलक्षण तोल होता. समाज आणि कलाकार यांचे नाते कसे असावे; याचा ते आदर्श वस्तुपाठ होते.'

### * मराठी चित्रपटांसाठी चित्रपती व्ही. शांताराम पुरस्काराची घोषणा

मराठी चित्रपटच नव्हे तर भारतीय चित्रपटसृष्टीच्या वाटचालीची 'प्रभात' घडवून आणणारे चित्रपती व्ही. शांताराम यांच्या नावाने मराठीतील दर्जेदार चित्रपटनिर्मितीसाठी पुरस्कार देण्यात येणार असल्याची घोषणा व्ही. शांताराम यांचे पुत्र आणि पुरस्कार आयोजन समितीचे अध्यक्ष किरण शांताराम यांनी केली.

सर्वोत्कृष्ट चित्रपट, दिग्दर्शक यांच्यासह अभिनय, कथा, पटकथा, संवाद, रंगभूषा, छायांकन, संगीत, गीत, गायन, कला, नृत्य, संकलन, ध्वनी अशा सर्वच विभागांसाठी चित्रपती व्ही. शांताराम पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

याशिवाय, विशेष लक्षवेधी प्रथम निर्मितीसाठीही पुरस्कार असून सर्वोत्कृष्ट चित्रपट, दिग्दर्शन, प्रथम निर्मितीसाठी पन्नास हजार रोख आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. मराठी चित्रपटांसाठी भरीव यागदान देणाऱ्या एका ज्येष्ठ व्यक्तीचाही जीवनगौरव पुरस्काने या वेळी विशेष सन्मान करण्यात येणार आहे. मानपत्र, सन्मानचिन्ह आणि पन्नास हजार रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप असेल.

### * आद्यकवी मुकुंदराज पुरस्कार

अंबाजोगाई सारख्या पुण्यभूमीत मराठी भाषेच्या आद्यकवीच्या नावाने मिळालेला पुरस्कार आपल्याच जीवनात निश्चित मार्गदर्शक ठरेल. या पुरस्कारांनी आपण

अंत:र्मुख झालो असल्याचे नामवंत कवी प्रा. फ. मु. शिंदे यांनी प्रतिपादन केले.

अंबाजोगाईत ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी आर. डी. देशपांडे प्रतिष्ठानचा आद्यकवी मुकुंदराज काव्यरतन पुरस्कार त्यांना देण्यात आला.

नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, उपनगराध्यक्ष दिलीप सांगळे, आर. डी. देशपांडे, पतसंस्थेचे अध्यक्ष दिनकर जोशी, रामदास डांगे (परभणी) उपस्थित होते. अंबाजोगाई या नगरीत मराठीचा पाया सेवेला गेला.

*** साहित्य पत्रकारिता पुरस्कार**

पोंभुर्ले येथे कै. बाळशास्त्री जांभेकरांच्या जन्मगावी महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीतर्फे नागपूर साहित्य संमेलनाचे अध्यक्ष अरुण साधू यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले.

श्री. अरुण साधू यांनी महाराष्ट्रात आघाडीचे संपादक व पत्रकार असूनही मराठी भाषा क्षीण होत चालली असल्याचे नमूद केले. 'पत्रकारांच्या कल्याणासाठी मंत्र्यांचा पैसा घेऊ नका. पत्रकारांनी स्वत:च एकेक पैसा जमा करून बाळशास्त्री जांभेकरांचे ग्रंथालय उभे करावे. तसे न झाल्यास मराठी भाषा करंटी राहील,' अशी खंत साधूंनी व्यक्त केले

*** शब्द-शोध वाङ्मय पुरस्कार**

संत गाडगेबाबा वाचनालय व वृत्तपत्र 'शब्द-शोध' यांच्या संयुक्त विद्यमाने सर्वोत्कृष्ट वाङ्मय निर्मितीसाठी पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

गद्य-लेखनप्रकारापेकी कादंबरी-नाटक आदीसाठी प्रत्येकी तीन हजार रुपये रोख, कथासंग्रह आणि एकांकिका-वाङ्मयप्रकाराला अडीच हजार रुपये रोख आणि काव्यसंग्रहाला दोन हजार रुपये रोख पुरस्कार देण्यात येईल.

आपली साहित्यकृती लेखक/कवी किंवा प्रकाशकांनी किमान दोन प्रतींसह सोबत आत्मपरिचय-पासपोर्ट साईज फोटो येत्या १५ एप्रिल २००७ पर्यंत पुढील पत्त्यावर पाठवावेत.

राजीव पुरुषोत्तम रोहणकार
कार्यवाह,
'शब्द-शोध-वाङ्मय पुरस्कार'
प्रगती लॉजजवळ,
किनवट, नांदेड - ४३१८०४
* दूरध्वनी- ०७२५-२२५५१८
* मोबाईल- ९८२२४३१४७५/९९२२१२९७१३
* फॅक्स- ०२४६९-२२३४१९

❐



# चरित्रे / व्यक्तिचरित्रे

| | | |
|---|---|---|
| नाथ हा माझा | कांचन घाणेकर | २५० |
| रेशीमगाठी | कांचन घाणेकर | १०० |
| बिझिनेस महाराजे **: गीता पिरामल** | अनु. अशोक जैन | २५० |
| बिझिनेस लेजंड्स **: गीता पिरामल** | अनु. अशोक जैन | ३०० |
| जेआरडी : एक चतुरस्त्र माणूस | माधुरी शानभाग | १०० |
| परमवीरचक्र (रणांगणावरील आपले महान योद्धे) : **मेजर जनरल इयान कारडोझो** | अनु. ज्योत्स्ना लेले | १८० |
| व्यथित मनानं सांगावसं वाटतं की... : **टी. एन. शेषन** | अनु. भारती पांडे | १०० |
| वादळ माथा | राम प्रधान | २०० |
| भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया **: नवाझ मोदी** | अनु. वासंती फडके | ३०० |
| स्वप्नाकडून सत्याकडे (कल्पना चावलाची कहाणी) | माधुरी शानभाग | ५० |
| योध्दा शास्त्रज्ञ : राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम | माधव मोर्डेकर | ४० |
| मोरावळा | शिवाजी सावंत | ६० |
| थॉट लीडर्स : **श्रीनिवास पंडित** | अनु. वकील / वाडकर | ३०० |
| मराठेशाहीतील मनस्विनी | डॉ.सु. र. देशपांडे | १२० |
| छत्रपती राजर्षी शाहू महाराज | तु. बा. नाईक | १०० |
| मदर टेरेसा : **ॲन सेबा** | अनु. अनंत बेदरकर | २५० |
| सिलेक्टिव्ह मेमरी **: शोभा डे** | अनु. अपर्णा वेलणकर | ३३० |
| टाईमपास **: प्रोतिमा बेदी** | अनु. सुप्रिया वकील | १८० |
| चेहऱ्यामागचे चेहरे **(रणजित देसाई पुरस्कार २००२ / राज्य पुरस्कार २००२-०३)** | महादेव मोरे | १५० |
| देव जो भूवरी चालिला : **साईबाबा रंगास्वामी पार्थसारथी** | अनु. लीना सोहोनी | १२० |
| जीवनयात्रा : अभिनेता-दिग्दर्शक मा. विनायक **(को.म.सा.प.पुरस्कार २००६)** | भाई भगत | १५० |

| | | |
|---|---|---|
| इंदिरा **: कॅथरीन फ्रँक** | अनु. लीना सोहोनी | ४०० |
| स्वामी विवेकानंद **: गौतम घोष** | अनु.माधव मोर्डेकर | १८० |
| लिव्हिंग हिस्ट्री : **हिलरी रॉडहॅम क्लिन्टन** | अनु. सुप्रिया वकील | ४०० |

## आत्मकथन

| | | |
|---|---|---|
| चाकाची खुर्ची | नसीमा हुरजूक | १८० |
| द जॉय ऑफ कॅन्सर : अनुप कुमार | अनु. माधुरी शानभाग | १५० |
| खाली जमीन वर आकाश | डॉ.सुनीलकुमार लवटे | १५० |
| **(राज्य पुरस्कार-लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार २००६)** | | |
| जिहाद | हुसेन जमादार | २२० |
| डेअर टू पब्लिश : दीना. एन. मल्होत्रा | अनु. सुप्रिया वकील | २०० |
| ए कॉल टू ऑनर : उगवत्या भारताच्या जयजयकारासाठी नाद जसवंतसिंग | अनु. अशोक पाध्ये | ४०० |

## अनुभव कथन

| | | |
|---|---|---|
| स्ट्रगलर्स | मुक्ता चैतन्य | ९० |

## माहिती कोश

| | | |
|---|---|---|
| असे घडले सहस्रक | निरंजन घाटे/ प्रमोद जोगळेकर | ३०० |

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.** **पोस्टेज खर्च वेगळा**



## वाचकांचा प्रतिसाद

मा.प्रकाशक,

'बदकाचे बूट' व 'गर्विष्ठ फूल' आणि 'गम्मत गोष्टी' ही सौ. उज्वला केळकर यांची आपण प्रकाशित केलेली पुस्तके वाचली.

चित्रांपासूनच पुस्तक आवडले. समर्पक चित्रे, गोष्टी काल्पनिक असल्या तरी त्यांना एक फ्लो आहे. निसर्गात गोष्टी वाचतावाचताच फेरफटका मारून होतो. दररोजचीच भेटणारी पात्रे; पण कल्पनारम्यता आहे. त्यामुळे गोष्टी मुलांनाही भावल्या. छोट्यांना वाढदिवसाची भेट स्पर्धेत बक्षीस म्हणून द्यायला पण पुस्तके चांगली आहेत. पोगोच्या कार्टुनच्या जमान्यात तर अशा पुस्तकांची गरजच आहे. सुंदर कथा व त्याला रंगीबेरंगी चित्रे ह्यामुळे मुलांना वाचायला पण कंटाळा येणार नाही.

सौ. मेधा सहस्रबुद्धे, पुणे

मा.प्रकाशक,

'मुलांना काय बरं गोष्टी सांगाव्यात!' हा आम्हा आज्यांना पडलेला यक्षप्रश्न! एकमेकीला सुचवितो ते रामायण, महाभारत किंवा इसापनीतीच्या गोष्टी. पण अगदी छोट्या मुलांना त्यांच्या बुद्धीच्या आवाक्यातल्या आणि कल्पनारम्य गोष्टी आवडतात. त्यात ती रंगतात. 'बदकाचे बूट आणि गम्मत गोष्टी', 'गर्विष्ठ सूर्यफूल' ही उज्वला केळकर यांची पुस्तके माझ्या हाती योगायोगानेच आली. आणि खरंच, मुलांच्या आवडीच्या सुंदर गोष्टींचा खजिना मिळाला.

या गोष्टींमध्ये सुसूत्रता आहे. गोष्टीतील पात्रे ही आपल्याला रोज आढळणारी फुले, फुलपाखरे, साळुंखी, सूर्य, चंद्र, मासोळी, झुरळ, अळी, ससा, अस्वल, गोगलगाय इत्यादी आहेत. त्यांच्या स्वभावाची वैशिष्ट्ये अगदी सहजपणे उलगडून दाखविलेली आहेत. त्याच्या जोडीला सुंदर, रंगीबेरंगी चित्रांची सजावट, पुस्तकातील अक्षरांचा आकारही डोळ्याला सुखावणारा आहे. तसेच कल्पनेतील परीची गोष्ट, बकुलफुलांना गंध प्राप्त होणे, कळीचा हट्टीपणा आणि ब्रह्मकमळ फक्त रात्रीच उमलते यांचा सुंदर संबंध जोडणे, पावसानंतर नयनरम्य दिसणाऱ्या इंद्रधनुष्याचा काल्पनिक शिडी म्हणून वापरणे या सर्वच कल्पना छान वाटतात.

सौ. जयश्री गोडसे, धनकवडी

मा.संपादक,

'ग्रंथजगत' फेब्रुवारीचा अंक मिळाला. पोटभर माहिती मिळाल्याचा आनंद झाला. 'साहित्यवार्ता' या सदरातून कितीतरी गोष्टी नव्यानं समजल्या. हे संकलन तुम्ही कसं केलं असावं! साहित्यक्षेत्रात कुठं काय चाललंय याची माहिती माझ्यासारख्याला फार मोलाची वाटते.

'जागतिक अर्थव्यवस्था', 'इंडिया इन स्लो मोशन' या पुस्तकांवरचं परीक्षण म्हणजे नवं ज्ञानच. आम्हाला जे सहजासहजी वाचायला मिळत नाही ते तुमच्या या अंकातून मिळतं.

बालनगरी पण छान. या अंकातल्या गोष्टी मी माझ्या नातींना सांगितल्या, त्या खूष.


संपादकीयमध्ये ग्रंथालय, पुस्तकं, नियतकालिकं याबद्दल जी माहिती दिली आहे त्यावरून वाचक वाचत नाहीत, ही तक्रार खरी वाटत नाही. वाचनाची एक तहान असते ती पुस्तकातूनच भागते.

'ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक' असा जो उल्लेख मुखपृष्ठावर आहे, तो सर्वार्थाने योग्य आहे, हे ग्रंथजगतच्या प्रत्येक अंकावरून पटतं.

आवडलं ते कळवावं म्हणून हे पत्र.

दत्ता हलसगीकर, सोलापूर.

## ओळखा पाहू



अमेरिकेतील वर्णभेदी व्यवहाराला कडाडून विरोध करून, समान नागरी हक्काचा आग्रह धरणारा हा झुंजार अमेरिकन निग्रो नेता.

'आय हॅव अ ड्रीम' हे यांचे भाषण सर्वाधिक गाजले.

यांची ओळख पटवा व आम्हाला पत्राद्वारे कळवा.

**फेब्रुवारी अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर**

**सत्यजित रे** - चित्रपट 'पथेर पांचाली'

अचूक उत्तर पाठवणारे वाचक - रा. द. ठुमणे, पुणे.



# अनुवादित कादंबऱ्या

| | | |
|---|---|---|
| काँगो : **मायकेल क्रायटन** | अनु. अरुण मांडे | १६० |
| डिस्क्लोजर : **मायकेल क्रायटन )** | अनु. माधव कर्वे | २२० |
| ज्युरॅसिक पार्क : **मायकेल क्रायटन** | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | २५० |
| टाइमलाइन : **मायकेल क्रायटन** | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ३६० |
| (स्वामीकार रणजित देसाई पुरस्कार २००३) | | |
| प्रे : **मायकेल क्रायटन** | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ३०० |
| द फोर्थ के : **मारिओ पुझो** | अनु. वनिता सावंत | २०० |
| द लास्ट डॉन : **मारिओ पुझो** | अनु. अनिल काळे | ३५० |
| ओमेर्ता : **मारिओ पुझो** | अनु. अनिल काळे | २२० |
| फिअर इज द की : **ॲलिस्टर मॅक्लीन** | अनु. अशोक पाध्ये | १६० |
| द गोल्डन गेट : **ॲलिस्टर मॅक्लीन** | अनु. अशोक पाध्ये | २२० |
| द गोल्डन रॉन्देव्हू : **ॲलिस्टर मॅक्लीन** | अनु. अशोक पाध्ये | २०० |
| द डार्क क्रुसेडर : **ॲलिस्टर मॅक्लीन** | अनु. अशोक पाध्ये | २४० |
| साऊथ बाय जावा हेड : **ॲलिस्टर मॅक्लीन** | अनु. अशोक पाध्ये | २५० |
| द रेनमेकर : **जॉन ग्रिशॅम** | अनु. अनिल काळे | ३८० |
| द पेलिकन ब्रीफ : **जॉन ग्रिशॅम** | अनु. रवींद्र गुर्जर | २८० |
| द क्लायंट : **जॉन ग्रिशॅम** | अनु. माधव कर्वे | ३०० |
| सेकंड लेडी : **आयर्विंग वॅलेस** | अनु. रवींद्र गुर्जर | १३० |
| द सेव्हन्थ सिक्रेट : **आयर्विंग वॅलेस** | अनु. विजय देवधर | २०० |
| कोमा : **रॉबिन कुक** | अनु. रवींद्र गुर्जर | १०० |
| क्रोमोझोम-६ : **रॉबिन कुक** | अनु. वैशाली जोशी | ३५० |
| टॉक्सीन : **रॉबिन कुक** | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | २५० |
| कन्टेजन : **रॉबिन कुक** | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | २४० |
| सीझ्र : **रॉबिन कुक** | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ३०० |
| फर्स्ट टु डाय : **जेम्स पॅटरसन** | अनु. रवींद्र गुर्जर | २०० |
| द फिस्ट ऑफ गॉड : **फ्रेडरिक फोरसीथ** | अनु. अनिल काळे | ३०० |
| फ्रॉम रशिया विथ लव्ह : **इयान फ्लेमिंग** | अनु. विजय देवधर | २५० |
| ऑक्टोपसी : **इयान फ्लेमिंग** | अनु. जयमती दळवी | ८० |

| | | | |
|---|---|---|---|
| मूनरेकर : **इयान फ्लेमिंग** | अनु. उदय नारकर | १५० |
| फॉर युवर आईज ओन्ली : **इयान फ्लेमिंग** | अनु. अनिल काळे | १२० |
| कसिनो रॉयल : **इयान फ्लेमिंग** | अनु. सुभाष जोशी | १२० |
| थंडरबॉल : **इयान फ्लेमिंग** | अनु. जयंत कर्णिक | १६० |
| द स्पाय हू लव्हड् मी : **इयान फ्लेमिंग** | अनु. अजित ठाकूर | ११० |
| लिव्ह ॲण्ड लेट डाय : **इयान फ्लेमिंग** | अनु. अनिल काळे | १६० |
| द मॅन विथ द गोल्डन गन : **इयान फ्लेमिंग** | अनु. देवदत्त केतकर | ८० |
| गोल्डफिंगर : **इयान फ्लेमिंग** | अनु. माधव कर्वे | १८० |
| यू लिव्ह ओन्ली ट्वाइस : **इयान फ्लेमिंग** | अनु. जयवंत चुनेकर | १६० |
| फाईव्ह पॉइंट समवन **: चेतन भगत** | अनु. सुप्रिया वकील | २०० |
| एव्हरीथिंग हॅपन्स फॉर अ रिझन **: कविता दासवानी** | अनु. चित्रा वाळिंबे | १५० |
| नॉट अ पेनी मोअर, नॉट अ पेनी लेस **: जेफ्री आर्चर** | अनु. अंजनी नरवणे | १२० |
| सन्स ऑफ फॉर्च्यून **: जेफ्री आर्चर** | अनु. अजित ठाकूर | ३५० |
| डॉ.झिवागो **: बोरिस पास्तरनाक** | अनु. आशा कर्दळे | २५० |
| सेव्हिंग फेथ : **डेव्हिड बेल्डासी** | अनु. माधव कर्वे | २०० |
| द हॉट झोन : **रिचर्ड प्रेस्टन** | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | २०० |
| काळोखाची लेक **: कॅथरीन दी जीजस** | अनु. सरिता पदकी | १५० |
| ऑन द विंग्ज ऑफ ईगल्स : **केन फोलेट** | अनु. ज्योत्स्ना लेले | २५० |
| डायरी ऑफ ॲन फ्रँक : **ॲन फ्रँक** | अनु. मंगला निगुडकर | १७५ |
| चीपर बाय दी डझन **: फ्रँक बंकर गिलब्रेथ** | अनु. मंगला निगुडकर | १०० |
| द ब्रेडविनर **: डेबोरा एलीस** | अनु. अपर्णा वेलणकर | |
| १००(जी.ए.कुलकर्णी स्मृती पुरस्कार २००३) | | |
| परवाना **: डेबोरा एलीस** | अनु. अपर्णा वेलणकर | १२० |
| शौझिया **: डेबोरा एलीस** | अनु. अपर्णा वेलणकर | ११० |



| | | | |
|---|---|---|---|
| नॉट विदाऊट माय डॉटर **: बेट्टी मेहमूदी** | अनु. लीना सोहोनी | २०० |
| द ब्लाइन्ड असॅसिन: **मार्गरेट ॲटवूड** | अनु. चारुता नानिवडेकर | २५० |
| साम्राज्य बुरख्यामागचे : **कारमेन बिन लादेन** | अनु. अविनाश दर्प | १५० |
| द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज **: अरुंधती रॉय** | अनु. अपर्णा वेलणकर | ३०० |
| ***(फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स पुरस्कार २००३ / साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २००३*)** | | |
| लेडीज कूपे **: अनिता नायर** | अनु. अपर्णा वेलणकर | २५० |
| (रणजित देसाई पुरस्कार, २००६) | | |
| सिटी ऑफ बोन्स : **मायकेल कॉनेली** | अनु. अजित ठाकूर | २४० |
| द दा विंची कोड :**डॅन ब्राऊन** | अनु. अजित ठाकूर | ३२० |
| द लायन्स गेम : **नेल्सन डेमिल** | अनु. अशोक पाध्ये | ६८० |
| व्हाईट मुघल्स : **विल्यम डॅलरिंपल** | अनु. सुधा नरवणे | ३५० |
| चाईल्ड ऑफ द होलोकॉस्ट :**जॅक कूपर** | अनु.सिंधू जोशी | १३० |
| गांधर्वी : बाणी बसू | अनु. मृणालिनी गडकरी | १७० |
| देवदास **:** **शरच्चंद्र चट्टोपाध्याय** (बंगाली) | अनु. मृणालिनी गडकरी | ९० |
| (साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २००४) | | |
| काबुलीवाल्याची बंगाली बायको **:** **सुस्मिता बॅनर्जी** (बंगाली) | अनु. मृणालिनी गडकरी | १०० |
| ब्लास्फेमी : **तेहमिना दुर्रानी** | अनु. भारती पांडे | १०० |
| (ना.ह.आपटे पुरस्कार २००१-०२) | | |
| मयादा इराकची कन्या : **जीन सॅसन** | अनु. भारती पांडे | २५० |
| अणसार **: वर्षा अडालजा (गुजराथी)** | अनु. अंजनी नरवणे | १८० |
| तत्त्वमसि : **ध्रुव भट (गुजराथी)** | अनु. अंजनी नरवणे | १४० |
| शिवा डान्सिंग **: भारती कर्चनर** | अनु. मंजुषा गोसावी | २५० |
| संस्कार **: यू. आर. अनंतमूर्ती** | अनु. लोकापूर/कानिटकर | ८० |
| द कंपनी ऑफ विमेन | खुशवंत सिंग | २०० |
| वसंतगंधा : (कोरियन लोकसाहित्यातील प्रेमकहाणी) | माधवी कोल्हटकर | १२० |

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पोस्टेज खर्च वेगळा

## शंकर पाटील यांची पुस्तके

| **कथा** | मूल्य |
|---|---|
| पाटलांची चंची | १३० |
| धिंड | १०० |
| खुळ्याची चावडी | १२० |

## किरण बेदी यांची पुस्तके

| | | मूल्य |
|---|---|---|
| आय डेअर : किरण बेदी | अनु. आशा कर्दळे | २२५ |
| (**राज्य पुरस्कार १९९६**) | | |
| इट्स ऑलवेज पॉसिबल | अनु. लीना सोहोनी | २५० |
| मजल दरमजल | अनु. भारती पांडे | ८० |
| व्हॉट वेंट रॉंग? | अनु. लीना सोहोनी | २०० |
| अॅज आय सी... | अनु. माधुरी शानभाग | ३०० |

## सुधा मूर्ती यांची पुस्तके

| | | मूल्य |
|---|---|---|
| वाइज अँड अदरवाइज | अनु. लीना सोहोनी | १५० |
| गोष्टी माणसांच्या | अनु. लीना सोहोनी | १३० |
| पुण्यभूमी भारत | अनु. लीना सोहोनी | १३० |
| महाश्वेता (कादंबरी) | अनु. उमा कुलकर्णी | १२० |
| डॉलर बहू (कादंबरी) | अनु. उमा कुलकर्णी | १२० |
| अस्तित्व (कादंबरी) | अनु. ए. आर. यार्दी | ८० |

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

पोस्टेज खर्च वेगळा



## मार्गदर्शनपर

| | | |
|---|---|---|
| व्यवसाय मार्गदर्शक : जयंती घोष | अनु. महाम्बरे/कपटकर | १९० |
| सभेत कसे बोलावे | श्याम भुरके | ६० |
| मंत्र श्रीमंतीचा | श्याम भुरके | १३० |
| महिलांसाठी उद्योग व्यवसाय | गंगाधर महाम्बरे | ९० |
| शर्यती स्पर्धा खेळ | आ. पां. खरात | १२० |
| प्रवास-पर्यटनाचे नवे पैलू | यशोधरा भोसले | १५० |
| कॉंप्युटरच्या करामती | डॉ. बाळ फोंडके | ५० |
| ही सुट्टी कशी घालवाल? | मनोहर चंपानेरकर | ४२ |
| बुद्धिबळाचा ओनामा | ना. रा. वडनप | ८० |
| सुसंघटीत मारा (बुद्धिबळ) | ना. रा. वडनप | १०० |
| चतुरंग (बुद्धिबळातील) सापळे | ना. रा. वडनप | १०० |
| बुद्धिबळाचा श्रीगणेशा | ना. रा. वडनप | १२० |
| बुद्धिबळ शिका | ना. रा. वडनप | १०० |
| शिवणकला एक छंद : स्मॉकिंग | हेमा कळके | १०० |
| शिवणकला एक छंद : सलवार कमिज, स्कर्ट ब्लाऊज,इव्हिनिंग गाऊन्स,मिडी | हेमा कळके | ८० |
| गाऊन्स | हेमा कळके | १६० |
| क्रोशा विणकाम | प्रभावती पुरम | २०० |
| लोकरीचे विणकाम | आशा पत्रावळी | ३५० |

## चिकन सूप मालिका

**चिकन सूप फॉर द सोल :**
जॅक केनफिल्ड /
मार्क व्हिक्टर हॅन्सन — अनु. उषा महाजन — १६०

**चिकन सूप फॉर द वुमन्स सोल :**
जॅक केनफिल्ड/
मार्क व्हिक्टर हॅन्सन/
जेनिफर रीड हॉर्थोर्न/मार्सी शिमॉफ — अनु. श्यामला घारपुरे — १६०

# चला जाणून घेऊ या

| | | |
|---|---|---|
| तणाव व राग | शुभदा गोगटे | ३० |
| स्मरणशक्ती कशी वाढवावी? | शुभदा गोगटे | ३० |
| फेंग शुई | शुभदा गोगटे | ३० |
| सुख | शुभदा गोगटे | ३० |
| रेकी | शुभदा गोगटे | ३० |
| ज्योतिष्यविद्या | शरद गोगटे | ३० |
| तंदुरूस्ती | मोतिया बसर्गेकर | ३० |
| चालणे | मोतिया बसर्गेकर | ३० |
| यशाचं रहस्य | सुभाष जोशी | ३० |
| चक्रं आणि नाडी | सुभाष जोशी | ३० |
| क्रियायोग | सुभाष जोशी | ३० |
| ॲक्युप्रेशर | सुभाष जोशी | ३० |
| सार्स | मुग्धा गोखले | ३० |
| रोग बरे करणारी पाण्याची अद्‌भुत शक्ती | वैशाली जोशी | ३० |
| अंकशास्त्र | गंगाधर महाम्बरे | ३० |
| योगविद्या | मंगेश कश्यप | ३० |
| प्रथमोपचार | मंगेश कश्यप | ३० |
| वास्तुशास्त्र | स्वाती शहा | ३० |
| गुडघेदुखी | सुषमा शाळीग्राम | ३० |
| हस्तसामुद्रिक | वृषाली पटवर्धन | ३० |
| मधुमेह | प्रशांत तळणीकर | ५० |
| अध्यात्मिकता | प्रशांत तळणीकर | ३० |
| केसांची निगा | मीना टाकळकर | ३० |
| मनोविकास | आर. डी. मुनोत | ३० |
| सौंदर्याचे रहस्य | मंजूषा आमडेकर | ३० |
| उपयुक्त कानमंत्र | मंजूषा आमडेकर | ३० |
| डोकेदुखी | ज्योतिका चितळे | ३० |

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

**पोस्टेज खर्च वेगळा**



# नुकतेच......

## गोल्डफिंगर
## इयान फ्लेमिंग

**अनु. माधव कर्वे**

**१८०रु.**
**पोस्टेज २०रु.**




गोल्डफिंगर.....
सोन्याचं वेड असलेला... स्वत:च सोन्याचं साम्राज्य असलेला एक संशयास्पद, कारस्थानी असामी.
'स्मर्श' या खुनशी रशियन गुप्तहेर संघटनेशी संधान बांधून असलेला गोल्ड फिंगर मोठ्या नरसंहाराचं भयावह कारस्थानं आखतो....
आजच्या अतिरेकी कारवायांशी नातं सांगणार... त्याचे डाव-प्रतिडावं मोडून काढण्याचं सामर्थ्य केवळ एकाच माणसात असतं...
तो म्हणजे जेम्स बाँड...!

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.




## * डॉ.किशोर शांताबाई काळे

'कोल्हाट्याचं पोर' या आत्मचरित्राने कोल्हाटी समाजाच्याच्या जीवनावर प्रकाश टाकून मराठी साहित्यविश्वात एक वेगळे स्थान मिळविलेले डॉ. किशोर शांताबाई काळे यांचे १९ फेब्रुवारी रोजी निधन झाले. ते ३७ वर्षांचे होते.

डॉ. काळे यांना कळंबहून कुर्डूवाडीकडे येत असताना गेल्या ३ फेब्रुवारी रोजी अपघात झाला. या अपघातात त्यांच्या मेंदूला जबर मार बसला होता.

डॉ. काळे यांच्या पश्चात त्यांची आई शांताबाई, एक भाऊ, मामा असा परिवार आहे.

डॉ. काळे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतले. त्यांनी १९९४ साली एम.बी.बी.एस.ची पदवी घेतली होती. ॲलोपथीबरोबरच अलीकडेच त्यांनी आयुर्वेदाचा अभ्यास केला होता. माढा तालुक्यातील म्हैसगाव येथे संत गाडगेबाबा आयुर्वेद उपचार केंद्राच्या माध्यमातून ते रुग्णसेवा करीत होते. त्यांनी आयुर्वेदावरही रुग्णांना मार्गदर्शन करणारी पुस्तके लिहिली आहेत. त्यांची विदर्भात तीसहून अधिक आयुर्वेद केंद्रे चालू आहेत.

कोल्हाटी समाजातील शांताबाई काळे या एका नाचणारणीच्या पोटी त्यांचा जन्म झाला. कालांतराने त्यांना त्यांच्या वडिलांचे नाव समजले. करमाळ्याचे माजी आमदार व कॉंग्रेसचे तत्कालीन मातब्बर नेते नामदेवराव जगताप यांचा उल्लेख त्यांनी आपल्या कोल्हाट्याचं पोर या आत्मचरित्रात केला आहे. श्री. जगताप यांनी आईला टाकून दिल्यानंतर डॉ. काळे हे प्रथमपासूनच वडिलांच्या ठिकाणी आपली आई शांताबाई यांचे नाव लावू लागले. कोल्हाट्यांना आपले जीवन किती लाचारीने आणि उपेक्षेने जगावे लागते. त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन विदीर्ण करून सोडणारी करुण कहाणी म्हणजेच त्यांचे हे आत्मचरित्र. हे आत्मचरित्र साहित्यविश्वात खळबळ माजविणारे ठरले. या साहित्यकृतीला पहिल्याच वर्षी १९९४ साली सोलापूरच्या भैरुरतन दमाणी साहित्य पुरस्कारासह अनेक मानाचे पुरस्कार मिळाले होते. मुंबईच्या ग्रंथाली प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेल्या या आत्मचरित्राच्या आजतागायत तेरा आवृत्त्या निघाल्या आहेत. डॉ. किशोर काळे यांना त्यांच्या अडीअडचणींच्या काळात माजी खासदार रामराव लोणीकर यांच्याबरोबरच प्रसिद्ध अभिनेत्री मधू कांबीकर यांनी आर्थिक मदत केली. त्याबद्दल त्यांनी कृतज्ञतापूर्वक



उल्लेख करून हे आत्मचरित्र त्यांनाच अर्पण केले होते. या आत्मचरित्राबरोबरच माझी आई, माझी शाळा, हिजडा एक मर्द, आत्मबळ, मी डॉक्टर झालो या त्यांच्या साहित्यकृती आहेत. गेल्या पाच वर्षांपूर्वी डॉ. काळे यांनी बौद्धधर्म स्वीकारला होता. 'उचल्या'कार लक्ष्मण गायकवाड यांचे ते जावई होत.

## * डॉ. वा. के. लेले

ज्येष्ठ समीक्षक, लेखक व काव्यशास्त्राचे व्यासंगी डॉ. वामन केशव लेले (वय ७४) यांचे कर्करोगाने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी व तीन पुत्र असा परिवार आहे.

डॉ. लेले यांचा जन्म २९ मे १९३३ मध्ये झाला. प्रारंभीचे शिक्षण मुंबईत झाले. डॉक्टरेट मिळवल्यावर ते अध्यापनाकडे वळले. १९५८ पासून त्यांनी लेखनास प्रारंभ केला. मात्र संस्कृत भाषेचा विशेषत: काव्यशास्त्राचा गाढा व्यासंग असल्याने त्यांनी नंतर समीक्षणात्मक व संशोधनात्मक लेखन केले. 'औचित्यसिद्धांत', 'भारतीय काव्यशास्त्राची उत्क्रांती : प्रथमयुग', 'कलेतिहास व रसग्रहण' हे त्यांचे ग्रंथ गाजले. याशिवाय काव्य, शास्त्र व संस्कृती, ललितलेखन व शैली, ज्ञानेश्वरीचा शास्त्रीय अभ्यास, शाकुंतल : शैलीशास्त्रीय अभ्यास आदि पुस्तकेही त्यांनी लिहिली. अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी डॉक्टरेटसाठी मार्गदर्शन केले. पुण्याच्या वाडिया कॉलेजमध्येही त्यांनी काम केले. त्यानंतर ते बनारस हिंदू विश्वविद्यालयात मराठीचे विभागप्रमुख म्हणून कार्यरत होते. निवृत्तीनंतर ते पुण्यात स्थायिक झाले होते.

## * सिडनी शेल्डन

रंगभूमी, चित्रपट आणि साहित्य या तिन्ही क्षेत्रांमध्ये आपल्या प्रतिभेची छाप पाडणारे प्रख्यात कादंबरीकार सिडनी शेल्डन यांचे वयाच्या ८९ व्या वर्षी न्यूमोनियाने निधन झाले. त्यांना रान्चो मिरेज येथील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. मृत्यूसमयी पत्नी अलेक्झांड्रा व मुलगी मेरी त्यांच्या सोबत होते.

ब्रॉडवे थिएटर, चित्रपट आणि टेलिव्हिजन या क्षेत्रांत नाव कमावल्यानंतर ५० व्या वर्षी त्यांनी कादंबरी लेखन सुरू केले. पुढची २५ वर्षे जगभरातील वाचकांना सस्पेन्स आणि सेन्श्युॲलिटीने भरलेल्या त्यांच्या कादंबऱ्यांनी भारावून टाकले. १७ फेब्रुवारी १९१७ रोजी शिकागो येथे जन्मलेले शेल्डन यांनी दहाव्या वर्षी आपली एक कविता दहा डॉलरला विकली होती. सतराव्या वर्षी नशीब काढायला म्हणून ते हॉलिवूडमध्ये आले. तिथे त्यांना आठवड्याला २२ डॉलर पगारावर युनिव्हर्सल स्टुडिओत 'वाचक' म्हणून काम मिळाले. त्याच रात्री त्यांना एक पटकथा (साऊथ ऑफ पनामा) लिहून युनिव्हर्सललाच अडीचशे डॉलरला विकली.

'वाचकाने पुस्तक खाली ठेवू नये या उद्देशानेच मी कादंबरी लिहितो', असे शेल्डन म्हणत असत. 'रेज ऑफ एंजल्स', 'मास्टर ऑफ दी गेम', 'इफ टुमारो

कम्स', 'अदर साईड ऑफ मिडनाईट' यासारख्या 'बेस्टसेलर्स'मुळे त्यांना लोकप्रिय लेखकांच्या यादीत मानाचे स्थान मिळाले.

### * प्रा. सदानंद वर्दे

ज्येष्ठ समाजवादी नेते आणि राज्याचे माजी शिक्षणमंत्री प्रा. सदानंद वर्दे यांचे २८ जानेवारी रोजी वांद्रे येथील राहत्या घरी कर्करोगाने निधन झाले. ते ८१ वर्षांचे होते. 'अनुकाका' म्हणून सुपरिचित असलेल्या प्रा. वर्दे यांच्या पश्चात पत्नी सुधा, प्रसिद्ध ओडिसी नृत्यांगना झेलम परांजपे ही कन्या आणि पुत्र अभिजीत, नातवंडे असा परिवार आहे.

प्रा. वर्दे यांचा जन्म ६ नोव्हेंबर १९२५ रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बिंबवणे या गावी झाला. बी.ए. आणि एम.ए.च्या परीक्षेत मुंबई विद्यापीठातून ते अनुक्रमे पहिल्या आणि दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी सहभाग घेतला. ज्येष्ठ समाजवादी नेते एस. एम. जोशी यांच्या सांगण्यावरून त्यांनी सेवादलाचे कार्य सुरू केले.

ते अर्थशास्त्राचे प्राध्यापक होते. मुंबई महापालिकेवर सलग तीनदा ते निवडून गेले होते. आणीबाणीच्या काळात त्यांनी १८ महिने तुरुंगवासही भोगला. वांद्रे मतदारसंघातून जनता पक्षातर्फे ते १९७८ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवडून गेले. १८ जुलै १९७८ ते १७ फेब्रुवारी १९८० या कालावधीत पुलोद सरकारमध्ये ते शिक्षण, सांस्कृतिक कार्य, युवक कल्याण आणि क्रीडा खात्याचे मंत्री होते.

### * कमलेश्वर

'कितने पाकिस्तान' आणि 'खोई हुई दिशायें' सारख्या कादंबऱ्या, सर्वसामान्य माणसाच्या भावभावनांना शब्दरूप देणाऱ्या असंख्य कथा, 'मि. नटवरलाल'सारख्या तद्दन व्यावसायिक आणि 'आंधी'सारख्या वेगळ्या वाटेने जाणाऱ्या चित्रपटाची कथा... असे बहुविध साहित्यसंचित नावावर असलेले ज्येष्ठ लेखक कमलेश्वर यांच्या निधनाने साहित्यसृष्टीत शोक व्यक्त करण्यात येत आहे.

हिंदी साहित्यात शैली, विषय, मांडणीचा नवा प्रवाह आणणाऱ्या लेखकांमध्ये कमलेश्वर यांचे स्थान मोठे आहे. सामान्य मध्यमवर्गीय माणूस नेहमी त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू राहिला. त्यांच्या एकूण पुस्तकांची संख्या ३० पेक्षा अधिक असली तरी त्यात सर्वाधिक गाजली ती 'कितने पाकिस्तान' ही कादंबरी. त्यासाठी त्यांना सन २००३ मध्ये साहित्य अकादमी पुरस्काराने गौरविण्यात आले. २००५मध्ये ते पद्म पुरस्काराचे मानकरी ठरले. 'दिल्ली में एक मौत', 'राजा निरंबसिया की कथा', 'नागमणि' आदी कथा विशेष लक्षणीय मानल्या जातात.

❐